25-02-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A.1

SGB/ MMP/ D/ 09:30

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, 2011 च्या कलम 7 अन्वये, वार्षिक योजना 2014-2015 मधील प्रदेशनिहाय नियतव्ययाच्या वाटपाबाबतचे मा.राज्यपाल यांचे दिनांक 15 फेब्रुवारी, 2014 रोजीचे निर्देश" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : मा.राज्यपाल यांचे दिनांक 15 फेब्रुवारी, 2014 रोजीचे निर्देश" सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

------

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (सुधारणा) नियम, 2014 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक-तेविआ 1014/प्र.क्र.34/2014/वित्त आयोग कक्ष, दिनांकित 21 फेब्रुवारी, 2014" सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: इतर मागासवर्ग कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती दिप्ती चवधरी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इतर मागासवर्ग कल्याण समितीचा पाचवा व सहावा अहवाल सभागृहाला सादर करते.

**उप सभापती** : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा पाचवा व सहावा अहवाल सभागृहाला सादर करण्यात आला आहे.

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.**: नियम स्थगित ठेवण्याबाबत वित्त राज्यमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, "महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम 289 अन्वये पूरक मागण्यांवरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमांतील नियम 230(2) मधील तीन दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित ठेवण्यात यावी." असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----------

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज सभागृहाचे कामकाज नेहमीच्या पध्दतीप्रमाणे होणार नाही. आतापर्यंतच्या प्रथेप्रमाणे दररोज प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना आणि इतर कामकाज घेण्यात येते. असे कामकाज पूर्ण झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना एखाद्या जिव्हाळ्याचा विषयावर नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना मांडण्याचा अधिकार आहे. आज आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्या संदर्भात आम्हाला मत मांडायचे आहे त्या बाबत आपण मार्गदर्शन करावे.

**उप सभापती** : नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना प्राप्त झालेली आहे. सूचनेतील विषय जिव्हाळ्याचा आहे. मी पाच मिनिटात निर्णय देतो.

---------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सन 2013-2014 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

**उप सभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा पहिला व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर आज चर्चा घेण्यात येईल. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम पत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**<u>विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या</u>**

**उप सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

(1) मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक-ए-4, ए-8ए, एफ-2, एफ-7, जे-1.

(2) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-जी-1, जी-3, जी-6, के-6.

(3) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8.

(4) गृह मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-बी-1, बी-5.

(5) सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-एन-3.

(6) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-टी-1, टी-2, टी-6, टी-7.

(7) वने, पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-सी-7.

(8) कृषी व पणन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-डी-3, व्ही-2.

(9) ग्रामविकास मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-एल-2, एल-3.

(10)सहकार आणि संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-व्ही-2, व्ही-5.

**उप सभापती** ....

(11)अन्न व औषधी प्रशासन मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-एस-4.

(12)अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-एम-2, एम-4.

(13)वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-एस-1.

(14)जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-आय-5.

(15)महसूल व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-सी-5.

(16)उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-डब्ल्यू-2, डब्ल्यू-4, डब्ल्यू-5, डब्ल्यू-8.

(17)वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-व्ही-5.

(18)कामगार आणि विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-एन-3.

(19)सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण आणि राज्यशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-आर-1.

(20) रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-एल-7, ओ-3.

(21)क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-ई-3.

(22)महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-एक्स-1.

(23)पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-डी-5.

(24)पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागाची मागण्या क्रमांक-यू-1, यू-3.

(25)पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक-वाय-6.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, काल मी सभागृहात ग्रीन बुकचा विषय मांडला होता. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, बैठकीत ठरले होते. बैठकीमध्ये मंत्री आणि अधिकारी यांच्या पातळीवर शासनाचा निर्णय होतो. माननीय राज्यपालांचे निर्देश असल्यामुळे माननीय उप मुख्यमंत्री हे माननीय मुख्यमंत्र्यांच्या नाकात दम आणणारे असले तरी राज्यपालांचे निर्देश त्यांना बदलता येणार नाहीत. मागील हिवाळी अधिवेशन काळात सभागृहात या मुद्याबाबत चर्चा झाली होती. त्या चर्चेच्या अनुषंगाने पीठासीन अधिकाऱ्यांनी असे सांगितले होते की, "सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी कळविले आहे की, या प्रकरणी राज्य शासनास येत असलेल्या व्यावहारिक अडचणींचा विचार करता मी या प्रकरणी माननीय राज्यपालांना लक्ष घालण्याची विनंती पत्र लिहून आणि स्वत: भेटून केली आहे. त्यावर माननीय राज्यपालांनी यावर आपण लक्ष घालत असून मुद्दा तपासत असल्याचे कळविले आहे."

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी लक्ष घातले का? त्यांनी लक्ष घालून मुद्दा तपासून काय निर्देश दिले हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी पीठासीन अधिकाऱ्यांना पत्र लिहून या प्रकरणी माननीय राज्यपालांना लक्ष घालण्याची विनंती केल्याचे कळविले होते.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काल जो मुद्दा उपस्थित केला होता त्याबद्दल मी थोडक्यात माहिती देण्याचा प्रयत्न केला होता. विधानसभेत देखील हा मुद्दा उपस्थित झाला होता आणि जवळपास एक तास सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात आले होते. या मुद्याबाबत विभागाच्या सचिवांना माननीय राज्यपालांच्या सचिवांकडे चर्चेसाठी पाठविले होते. त्या ठिकाणी त्यांची चर्चा झाली आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ग्रीन बूकच्या संदर्भात विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. विशेषत: विदर्भ, मराठवाडयामध्ये जो अनुशेष वाढत आहे त्या अनुषंगाने शासनाकडून अर्थसंकल्पात केल्या जाणाऱ्या तरतुदी खर्च होत नाहीत म्हणून ग्रीन बूक प्रत्येक पूरक मागण्यांच्या वेळी सभागृहाला सादर केले पाहिजे अशी त्यांची आग्रहाची भूमिका होती.

...7...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

सभापती महोदय, याबद्दल काही अडचणी आहेत. त्या अनुषंगाने राज्याचे प्रमुख या नात्याने माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय राज्यपालांना पत्र लिहिले होते. त्या पत्राचे उत्तर माननीय राज्यपालांनी कोणते निकष मान्य केले की अमान्य केले याबद्दल दिलेले नाही. परंतु मी सभागृहाला सांगू इच्छितो की, 28 फेब्रुवारीपर्यंत अधिवेशन चालणार आहे. त्यापूर्वी राज्याचे माननीय मुख्यमंत्री आणि मी स्वत: राज्यपाल महोदयांना भेटून या संदर्भात जो प्रश्न दोन्ही सभागृहात उपस्थित झाला आहे त्याबद्दल त्यांचे काय मत आहे जे जाणून घेऊ. शासनाने त्यांना जे पत्र पाठविले त्या संदर्भात आमचा समज असा होता की, त्यांनी त्या पत्राला होकारात्मक कळविले आहे म्हणून लेखी उत्तर दिले नाही. काल प्राथमिक चर्चा होत असताना नियोजन व वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी स्वत: जाऊन त्याबद्दल चर्चा केली. त्यानंतर मी आणि माननीय मुख्यमंत्री एकत्रित बसलो होतो. काल विधानसभेत जे सांगितले त्याची माहिती मी देऊ इच्छितो.

श्री.दिवाकर रावते : माननीय मुख्यमंत्र्यांनी केव्हा पत्र लिहिले ?

श्री.अजित पवार : दोन महिने होऊन गेले आहेत. अधिवेशन संपण्यापूर्वी राज्यपाल महोदयांचे काय म्हणणे आहे आणि शासनाचे त्याबद्दल काय मत आहे हे या ठिकाणी सांगितले जाईल.

नंतर बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय उप मुख्यमंत्री महोदय आता असे म्हणाले की, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यपाल महोदयांना पत्र लिहिले होते. त्याचे त्यांनी उत्तरच दिले नाही. तेव्हा आम्हाला असे वाटले की, कदाचित त्यांचा होकार असेल. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांचे हे जे वक्तव्य आहे ते कृपया कामकाजातून काढून टाकावे. माननीय राज्यपाल महोदयांनी काहीच उत्तर दिलेले नसल्यामुळे त्यांनी होकार दिला आहे असे गृहीत धरणे हे रेकॉर्डवर ठेवणे चुकीचे आहे. माननीय राज्यपाल आमच्या खिशामध्ये आहेत, आम्ही पत्र दिले त्याला त्यांनी "होय" म्हटले असे अप्रत्यक्षपणे दाखविण्याचा प्रयत्न सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी केलेला आहे. माझी पुन्हा आपल्याला विनंती आहे की, हे जे वक्तव्य आहे ते कामकाजातून काढून टाकावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय.....

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माननीय राज्यपाल आपल्या खिशामध्ये आहेत हे वक्तव्य संसदीय नाही. ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांची ती सूचना आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, त्याला माझी काहीच हरकत नाही. माननीय राज्यपाल महोदयांना गृहीत धरण्याचे काम माननीय मुख्यमंत्री करत असतील तर माननीय राज्यपाल आमच्या खिशामध्ये आहेत असाच त्याचा अर्थ होतो.

**उप सभापती** : आता येथे जे वाक्य उद्धृत करण्यात आले आहे ते तपासून पाहतो आणि त्यानंतर निर्णय घेतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री जे बोलले आहेत ते तपासून पाहणार आहात की, माननीय मुख्यमंत्र्यांचा खिसा तपासून पाहणार आहात ?

**उप सभापती** : मी रेकॉर्ड तपासून पाहणार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खिसे फक्त आम्हालाच आहेत ते कशाला तपासतात असा प्रश्न होता.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय हे रेकॉर्ड तपासणार आहेत. खिसे तपासणार नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नोंद तपासणार आहेत. सभापती महोदय, या सदनाचे नेते श्री.अजित पवार यांनी जो विषय मांडला आहे तो अतिशय गंभीर आहे. अनुच्छेद 371 (2) अनुसार माननीय राज्यपाल महोदयांना विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. या अनुच्छेदामधील तरतुदी बंधनकारक आहेत. त्याबाबत या सदनात अनेक वेळा मोठ्या प्रमाणावर चर्चा देखील झालेली आहे. त्याचे साक्षीदार माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार देखील आहेत. मोठ्या संघर्षानंतर माननीय राज्यपाल महोदयांनी या संदर्भातील जागरूकता दाखविली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील अनुशेषाच्या प्रश्नाला आता घटनात्मक बंधन झाले आहे. त्यासंबंधातीलच प्रश्न माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी मांडला आहे.

माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी जे निदर्शनास आणले ते एवढया करिता गंभीर आहे की, सभागृहामध्ये होणारी कोंडी लक्षात घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन महिन्यांपूर्वी माननीय राज्यपाल महोदयांना पत्र लिहून जागरूकता दाखवून दिली होती. आज लेखानुदान आहे. त्याला आपण अंतरिम अर्थसंकल्प असे नाव दिलेले आहे. त्यास अंतरिम अर्थसंकल्प का म्हटलेले आहे हे मला देखील कळलेले नाही. आपल्याला अर्थसंकल्प मांडायचा होता तर तो पूर्णच मांडायचा होता. माननीय श्री.अजित पवार यांच्याकडे एक घाव दोन तुकडेच असतात. अंतरिम अर्थसंकल्प मांडण्याची कधीच भानगड नसते. यावेळी ते यात कसे काय पडले हेच मला कळत नाही. याची जाणीव माननीय राज्यपाल महोदयांना नाही काय ? काल संयुक्त सभागृहासमोर माननीय राज्यपाल महोदय आले व त्यांनी अभिभाषण केले. या अभिभाषणातून त्यांनी या शासनाची मानसिकता व्यक्त केली. उद्या येणाऱ्या लेखानुदानाच्या व पुरवणी मागणीच्या निमित्ताने ग्रीन बुक देणे हे घटनात्मक तरतुदी अनुसार बंधनकारक आहे याची त्यांना 100 टक्के जाणीव आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

घटनेच्या अनुच्छेद 371 (2) अनुसार माननीय राज्यपाल महोदयांना असलेले अधिकार त्यांनी वेळेत बजावले नाहीत अशा प्रकारचा संदर्भ या सदनामध्ये आताच माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या निवेदनातून आलेला आहे. माननीय राज्यपालांचे घटनात्मक स्थान लक्षात घेता त्यांच्याबाबत वेगळ्या भावना व्यक्त करणे योग्य होत नाही. त्यास आवर घालावा लागतो. माननीय राज्यपाल आपल्या कर्तव्यात चुकले असे श्री.अजित पवार यांच्या निवेदनातून ध्वनित होत आहे. माननीय राज्यपाल महोदय अशा प्रकारचे घटनात्मक बंधन पाळत नसतील तर वेगळी अशी भूमिका विदर्भ, मराठवाडा, कोकण भागातील जनतेत निर्माण होईल. त्यासाठी कोणालाही दोष देता येणार नाही. आम्ही सर्व केले आहे, माननीय राज्यपाल काहीच करत नाही अशा प्रकारचे आपण सांगत असाल तर ते गंभीर आहे. सदर बाब मी हरकतीच्या मुद्याद्वारे निदर्शनास आणत आहे. असे झाले असेल तर आमच्या मागास भागासाठी योग्य झाले आहे असे म्हणता येणार नाही हे मी मुद्दाम नमूद करू इच्छितो. धन्यवाद.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आदरणीय उप मुख्यमंत्री महोदयांनी माननीय राज्यपाल महोदयांना पत्र लिहिले आणि त्यांचे काही उत्तर आले नाही. याचा अर्थ त्यांना "होय" असा वाटला. जुन्या हिंदी सिनेमामध्ये हिरो हिरोईनला विचारतो की, माझ्यावर प्रेम करतेस का ती बोलली नाही, हसली की त्याला वाटते की, झाले..... तेव्हा माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे जुन्या जमान्यातील देव आनंद स्टाईलने गेलात की काय ? आपण राज्यपालांना पत्र लिहिले आहे. ते काही म्हणाले नाहीत. त्यामुळे त्यांना आपण गृहीत धरले. या शासनाचा मंत्रालया समोर गतिमान शासन असा बोर्ड आहे. येथे असे म्हटले आहे की, उक्त आदेशाच्या नियम 7 अनुसार राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करून विकास मंडळाच्या क्षेत्रात विकास निधीचे समन्यायी वाटप होत असेल तर त्याची खात्री करून घेणे ही महाराष्ट्राच्या राज्यपालांची विशेष जबाबदारी आहे. हे घटनेमध्ये नमूद केलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्र लिहिले असेल तर व त्यास माननीय राज्यपाल महोदयांनी उत्तर दिले नसेल व त्याबाबत सरकारने पुन्हा विचारणा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

केली नसेल तर ते चुकीचे आहे. माननीय श्री.अजित पवार यांनी अधिकाऱ्यांसमवेत झालेली बैठक आठवावी. आपले अधिकारी छत्रपती होते. ते काय काय कारण काढत होते ? ॲन्युअल स्टेटमेंटस म्हणजे वर्षातून एकदा येते असे त्यांचे म्हणणे होते. मग मी त्याना एस आणि टी मधील फरक सांगितला. इंग्लीश कळण्यातील जो फायदा होतो तो श्री.रावते साहेब मी त्यांना दाखविला. मग त्यांनी ते वाक्य बदलले. यातून कशी पळवाट काढता येईल हे अधिकारी आपल्यासमोर बघत होते.

संसदेमध्ये स्प्रे मारला गेला. एका राज्यामध्ये विधीमंडळाच्या सभागृहामध्ये कपडे उतरवले गेले त्यापेक्षा जास्त अवमान या सभागृहातील सत्ताधारी बाकावरील सन्माननीय सदस्य करीत आहेत. विधिमंडळाचा इतका अवमान आतापर्यंत कधीच कोणी केला नसेल. एवढा तो अवमान आहे. कपडे काढणे किंवा स्प्रे फवारणे यापेक्षा या घटनेने सभागृहाचा अवमान झालेला आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे हे स्प्रे चे समर्थन करण्यासाठी उभे राहिले आहेत काय ? स्प्रे फवारण्याची घटना संपूर्ण देशाने पाहिलेली आहे. तो प्रकार चुकीचाच होता.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांना कुठली भाषा कळते ? त्यांना मराठी समजत नसेल तर अन्य दुसऱ्या भाषेत बोलू का ? .. (अडथळा).. माझ्या भावना या आहेत की, संसदेमध्ये स्प्रे मारून संसदेचा जो अवमान झाला, एका राज्यामध्ये माननीय सदस्यांनी सभागृहात कपडे काढून विधिमंडळाचा जो अवमान केला त्यापेक्षा मोठा अवमान जे घटनात्मक अधिकार विदर्भ, मराठवाडा, कोकण या मागास भागाचे आहेत त्याचे ग्रीन बुक सादर न करता ... (अडथळा)... त्यामुळे या सरकारने या भागातील जनतेचा, या भागातील सन्माननीय सदस्यांच्या अधिकाराचा अवमान केलेला आहे. साधा प्रश्न आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या कार्यालयात दोन महिन्यामध्ये विचारणा का झालेली नाही ? आपले गतिमान शासन अन्य बाबींचा पाठपुरावा करते. या बाबीचा पाठपुरावा का करण्यात आला नाही ? अशा प्रकारे पुरवणी मागण्या घिसाडघाईने मांडून रेटून नेण्याचा का प्रयत्न करीत आहात ? यासंबंधी मी पीठासीन अधिकारी या नात्याने आपण जे काही सांगितले होते ते आताच वाचून दाखविले. माननीय मुख्यमंत्र्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून आम्ही चर्चा करतो असे नागपूरला सांगितले होते. काल माननीय मुख्यमंत्री, माननीय सभापती, माननीय अध्यक्ष यांच्या समवेत झालेल्या चर्चेमध्ये माननीय राज्यपालांकडून परवानगी घेतो असे आश्वासन दिलेले आहे. यानंतर श्री.जुन्नरे........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

आम्ही राज्यपाल महोदयांकडून परवानगी घेतो असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी येथे सांगितले आहे. यासंदर्भात राज्य सरकारने माननीय राज्यपाल महोदयाकंडून आवश्यक ती परवानगी घ्यावी व त्यासंदर्भात सभागृहाला अवगत करावे असे पीठासीन अधिकारी म्हणून आपण मागील अधिवेशनात निदेश दिले होते. त्यामुळे आपण यासंदर्भात जे काही निदेश दिले होते त्यासंदर्भात राज्य सरकारने कोणती कार्यवाही केली याबाबतीत आपण निर्णय द्यावा अशी विनंती आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, खरे म्हणजे हा मुद्दा कालच या सभागृहात उपस्थित झाला होता. परंतु या मुद्याच्या संदर्भात मी उत्तर दिल्यानंतर तो पुढे वाढला नाही. परंतु याच मुद्याच्या संदर्भात विधानसभा एक तास बंद पडल्यामुळे माननीय विरोधी पक्ष नेत्यांना ते थोडेसे खटकले असावे. खालचे सभागृह एक दीड तास बंद पडले असतांना या सभागृहाचे कामकाज आपण सुरुच ठेवले ते माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बहुदा खटकले असावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्या सभागृहात काल शोक प्रस्ताव असल्यामुळे हा मुद्दा आम्ही जास्त ताणून धरला नाही.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, काल विधानसभेत सुध्दा पाच शोक प्रस्ताव होते. या विषयाच्या संदर्भात मला जास्त काही बोलावयाचे नाही. माननीय मुख्यमंत्री, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते तसेच मी सुध्दा या विषयाच्या संदर्भात चर्चा केली होती. माननीय राज्यपाल महोदयांच्या संदर्भात आपण जे मत व्यक्त केले तसे नसून माननीय राज्यपाल जे काही सांगतात त्या प्रमाणेच या राज्याचे कामकाज चालत असते. घटनेच्या अनुच्छेद 371(2) चा अवमान करण्याची या शासनाची भूमिका नाही. या विषयाच्या संदर्भात बरीच चर्चा झाल्यानंतर एसीएस प्लॅनिंग तसेच आणखी काही अधिकाऱ्यांना त्यांच्याकडे पाठविले होते. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर ग्रीन बुकच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या ज्या काही सूचना असतील त्या सूचनांचे पालन करण्याची या राज्य सरकारची तयारी आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

..2..

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आता माननीय उप मुख्यमंत्री बोलतांना असे म्हणाले की, विधानसभेत हा विषय एक तास चालला व या सभागृहात तो जास्त चालला नाही त्यामुळे माननीय विरोधी पक्ष नेत्यांना त्याबद्दल खेद वाटला. खालच्या सभागृहाचे या ठिकाणी उदाहरण देऊन या सभागृहातील आमच्या विरोधी पक्ष नेत्यांचा अवमान करण्याचे काम माननीय उप मुख्यमंत्री करीत असतील तर ते चुकीचे आहे. त्यामुळे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात जे काही मत व्यक्त केले आहे ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी विनंती आहे. या सभागृहात खालच्या सभागृहाचे उदाहरण देता येत नाही. खालच्या सभागृहाचे उदाहरण देऊन या सभागृहाला कमी लेखणे, या सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्याला कमी लेखणे, या सभागृहातील सदस्यांना कमी लेखणे बरोबर नसल्यामुळे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात जे स्टेटमेंट केले आहे ते सभागृहाच्या कामकाजातून वगळण्यात यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी पुढे असे सांगितले आहे की, माननीय राज्यपाल महोदय जे काही निर्देश देतील त्या प्रमाणे या सभागृहाचे कामकाज चालेल. त्यामुळे आताचे कामकाज थांबवून माननीय राज्यपाल महोदयांचे निर्देश आल्यानंतर सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरु करावे. आमची यासंदर्भात कोणत्याही प्रकारे आडकाठी राहणार नाही. त्यामुळे यासंदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला अवगत करावे अशी विनंती आहे.

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला होता त्यावर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री हे माननीय राज्यपाल महोदयांची भेट घेऊन त्यांच्याशी विचार विनिमय करतील व त्यामध्ये जो काही निर्णय होईल त्याची माहिती अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहाला दिली जाईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण निर्णय देण्यापूर्वी मी माझे विचार मांडण्यासाठी उभा राहिलो आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जी हरकत घेतली होती त्याला माननीय उप मुख्यमंत्र्यांनी संमती दर्शवली असल्यामुळे आता आपण पुरवणी मागण्यावरील चर्चा थांबवूया. गेल्या अधिवेशनात सुध्दा सरकारने याच विषयाच्या संदर्भात आश्वासन दिले होते परंतु त्याचे पालन केले गेले नव्हते. तसाच प्रकार आता सुध्दा होत असेल तर ते बरोबर नाही.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आपण काल सुध्दा मी निर्णय देण्याअगोदर माझे ऐका असे सांगून आपण आपले विचार व्यक्त केले होते. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या विषयाच्या संदर्भात भूमिका मांडलेली असल्यामुळे मी आता प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात करतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता त्यावर आपण निर्णय द्यावा अशी माझी आपल्याला हात जोडून कळकळीची विनंती आहे.

**उप सभापती** : मी अनेक प्रश्नांची उत्तरे एकाच वेळी देत असतो. त्यामुळे आपण जो मुद्दा उपस्थित केला होता त्याचे सुध्दा मी उत्तर दिलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी जो विषय उपस्थित झालेला आहे त्यासंदर्भात मला काय वाटते, सदनाला काय वाटते हा विषय नाही. पुरवणी मागण्या संविधानाच्या 205 अन्वये या ठिकाणी आलेल्या आहेत. याला घटनेची बंधने आहेत. घटनेच्या अनुच्छेद 371(2)प्रमाणे माननीय राज्यपाल महोदयांचे म्हणणे या ठिकाणी येणे आवश्यक आहे. आपण घटनाबाहय निर्णय देणे ते योग्य आहे की, नाही असा माझ्यापुढे प्रश्न निर्माण होतो. घटनेमध्ये कोणत्याही प्रकारे तडजोड असू शकत नाही. त्यामुळे यासंदर्भात आपण गांभीर्याने जाहीर करण्याची आवश्यकता आहे. मागच्या आधिवेशनात आम्ही माननीय राज्यपाल महोदयांचा केवळ शब्द उच्चारल्याबरोबर त्याचा उल्लेख करावयाचा नाही असे सांगून आम्हाला खाली बसवण्यात आले होते.

**उप सभापती** : या मुद्याच्या संदर्भात अभ्यास करुन मी उत्तर दिलेले आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री. विनोदजी तावडे, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांच्या मुद्याला मी जे उत्तर दिलेले आहे त्याने समाधान होत नसेल तर एक तास सभागृह स्थगित करुन आपल्या चेंबरमध्ये चर्चा करु या. या चर्चेमध्ये आतापर्यंत काय झालेले आहे याची माहिती त्या ठिकाणी देतो. सर्व माहिती दिल्यानंतर काय करावयाचे त्याचा निर्णय घेऊ..

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी जी सूचना केलेली आहे ती चांगली आहे. आता सभागृह स्थगित केल्यानंतर जो काही वेळ जाईल

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

तेवढा वेळ आम्हाला चर्चा करण्यासाठी पुन्हा दिला गेला पाहिजे. अर्थसंकल्प दुपारी 2.00 वाजता मांडला जाणार आहे. त्यानंतर सभागृहाचे कामकाज होणार नाही. खरे म्हणजे चर्चा न करता पुरवणी मागण्या मंजूर झाल्या पाहिजेत असे माननीय उप मुख्यमंत्र्यांना वाटते. परंतु आम्ही तसे होऊ देणार नाही. माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या मनात काय सुरु आहे त्याची आम्हाला कल्पना आहे. पुरवणी मागण्यांवरील चर्चा होऊ नये असा माननीय उप मुख्यमंत्र्यांचा डाव असावा असे मला वाटते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आजपर्यंत तरी माननीय अजितदादांनी असा पळपुटेपणा कधी केला नव्हता. आता आपण सुध्दा पळपुटेपणा करावयास लागला आहात. या विषयाच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांना जर एक तास लागणार असेल तर आमची त्याला तयारी आहे. परंतु हे अंतरिम बजेट आहे. अंतरिम बजेट असल्यामुळे आपण पुन्हा पुरवणी मागण्यावर चर्चा करु शकतो.

**उप सभापती** : मी आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करतो. पुरवणी मागण्यांवरील चर्चेला माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सुरुवात करावी अशी विनंती करतो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.नीलम गोऱ्हे )**

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता ): सभापती महोदया, घटनात्मक बाबींचे पालन न करता सरकारने पुरवणी मागण्या रेटून मांडल्या आहेत त्याचा निषेध करुन मी पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

दादा, खालच्या सभागृहात काय झाले, वरच्या सभागृहात काय झाले, कै.यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याजवळ जाऊन पश्चाताप करण्याची वेळ आमच्यावर आलेली नाही. ती वेळ आपल्यावर येते, येत राहो, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. परंतु जो मुद्दा आमच्या लक्षात येईल तो मुद्दा आम्ही सभागृहात आग्रहाने मांडणार आहोत. आपण आता तरी सिरीअसली घ्याल असे आम्हाला वाटले होते, परंतु तो सिरीअसनेसपणा आपल्या वक्तव्यातून जाणवला नाही. त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडलेले आहे.

सभापती महोदया, वित्त विभाग, बाब क्रमांक 27, पृष्ठ क्रमांक 31 - देशांतर्गत ऋणांवरील व्याज व बाजारपेठ कर्जावरील व्याज देण्याकरिता 333 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. अर्थसंकल्प मांडताना किती कर्जाची आवश्यकता आहे याचा अंदाज व्यक्त केलेला असतो त्या अनुषंगाने या व्याजाचा अंदाज यापूर्वी येणे आवश्यक होते. सन 2013-2014 या आर्थिक वर्षात 20 हजार 206 कोटी रुपये खर्च होईल अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात 33 हजार 367 कोटी रुपये खर्च झालेला आहे. थोडक्यात नियोजनापेक्षा 13 हजार 161 कोटी इतकी अतिरिक्त रक्कम उभारण्यात आली म्हणजे वित्तीय नियोजन चुकल्याचे हे निदर्शक आहे. सद्य:स्थितीत राज्य कर्जात बुडालेले असताना आणि इतके मोठे कर्ज उभारुन सुध्दा कर्जाचा वापर विकास कामांसाठी होतो असे देखील दिसत नाही. त्यामुळे काढलेले कर्ज कसे परत फेडायचे हा प्रश्न पुन्हा उभा राहतो.

सभापती महोदया, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बाब क्रमांक 57, पृष्ठ क्रमांक 74 - मराठा समाजाला आरक्षण देण्याचा विषय प्रत्येक निवडणुकीच्या आधी आपले नेते उपस्थित करीत असतात. आपले नेते म्हणजे महाराष्ट्रातील नेते. सन 2009 च्या निवडणूक काळात मराठा समाजाला आरक्षण देण्याचा विषय चर्चेमध्ये आला. मराठा समाजाला आरक्षण देण्या संदर्भात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

श्री.नारायण राणे यांची एक समिती नेमण्यात आली. परंतु त्या समितीने काम सुरु करावे अशा आशयाचे पत्र सहा महिने झाले तरी मिळाले नाही. काम सुरु करण्याचे पत्र मिळाले नाही म्हणून काम सुरु झाले नाही. त्यानंतर एक हिअरींग लावण्यात आली, परंतु समितीची टर्म संपली म्हणून ती हिअरींग रद्द झाली. मराठा समाजा विषयीचा हा हलगर्जीपणा सत्ताधारी बाकावरुन जाणीवपूर्वक करण्यात येत होता की नकळत होत होता हे समजत नाही. आपण ते सर्व आनंदाने पाहत होता की नाही, हे मला माहीत नाही, परंतु आपण ते पाहत आहात, हे सत्य आहे.

सभापती महोदया, मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात नवी मुंबई, कोकण भवन येथे माननीय राणे समितीसमोर हिअरींग होते तेव्हा मी तेथे जाऊन या विषयातील सर्व कागदपत्रे आणि माझे म्हणणे मांडले होते. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे असे मत मी समितीसमोर मांडले होते. तामीळनाडू राज्याने क्वॉन्टीफाय कसे केले, त्यांनी 24 पानांचा फॉर्म कसा बनविला हे सर्व डिटेल्स मी राणे समितीसमोर सादर केले होते.

सभापती महोदया, हे सर्व झाल्यानंतर शासनाच्या विविध विभागातून कर्मचाऱ्यांचा डेटा मागविण्यास सुरुवात केली. परंतु काही विभाग जाणीवपूर्वक की नकळत राणे समितीकडे माहिती देत नाही. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राणे समितीसमोर माहिती दिलेली नाही. हे क्वॉन्टीफाय झ ााले नाही तर आपणास निर्णय घेता येणार नाही. या संदर्भात घाईघाईने निर्णय घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. दोन दिवसांत अहवाल द्या असे खालच्या स्तरावर आदेश देण्यात आले आहेत आणि त्यानुसार ते दोन दिवसात अहवाल देणार आहेत. परंतु हा अहवाल न्यायालयात टिकणार नाही. आचारसंहिता लागण्यापूर्वी सरकारला काहीतरी घोषित करायचे आहे. शासनाच्या सर्व विभागातून माहिती येणे अपेक्षित होते ती माहिती अजून प्राप्त झालेली नाही. ही सर्व माहिती गोळा करण्याचे काम बार्टी संस्थेला दिलेले आहे. त्या संस्थेकडे अजून पूर्ण माहिती प्राप्त झालेली नाही.

सभापती महोदया, या संदर्भात बापट आयोगाने अहवाल दिलेला आहे, ज्यामध्ये तीन सदस्यांनी आरक्षण देऊ नये आणि दोन सदस्यांनी आरक्षण द्यावे असे म्हटलेले आहे. आपण तो अहवाल फेटाळून तत्वत: मराठा समाजाला आरक्षण देण्याचा आम्ही विचारात आहोत अशी घोषणा मते मिळविण्यासाठी आचारसंहिता लागू होण्यापूर्वी करणार असाल तर तो निर्णय न्यायालयात

..3..



AJIT/ MMP/ D/ पूर्वी श्री.जुन्नरे. 10:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

टिकणार नाही. आपणास हा निर्णय मतांसाठी उपयोगी पडेल परंतु खऱ्या अर्थाने शैक्षणिक व आर्थिकदृष्टया मागासलेल्या मराठा समाजाला त्याचा लाभ होणार नाही. तेव्हा घाईघाईने निर्णय घेऊ नये. घटनेचे पालन न करता आपणास पुरवणी मागण्या रेटता आल्या, पण त्या विरोधात न्यायालयात जाणारी बाहेर माणसे आहेत आणि त्यांना न्यायालयात पाठविणारी माणसे तुमच्या पहिल्या बाकावर बसलेली आहेत. तेव्हा या सर्व गोष्टी काळजीपूर्वक कशा होतील याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. परंतु दुर्दैवाने शासन त्याकडे लक्ष देत नसल्यामुळे पुन्हा एकदा मराठा समाजावर आरक्षणाच्या निमित्ताने अन्याय होणार आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि श्री.नरेंद्र पाटील मोर्चा काढतील. काल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाला माननीय मुख्यमंत्री भेटले नाहीत. बहुधा ते श्री.वाकचौरे यांच्या स्वागताला गेले असतील.

सभापती महोदया, राज्यातील खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्कार देण्याच्या कार्यक्रमाला माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित न राहता ते जागा वाटपासाठी दिल्लीला गेले. तीन वर्षानी कशीबशी फाईल रेटून आणली आणि राज्यमंत्री श्री.उदय सामंत या बाराव्या खेळाडूकडून खेळाडूंना शिवछत्रपतीपुरस्कार देण्यात आला. परंतु कार्यक्रमाला मेन ओपनर बॅटस्मन्स उपस्थित राहिले नाहीत. त्यांची काय नाराजी होती ? राजकीय कामे असतात हे आम्हाला कळते, आमची देखील कामे  असतात. परंतु तीन वर्षानंतर प्रतिष्ठित असा शिवछत्रपती पुरस्कार देताना खेळाडूंच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित न राहता ते जागा वाटपासाठी दिल्लीला गेले होते. मी मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत बोलत आहे, मी जी बाब सांगितलेली आहे त्यावर बोलत आहे.  महायुतीमध्ये मराठा समाजाचा नेता विनोद तावडे आहे. आपण चिंता करण्याचे कारण नाही. दादांचा प्रश्न मला बरोबर कळला. आम्ही सच्चे आहोत, दरवेळी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करतो असे सांगून मते घ्यायची आणि नंतर तो विषय वाऱ्यावर सोडायचा, आरक्षण देतो असे सांगून मते घ्यायची आणि नंतर तो विषय वाऱ्यावर सोडायचा असे आमचे नाही. जे काही आहे ते रोखठोक.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदया, आपण आदर्शचा रिपोर्ट अंशत: स्वीकारला तसा बापट आयोगाचा रिपोर्ट स्वीकारणार काय ? कारण बापट आयोगातील दोन सदस्यांनी मराठा समाजाला आरक्षण द्यावे असे म्हटलेले आहे. तेव्हा बापट आयोगाचा रिपोर्ट आपण अंशत: स्वीकारु शकता काय हे कायद्याने तपासले पाहिजे. आपणास तसा रिपोर्ट स्वीकारता येत असेल तर आपण तो स्वीकारावा. परंतु आपण घिसाडघाईने निर्णय घेऊ नये अन्यथा तो न्यायालयात फेटाळला जाईल. आपणास मराठा समाजाला न्याय द्यायचा असेल तर आपण जागरुक राहिले पाहिजे. आपण त्यांच्या घोषणेमध्ये येण्याचे काही कारण नाही. काही माहिती मिळाली तर ती देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MMP/ D/ पूर्वी श्री.अजित.... 10:10

श्री.विनोद तावडे....

महोदया, आता मी गृह विभागाच्या बाब क्रमांक-7 वर बोलत आहे. ही बाब अबकारी म्हणजेच राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संबंधित आहे. श्री.उमेश शेट्टी यांनी त्यांच्या मालकीचा माटुंगा येथील समुद्र कंट्री लिकर बार हा तेथील इमारत पडल्यामुळे प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पूर्व) येथे शिफ्ट केला. त्या ठिकाणी सदरहू कंट्री बारच्या विरोधात महिलांचे आंदोलन सुरु आहे. कदाचित हा विषय सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांना सुध्दा माहीत असेल. त्यांचे आंदोलन सुरु असताना पोलीस उपायुक्त यांनी प्रस्तावित जागेविषयीच्या अहवालात सदरचा प्रस्तावित कंट्री लिकर बार सुरु करण्यात येणाऱ्या 75 मीटर अंतरावर साईबाबा मंदिर असून सदरची जागा रेल्वे स्टेशनच्या लगत आहे असे नमूद केले. मुळात कोणताही बार मंदिराजवळ असू नये किंवा रेल्वे स्टेशनजवळ असू नये. या संदर्भातील अहवाल सुध्दा प्राप्त झालेला आहे. नकारात्मक अहवाल असताना सुध्दा माननीय राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी समुद्र कंट्री लिकर बार सांताक्रुझ रेल्वे स्टेशनजवळ सुरु करण्यास परवानगी दिली. सदरहू लिकर बार सकाळी 7.30 ते रात्री 12.00 वाजेपर्यंत सुरु असतो. त्या ठिकाणी अक्षरश: कामावर ये-जा करणाऱ्या महिलांना दारुड्या लोकांचा त्रास होतो. त्या ठिकाणी लोक दारु पिऊन कसे पडलेले असतात याचे फोटो दाखविले होते. मध्यंतरी या बाबत उपोषण करण्यात आले. त्यावेळी लोक दारु पिऊन कसे पडतात हे चॅनेल्सवरुन लाईव्ह दाखविले. परंतु मंत्र्यांच्या दबावामुळे हे सर्व होते असे अधिकारी सांगतात. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, उमेश शेट्टी हा कोण आहे ?

**तालिका सभापती** : मी सभागृहाच्या नेत्यांना सांगू इच्छिते की, संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी उपरोक्त मुद्याची नोंद घ्यावी.

श्री.विनोद तावडे : महोदया, अधिकारी सांगत आहेत की, आम्ही निगेटीव्ह अहवाल दिलेला असताना सुध्दा दबावामुळे त्या ठिकाणी बारला परवानगी देण्यात आली आहे. माझी विनंती आहे की, त्या भागात मध्यमवर्गीय वस्ती आहे. महिला त्या ठिकाणाहून कामानिमित्त, खरेदीनिमित्त, नोकरीनिमित्त ये-जा करीत असतात. त्या सर्वांनी मिळून निवेदन दिलेले आहे. नियमात असेल तर तो बार अन्यत्र सुरु करण्यास परवानगी द्यावी. त्या बाबत आमचे काही म्हणणे नाही. परंतु तो बार सांताक्रुझ येथून बंद करावा अशी मी या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या माध्यमातून मागणी करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

महोदया, आता मी गृह विभागाच्या बाब क्रमांक-7 वर बोलत आहे. पोलीस निरीक्षक श्री.बलराज लांजिले यांनी पुणे ग्रामीण येथे मौजे चाकण, ता.खेड येथील गट क्रमांक 1814 आणि 1815 चे वास्तुविशारद यांनी बनावट संमती पत्र बनविल्याबाबत सर्वश्री राजेंद्र पोपट घनवट, राजेंद्र नारायण शेवकरी व एका अज्ञात व्यक्तीविरुध्द कलम 419, 420, 465, 467, 468 इत्यादी अन्वये गुन्हा नोंदविला. महोदय, पोलीस निरीक्षक बलराज लांजिले यांची पध्दत खोट्या केसेस करणे आहे. उक्त तक्रार पोलीस निरीक्षक बलराज लांजिले यांच्याकडे चौकशीसाठी आली असता त्यांनी सदर प्रकरणी गैरअर्जदार श्री.राजेंद्र पोपट घनवट यांना गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यासाठी 50 लाख रुपयांची मागणी करुन ती रक्कम स्वीकारली. त्यानंतर त्यांनी श्री.राजेंद्र घनवट यांना जामिनावर मुक्त केले. अशा प्रकारच्या खोट्या गुन्ह्यांची नोंद करुन अनेक नागरिकांकडून करोडो रुपयांची संपत्ती जमा करुन उद्‌गीर, जि.लातूर तसेच हवेली व लोणावळा, जि.पुणे व पुणे जिल्ह्यात अन्यत्र करोडो रुपयांची स्थावर मालमत्ता खरेदी केल्याचा मुद्दा मी गेल्या अधिवेशनात मांडला होता. सरकारने या विषयी चौकशी करण्याचे मान्य केले होते. गृह विभागाने बलराज लांजिले यांनी गोळा केलेल्या अवैध संपत्तीची उघड चौकशी करण्यासाठी दिनांक 9 डिसेंबर, 2013 रोजी आदेश दिले असून सदरहू चौकशी सुरु असल्याचे नमूद केले आहे. परंतु बलराज लांजिले यांनी श्री.राजेंद्र पोपट घनवट यांच्याकडे 50 लाख रुपयांची लाच मागून सदर प्रकरणी राजेंद्र घनवट यांना गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यासाठी घेतलेल्या लाचेची चौकशी अद्याप सुरु झालेली नाही. सभागृहात चौकशीचे आदेश दिल्यानंतर ते खालच्या अधिकाऱ्यांकडे जातात. परंतु ते अधिकारी कोणत्या बाबीची चौकशी करायची आणि कोणत्या बाबीची चौकशी करायची नाही याचा सोयीस्कर अर्थ लावतात. या संदर्भातील सर्व कागदपत्रे मी माननीय मंत्री आणि राज्यमंत्री यांच्या कार्यालयात पाठविलेली आहेत. कारण मंत्री महोदय सभागृहात येत नसल्यामुळे उत्तरे मिळत नाहीत म्हणून जे मुद्दे सभागृहात मांडायचे असतात ते मी एक दिवस अगोदर माननीय मंत्री व राज्यमंत्री यांच्या कार्यालयात पाठवित असतो.

महोदया, आता मी गृह विभागाच्या बाब क्रमांक-7, पृष्ठ क्रमांक-9 वर बोलत आहे. गृह विभागाच्या शासन निर्णय दिनांक 16 मार्च, 1999 अन्वये महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील सर्व अटी व शर्ती पूर्ण केलेल्या जवळपास 550 पैकी 300 महिला आणि 250 पुरुष पात्र उमेदवारांची

..3..



SJB/ MMP/ D/ पूर्वी श्री.अजित.... 10:10

नियुक्ती करण्यात आली. या भरती प्रक्रियेतील उमेदवारांना नियुक्ती पत्रे देऊन त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर अंतिम निवड यादी घोषित झाली. नियुक्ती झालेल्या उमेदवारांनी 5-6 महिने काम सुध्दा केले. त्यांना बक्कल क्रमांक मिळाला व त्यानंतर सेवा पुस्तक सुध्दा तयार करण्यात आले. परंतु सामान्य प्रशासन विभागाने अचानक समांतर आरक्षणाच्या नावाखाली त्यांची सेवा समाप्त केली. हे कसे होऊ शकते, का झाले ? सरकारने काही जिल्ह्यातील उमेदवारांचा प्रश्न सोडविला, परंतु काही ठिकाणी प्रश्न शिल्लक आहे. या विषयी मी माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय गृह मंत्र्यांना वारंवार पत्र पाठविले. या बाबत शासनाने विधी व न्याय विभागाकडे विचारणा केली. परंतु त्या विभागाने उलटेच उत्तर दिले. यामध्ये आपण काही राजकीय निर्णय घेणार आहात की नाही ? 550 पैकी बऱ्याच मुलींचे नोकरीच्या आधारावर लग्न झालेले आहे. परंतु शासनाच्या एका निर्णयामुळे त्यांची नोकरी गेल्याने त्यांच्या घरात विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. या सर्व बाबी त्यांनी आपल्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. तरी सुध्दा 550 उमेदवारांवर जी बेकारीची कुऱ्हाड मारलेली आहे त्या बाबत निर्णय घेतला पाहिजे. माझे म्हणणे आहे की, समांतर आरक्षणाचा मुद्दा खराही असू शकेल. तो उशिरा लक्षात आला असेल. ज्यांच्यामुळे तो उशिरा लक्षात आला असेल त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. सहा महिने नोकरी केल्यानंतर त्यांना सेवेतून काढल्यामुळे त्यांचे बसलेले घर उद्ध्वस्त होण्याची वेळ आली आहे. त्या सर्वांकडे दाद मागत आहेत. परंतु शासन त्या बाबत निर्णय घेत नाही. त्यामुळे किमान आज तरी या बाबतचा निर्णय होईल अशी मी अपेक्षा करतो.

महोदया, आता मी गृह विभागाच्या बाब क्रमांक-8 वर बोलत आहे. हा विषय तुरुंग विभागाशी संबंधित आहे. संजय दत्तचे काय प्रकरण आहे हे आम्हाला समजत नाही. तो दहशतवाद्यांबरोबर राहिल्यामुळे व त्यांच्या कटात सहभागी झाल्यामुळे टाडा न्यायालयाने त्याला शिक्षा दिली. टाडा न्यायालयाने दिलेली शिक्षा उच्च व सर्वोच्च न्यायालयाने कन्फर्म केली. एवढे होऊन सुध्दा कोणत्या ना कोणत्या नियमात बसवून त्याची दिवाळी आणि 31 डिसेंबरची रात्र घरी साजरी केली गेली. बहुधा आपल्या बहिणीच्या प्रचारासाठी सुध्दा त्याला घरी ठेवले जाणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण, हे कसे चालेल ? दहशतवाद्यांबरोबर राहिलेल्या व शिक्षा झालेल्या गुन्हेगाराला पॅरोल देणे किंवा नियम शोधून पॅरोल कसा देता येईल यासाठी प्रयत्न करणे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे खरोखरच महाराष्ट्राला भूषणावह आहे काय ? कलाकार म्हणून संजय दत्त चांगला असेल. नियमाचा फायदा संजय दत्तला मिळत असेल तर बाकीच्या गुन्हेगारांना तो का मिळत नाही ? अनेक गुन्हेगारांनी पॅरोलसाठी अर्ज केलेले आहेत. या विषयात राज्य सरकारची काय भूमिका आहे, संजय दत्तला विशेष वागणूक का दिली जाते ? संजय दत्तच्या बाबतीत कॉंग्रेस हायकमांडचे प्रेशर आहे की त्याची बहीण खासदार असल्याचा त्याला फायदा मिळत आहे हे एकदाचे सांगून टाका. तुमचा बहीण-भाऊ खासदार असेल किंवा कॉंग्रेस हायकमांडशी संबंध असतील तर कोर्टाने शिक्षा दिलेली असली तरी तुम्हाला कारागृहाऐवजी घरीच ठेवण्यासाठी नियम शोधून काढू असे एकदाचे सांगून टाका. गेल्या अधिवेशनात संजय दत्तला कारागृहात काय काय मिळते या बाबतची सविस्तर माहिती मी दिली होती. त्या वेळी राणा भीमदेवी थाटात माननीय मंत्र्यांनी सांगितले होते की, या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. मी तर म्हणेन की, अजून सरकारला डॉ.नरेंद्र दाभोलकरांचे मारेकरी सापडत नाहीत. जो सापडला तो सांगत आहे की, मला गुन्हा कबूल करण्यासाठी पैसे दिले होते. माननीय श्री.अजितदादा पवार यांना डॉ.नरेंद्र दाभोलकरांचे मारेकरी सापडत नाहीत ही खरोखरच आमच्यासाठी नामुष्कीची बाब आहे असे मीडियासमोर सांगावे लागते. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण खाली बसून मला उद्देशून बोलत आहेत की, डॉ.नरेंद्र दाभोलकरांच्या मारेकऱ्यांना शोधून काढण्यासाठी मी मदत करावी. मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून विचारु इच्छितो की, डॉ.नरेंद्र दाभोलकरांचे मारेकरी शोधण्यासाठी मदत कशी करावी हे सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनीच सांगावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांच्याकडे महत्त्वाचा मुद्दा असेल तर त्यांनी तो सांगावा. कदाचित तो उपयुक्त ठरु शकेल.

श्रीमती विद्या चव्हाण : महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते वारंवार सांगतात की, डॉ.नरेंद्र दाभोलकरांचे मारेकरी अजून सापडलेले नाहीत. त्यांच्या मताशी मी सहमत आहे. परंतु माननीय श्री.विनोद तावडे यांच्यासारखे समाजकार्य करणारे काही लोक असतात की ज्यांचे अनेक लोकांशी संबंध असतात. त्यांनीही पोलिसांना सहकार्य केले तर तपासात मदत होईल एवढेच मला सुचवायचे होते.

..5..



श्री.विनोद तावडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील अकार्यक्षम आहेत, त्यांना मदत करण्याचे सोडून द्या, त्यांना येथून हाकलले पाहिजे असे शब्द सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी उच्चारले नाहीत याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

नंतर श्री.कांबळे...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

दादा करतील ते नियम आणि आम्ही करतो ते नियम नाहीत का ? सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण ह्या बोलल्यानंतर मी जे काही बोललो ते येथील अर्ध्या सन्माननीय सदस्यांना देखील मान्य आहे. आपण त्यांना विचारावे.

आता मी गृह विभागाच्या बाब क्रमांक 8, पृष्ठ क्रमांक 10 वर बोलणार आहे. राज्य शासनातर्फे सीसीटीव्ही बसविण्याकरिता निविदा प्रक्रिया अंतिम करण्याकरिता एक उच्चस्तरीय समिती दिनांक 27 नोव्हेंबर, 2011 रोजी गठीत झाली आणि तरी सुध्दा सीसीटीव्ही बसविण्याऱ्या कंपनीची निविदा अद्याप पारित केलेली नाही. एका कार्यक्रमामध्ये मी, दादा, माननीय गृहमंत्री असे सर्वजण उपस्थित होतो. सर्वांनी सीसीटीव्हीच्या संदर्भात चिंता व्यक्त केली आणि सीसीटीव्ही कधी बसविणार या संदर्भात विचारणा केली. पुढचा हल्ला झाल्यानंतर सीसीटीव्ही बसविणार का, इतकी चिंता दर्शविणारा प्रश्न माननीय ज्येष्ठ मंत्र्यांना विचारला. सर्वांना याची खंत आहे. यामध्ये अडचण काय आहे ? मुंबईत 6 हजार सीसीटीव्ही बसविण्याची निविदा प्रक्रिया 2 वेळा रद्द केली. 864 कोटी रूपयांचे काम असताना एक हजार कोटी रूपयांची निविदा प्राप्त झाली. त्यामुळे शासनास अंतिम स्वरूप देता येत नाही, ही शोकांतिका खरी आहे का ? आम्ही लंडनहून सुटाबुटातून पाहणी करून आलेल्या आबांचा फोटो टीव्हीवर पाहिला. आबांचा कधी नव्हे तो सूट पाहिला.

श्री. अजित पवार : एक हजार कोटी रूपयांची निविदा की 10 हजार कोटी रूपयांची निविदा ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदया, 10 हजार कोटी रूपयांची निविदा प्राप्त झाली. लंडनहून सुटाबुटात आलेल्या आबांना आम्ही पहिल्यांदाच पाहिले. आता मी सर्व पाहिले आहे, आता तुम्ही बघाच असा अविर्भाव होता. परंतु, यास किती वर्षे झाले तरी हे काम होत नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पुरवणी मागण्यांवर बोलावे. माननीय गृहमंत्र्यांच्या सुटाबुटावर बोलण्याची काही गरज नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते सूटबूट घालत नाहीत का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदया, नाही घालत.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय विरोधी पक्षनेते अशा प्रकारे कोणाच्या संदर्भात उपहासात्मक बोलू शकत नाहीत. त्यांनी पुरवणी मागण्यांवर बोलावे. माननीय गृहमंत्र्यांनी किती गुन्हे रोखले, यांचे कौतुक त्यांनी कधी केले नाही. आता उपहासात्मक बोलणे बंद करावे.

**तालिका सभापती** : मी सांगू इच्छिते की, सभ्यतेच्या मर्यादेच्या चौकटीतच सर्वांनी बोलावे. आज पुरवणी मागण्यांवर बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. पुरवणी मागण्यांचा वेळ संपत आला की, दोन्ही बाजूंचे सन्माननीय सदस्य 2 मिनिटे बोलण्यासाठी वेळ मिळावा म्हणून तळमळत असतात. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सभागृहाचा वेळ वाचवावा. सभागृहाचा वेळ वाया घालवू नये.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या आक्षेप घेत आहेत. पुरवणी मागण्यांवरील चर्चेत काय बोलावे हे सांगण्याचा अधिकार सन्माननीय सदस्यांना नाही. सभागृहाची पातळी आपण खाली घसरवित आहोत की काय अशी परिस्थिती आहे. पुरवणी मागण्यांवर बोलताना रेफरन्स देण्याची पध्दत आहे. सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांकडून देखील रेफरन्स दिला जातो. दादा देखील अशा प्रकारे किती तरी वेळा बोलतात. आपण सर्व काही हसण्यावारी नेतो. आपण आसनस्थ असताना अशा प्रकारे चर्चा होणे बरोबर नाही. हे थांबले पाहिजे. काय बोलावे किंवा काय बोलू नये, हे आपण सांगू शकता. सन्माननीय सदस्य खाली बसून बोलावयास लागले तर हे बरोबर होणार नाही. हे सर्व रेकॉर्डवर येत आहे, हे दुर्दैव आहे. माझी विनंती आहे की, सभागृहाचे कामकाज आपल्या निर्देशानुसार चालले पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी भाषणास सुरूवात करावी.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदया, आम्हाला जाणून घ्यायचे आहे की, सीसीटीव्ही बसणार आहेत की नाही. आम्हाला हे जमणार नाही, आम्ही करू शकत नाही, असे शासनाचे काही आहे का, ते आम्हाला समजले पाहिजे.

आता मी जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 43, पृष्ठ क्रमांक 51 वर बोलणार आहे. उपग्रह छायाचित्रीकरण पध्दतीने वशिष्ठी नदीच्या खोऱ्यात सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सिंचनाच्या प्रयोजनार्थ कोयना अवजलाच्या वापरासाठी उपग्रहाद्वारे छायाचित्रीकरण पध्दतीने वशिष्ठी नदीच्या खोऱ्याच्या सर्वेक्षणाचे काम हाती घेण्याचे शासनाने

..3



MSK/ MMP/ D/ KTG/ पूर्वी श्री. बोर्डे 10:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठरविले आहे. परंतु, या प्रकरणाची माहिती घेतली असता 0.5 रिझोल्यूशन इमेज एका चौरस कि.मी.करिता रूपये 2 हजार एवढा खर्च येत असून सदरच्या नदी खोऱ्याच्या सर्वेक्षणाचे क्षेत्र 2200 चौ.कि.मी. असून यास फक्त 44 लाख रपये खर्च येणार आहे. याबाबत संबंधित विभागाकडे माहिती घेतली असता 5 कोटी रूपयांचा खर्च दर्शविला आहे. हा कोण आहे, काय आहे, हे आम्हाला समजले पाहिजे. तिकडून येऊन आमच्या कोकणात लूट करणार का, हे कशासाठी करता ? जे नियमात आहे ते घ्या. 40-45 लाख रूपयांचे काम 5 कोटी रूपयांपर्यंत न्यायचे हे बरोबर नाही. मुळात कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडे पैसे नाहीत. कंपनी देखील तिकडची आहे. महाराष्ट्रातील कंपनी आहे म्हणून आमचे स्वागत आहे. माझे काहीही म्हणणे नाही. माननीय राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक साहेब आपण या संदर्भात पहावे. आपण अशी लूट करू नये. सदरचे काम एडीसीसी इन्फो कॅड कंपनीला दिले आहे. निविदा मागविण्यात आल्या होत्या का, सदर कंपनीने कामासाठी किती रूपयांची निविदा दिली होती, सदर कंपनीस कामे देण्याची कारणे काय आहेत, या संदर्भात सांगावे.

आता मी महसूल विभागाच्या बाब क्रमांक 10, पृष्ठ क्रमांक 13 वर बोलणार आहे. 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वन विषयक केंद्रीय सहाय्यासाठी तरतूद करणे असा विषय आहे. गोंदिया जिल्ह्यातील मुरूम, गिट्टी, विटांची रॉयल्टी त्वरित देण्यात यावी. तसेच वन हक्क जमिनीचे पट्टे शेतकऱ्यांना ताबडतोब मिळावेत व त्यांच्या 7/12 उताऱ्यावर त्यांच्या नावांची नोंद करावी. कलपाथरी व कटंगी प्रकल्पाचे पुनर्वसन अनुदान त्वरित वाटप करण्यात येऊन कलपाथरी प्रकल्पातील अपूर्ण कालव्याची दुरूस्ती व पुलाचे बांधकाम त्वरित पूर्ण करण्यात यावे. तसेच कलपाथरी व कटंगी प्रकल्पग्रस्तांचे दाखले त्वरित देण्यात यावेत. यासाठी घरांचे पुनर्वसन अनुदान देण्यात येऊन सदर प्रकल्पग्रस्तांच्या कालव्यात गेलेल्या जमिनीस भाडेपट्टा देण्यात याया. त्या लोकांच्या या सर्व मागण्या मान्य कराव्यात, या संबंधीचे निवेदन मी वारंवार मंत्री महोदयांना दिले आहे. कलपाथरी मध्यम प्रकल्पातील मुख्य कालव्याच्या भूसंपादनाबाबतचा मोबदला त्वरित देण्यात आला पाहिजे. बुडीत क्षेत्रातील शेतजमिनीत जाणारे रस्ते तयार करण्यात यावेत. मी या सर्व मागण्यांचे निवेदन सादर केले आहे. माननीय मंत्र्यांनी त्या संदर्भातील ठोस माहिती द्यावी अशी विनंती आहे.

..4

श्री. विनोद तावडे ....

आता मी नगरविकास विभागाच्या पूरक मागणी क्रमांक एफ 2, बाब क्रमांक 20 संदर्भात बोलणार आहे. मी मागच्या वेळी देखील हा विषय मांडला होता. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे कल्याण येथे रूक्मिणीबाई रूग्णालय तर डोंबिवली येथे शास्त्रीनगर रूग्णालय सद्य:स्थितीत कार्यरत आहे. मध्य रेल्वेच्या लोकल मार्गावर कोणताही अपघात झाला तर अपघातग्रस्तांना येथे नेले जाते. मी हा विषय मागच्या पावसाळी अधिवेशनात, नागपूर अधिवेशनात मांडला होता. मात्र या संदर्भात काय अडचण आहे हे मला समजत नाही. महापालिका स्वत:च्या बजेटमधून पदे भरण्याच्या संदर्भात पैसा देणार आहे. तत्संदर्भातील फाईल आपल्याकडे पडून आहे. 4-5 वर्षे पाठपुरावा करीत आहे. रूग्णालयात कर्मचारी नाहीत. महापालिका या संदर्भात तरतूद करणार आहे. आपल्याला फक्त मान्यता द्यायची आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या वेळी सांगितले होते की, प्रोसिजरल डिले होऊ नये म्हणून आम्ही बदल करू. आपण या संदर्भात बदल कधीही करावा. किमान त्या संदर्भातील फाईल क्लिअर करावी. मी दोन वेळा अधिकाऱ्यांना भेटलो. फाईल अडविण्याचे काहीही कारण नाही. शासनावर एका पैशाचाही बोजा नाही. आपल्याला केवळ मान्यता द्यायची आहे. हा विषय मी सभागृहात दोनदा मांडला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगून देखील हे काम झालेले नाही. मी दिनांक 29 ऑक्टोबर, 2012 पासून संबंधित विभागाकडे पाठपुरावा करीत आहे. कर्मचारी कमी असल्यामुळे रूक्मिणीबाई रूग्णालयातील पदे वाढविण्याच्या संदर्भातील प्रस्तावास मंजुरीची गरज आहे. माझे तर म्हणणे असे आहे की, ज्या अधिकाऱ्याने फाईल दाबून ठेवली आहे त्याच्यावर कारवाई करावी. मी परवाच्या दिवशी माहिती घेऊन पत्र दिले.

आता मी नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 22, पृष्ठ क्रमांक 26 बाबत बोलणार आहे. पंढरपूर शहरात मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. हे काम आपले लाडके प्रभाकर देशमुख यांच्या देखरेखीखाली सुरू आहे. शहर विकास आराखड्यात बदल करण्याचा अधिकार विभागीय आयुक्तांना नसताना त्यांनी विकास आराखड्यात बदल केले आहेत अशी माझी माहिती आहे. मूळ आराखड्यानुसार अंतर्गत रस्त्यांसाठी बाधित होत असलेल्या काही धनदांडग्यांच्या इमारती वाचविण्यासाठी आयुक्तांनी रस्ता रूंदीकरणाच्या आराखड्यात बदल केले आहेत अशा तेथील काही लोकांच्या तक्रारी आहेत.

..5



श्री. विनोद तावडे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पंढरपूर शहरात सुरू असलेल्या कोट्यवधी रूपयांच्या कामांच्या निविदा विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयातून काढल्या जातात व कामासाठी आवश्यक असणारे ठेकेदारही पुण्यातूनच ठरविले जातात. ते ठीक आहे. नियमाने निविदा जेथून येतील त्या घेतल्या जात असतील. पण निविदेमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्यक्षात दीड फुटांची फुटपाथ असताना अनेक ठिकाणी फुटपाथ कमी जास्त करण्यात आली आहे. त्या संदर्भात परीक्षण नाही, त्याच्या क्वॉलिटीविषयी तपासणी नाही. पंढरपूर शहरात विभागीय आयुक्त, पुणे यांच्या देखरेखीखाली कामे अतिशय निकृष्ट दर्जाची होत असून शासनाच्या करोडो रूपयांच्या निधीचा अपव्यय होत आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ D/ MMP/ D/ KTG/ प्रथम श्री.मंगेश कांबळे....... 10:30

श्री.विनोद तावडे........

देहू, आळंदी, भंडारा डोंगर, सासवड या सर्व ठिकाणच्या कामांची सरकारने चांगल्या पध्दतीने चौकशी केली पाहिजे.

सभापती महोदया, नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 119 वरील बाब क्रमांक 24 च्या माध्यमातून सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन आणि कार्यालयीन खर्चासाठी तरतूद केली आहे.

सभापती महोदया, कुंभमेळ्याच्या निमित्ताने लाखो भाविक येत असतात. परंतु, शासन या सर्व कामांच्या बाबतीत उदासीन असल्याचे निराशाजनक चित्र आज आपल्याला दिसून येत आहे. या सर्व कामांसाठी विशेष कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे आणि या कृती आराखड्याच्या माध्यमातून तेथील मूलभूत सुविधा आणि सुरक्षात्मक उपाययोजना आखून कामे सुरु करण्याची गरज आहे. परंतु, तशा प्रकारची कार्यवाही शासनाकडून होत असल्याचे दिसून येत नाही. अलाहाबाद येथे झालेल्या कुंभमेळ्यासाठी तेथील राज्य सरकारने 1200 कोटी रुपयांचा निधी दिला होता व अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याचा पुरेपुर प्रयत्न केला होता. नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी लाखोंच्या संख्येने भाविक येणार आहेत. ही संख्या लक्षात घेऊन विशेष कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. कृती आराखडा तयार केल्यामुळे तेथे निर्माण होणाऱ्या सोयी-सुविधांचा फायदा जनतेला दीर्घ कालावधीसाठी आणि कायमस्वरुपी मिळू शकतो. सध्या आपण वर्तमानपत्रातून हे वाचत असतो की, त्या ठिकाणी गोदावरीमध्ये.........

श्री.रामदास कदम : सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षनेते पुरवणी मागण्यांवर आपले विचार मांडत आहेत. त्यांनी त्यांचे भाषण करावे, आमची त्याला काही हरकत नाही. परंतु, या चर्चेसाठी वेळ कमी आहे आणि दुपारी 2.00 वाजता ही चर्चा संपणार आहे. भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेच्या अन्य सन्माननीय सदस्यांना या चर्चेत भाग घ्यायचा आहे. त्यामुळे वेळेचे वाटप कसे करण्यात आले आहे, याची माहिती आपण दिली तर बरे होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सत्तारुढ पक्षाचे कमीतकमी सन्माननीय सदस्य पुरवणी मागण्यांवरील चर्चेत बोलतील, असे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरले आहे, याची मी या निमित्ताने आठवण करुन देतो.

...2....

**तालिका सभापती** : या चर्चेसाठी मंत्र्यांच्या उत्तरासह एकूण 4 तासांचा वेळ उपलब्ध आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी नेमके मुद्दे मांडले तर जास्तीत जास्त सन्माननीय सदस्यांना या चर्चेत भाग घेता येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदया, मंत्री महोदय अर्धवट तयारी करुन चर्चेला उत्तर देतात व त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नाही.

सभापती महोदया, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 30, पृष्ठ क्रमांक 38 अन्वये मार्ग, पुलांच्या बांधकामाकरिता तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदया, रत्नागिरी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता श्री.धोत्रेकर यांच्या भ्रष्ट कारभाराच्या काही बाबी निदर्शनास आल्यानंतर संबंधित मंत्री महोदयांनी त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा निर्णय घेतला. परंतु, त्या जिल्ह्यातील मंत्री महोदयांनी त्याला हरकत घेतली. एखादा अधिकारी एवढा लाडका नसावा की, मंत्री महोदयांनी ॲक्शन घेतल्यानंतर त्या अधिकाऱ्याला आपल्या एरियामध्ये दाबून ठेवायचे. त्या खात्याचे मंत्री या अधिकाऱ्यावर कारवाई करतात. दुसरा अधिकारीही लाडका होऊ शकतो. पण हा अधिकारी त्या जिल्ह्यातील मंत्र्यांचा लाडका असल्यामुळे कारवाई होत नाही. या अधिकाऱ्याने कोणकोणत्या चुकीच्या गोष्टी, कशा पध्दतीने केलेल्या आहेत, ही माहिती पुराव्यानिशी आणि कागदपत्रानिशी दिलेली आहे. असे असताना कुठली सामंतशाही कारवाईला आडवी येत आहे ? हे बरोबर आहे का ? मंत्री महोदय तरुण आहेत, त्यांना चांगली संधी मिळाली आहे. त्यामुळे अशा गोष्टीतून बदनामी होण्याचे त्यांनी टाळावे. एखादा अधिकारी गेला तर दुसरा अधिकारी मिळू शकतो. त्यामुळे त्यांनी त्या अधिकाऱ्याला लवकर मोकळे करावे. अन्यथा, तेवढाच इश्यू होऊन बसेल. (अडथळा) सभापती महोदया, मी 'सामंतशाही', असे म्हणालो आहे, 'उदय सामंत', असे नाव घेतलेले नाही. यांना का बोचते ? असे असेल तर 'जो खाई, त्याला खवखवे', असेच म्हणावे लागेल. या अधिकाऱ्याने केलेल्या खर्चाचा कोणताही हिशेब दिलेला नाही, लॉगबुक भरलेले नाही. डिझेलसारख्या खर्चाच्या बाबींमधून पैसे खाण्याचे उद्योग केले आहेत. कशातूनही पैसे खायचे. अशा अधिकाऱ्याचे समर्थन का करायचे ? राजकीय क्षेत्रात कसे पुढे जायचे, याबाबत तरुण मित्रांनी एकमेकांना सल्ले दिले पाहिजेत.

...3....



SRR/ D/ MMP/ D/ KTG/ प्रथम श्री.मंगेश कांबळे....... 10:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

सभापती महोदया, वैद्यकीय शिक्षण विभागाची पृष्ठ क्रमांक 88 वरील बाब क्रमांक 68 अन्वये करण्यात आलेल्या तरतुदीसंबंधी यापूर्वीही मी सभागृहात विषय उपस्थित केला होता. हा विषय असा आहे की, राज्यात काही नर्सिंग कॉलेजेस आहेत. ज्यांना डॉक्टर व्हायचे आहे, त्यांना सीईटी द्यावी लागते आणि तीच सीईटी नर्सिंग अभ्यासक्रमासाठीही द्यावी लागते. जी सीईटी डॉक्टरी अभ्यासक्रमासाठी आहे, तीच नर्सिंग अभ्यासक्रमासाठी आहे. जे सीईटी उत्तीर्ण होतात, ते डॉक्टरी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतात आणि नर्सिंग अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त राहतात. जागा रिक्त असल्यामुळे बारावी उत्तीर्ण मुले नर्सिंग अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतात. परंतु, या विद्यार्थ्यांनी सीईटी परीक्षा दिली नसल्यामुळे प्रवेश नियंत्रण समितीने त्यांचे प्रवेश रद्द केले आहेत. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची वेळ आली आहे. या प्रकरणात राज्याच्या विधी व न्याय विभागाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय कशासाठी आहे ? विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य वाचविण्यासाठी शासन काही पावले उचलणार आहे की नाही ? उप मुख्यमंत्री महोदयांनी आणि माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी प्रवेश सुरु राहिले पाहिजे, हे मान्य केले आहे. या विद्यार्थ्यांची परीक्षा झाली असून त्यांचे निकाल राखून ठेवण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला देऊन निकाल जाहीर करण्यात येणार नाहीत, असे सांगितले जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, या प्रकरणात शासनाने निर्णय घ्यावा. परंतु, शासन निर्णय घेण्यास तयार नाही. माझी शासनाला अशी विनंती आहे की, या प्रकरणी आजच सभागृहात निर्णय घोषित करावा आणि सीईटी न दिलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित करावेत. त्याच प्रमाणे त्यांचे परीक्षेचे पेपर तपासून निकाल जाहीर करावा.

सभापती महोदया, सहकार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 109 वरील बाब क्रमांक 79 च्या माध्यमातून मला शासनाच्या हे निदर्शनास आणावयाचे आहे की, मुंबई शहरात एकूण 23496 सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. यापैकी आजपर्यंत 1012 सहकारी गृहनिर्माण संस्थांचे डिम्ड कन्व्हेअन्स झालेले आहे. डिम्ड कन्व्हेअन्सच्या निर्णयाबाबत उप मुख्यमंत्री महोदय आणि गृहनिर्माण राज्यमंत्री श्री.सचिन अहिर यांच्या फोटोसहीत जाहिराती मोठ्या प्रमाणावर झळकत आहेत.

...4....



श्री.विनोद तावडे........

आतापर्यंत दूरचित्रवाणीवर 8 ते 10 हजार वेळा या जाहिराती दाखविण्यात आल्या असल्या तरी फक्त 1012 गृहनिर्माण सहकारी संस्थांचे डिम्ड कन्व्हेअन्स झाले आहे. शासनाने जाहिरात करावी, तो त्यांचा अधिकार आहे. परंतु, एका जहिरातीमुळे किमान एक तरी डिम्ड कन्व्हेअन्स झाले पाहिजे, अशी अपेक्षा आहे. हल्ली मोठ्या प्रमाणावर जाहिराती दिल्या जात आहेत. राजीव गांधी आवास योजनेची जाहिरात दिली जात आहे. पण एकही घर बांधून झालेले नाही. माझे म्हणणे हे आहे की, आतापर्यंत एवढ्या कमी संख्येने डिम्ड कन्व्हेअन्सची प्रकरणे का झाली ? यामध्ये नेमक्या कोणत्या अडचणी आहेत ? माझ्या माहितीप्रमाणे संस्थांनी डिम्ड कन्व्हेअन्ससाठी अर्ज केल्यानंतर त्यांच्याकडून वेगवेगळी कागदपत्रे मागितली जातात. कारण, संबंधित उप निबंधकांना वाटा मिळत नाही. या उप निबंधकांनी, सह निबंधकांनी कन्व्हेअन्ससाठी रीतसर दर ठरविला आहे. केवळ 4 टक्के संस्थांचे जमिनीचे हस्तांतरण पूर्ण झाले असतात, दररोज शासनाच्या जाहिराती झळकत असताना संबंधित उप निबंधक, सह निबंधक भ्रष्टाचार करण्यास धजावतात. माझी महसूल मंत्री महोदयांना विनंती आहे की, जाणीवपूर्वक डिम्ड कन्व्हेअन्स होऊ न देणारे उपनिबंधक, सह निबंधक कोण आहेत, त्यांनी किती दर ठरविला आहे, याची एकदा चौकशी करावी. हे अधिकारी केवळ सहकारी संस्थांकडूनच पैसे घेतात असे नाही तर डिम्ड कन्व्हेअन्स न होऊ देण्याचा मोबदला म्हणून विकासकांकडूनही पैसे घेतात आणि प्रकरण प्रलंबित ठेवतात. अशा उप निबंधक, सह निबंधकांविरुध्द सरकार कोणती कारवाई करणार आहे ? ठराविक कालावधीत डिम्ड कन्व्हेअन्स झाले नाही तर कन्व्हेअन्स झाले आहे, असे समजण्यात यावे, असा जो निर्णय घेण्यात आला होता, त्याप्रमाणे कार्यवाही का होत नाही, याबाबतची माहिती देखील मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणातून द्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, पर्यावरण विभागाच्या बाब क्रमांक 78 च्या माध्यमातून डोंबिवली एमआयडीसीच्या संदर्भातील मुद्दा मला उपस्थित करावयाचा आहे. या ठिकाणी हिरवा पाऊस पडला. ज्याप्रमाणे लोटे-परशुराम येथे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण झाले आहे, त्याप्रमाणे येथेही झाले आहे. परंतु, नेमके प्रदूषण कोणत्या कंपनीमुळे झाले आहे, कशा प्रकारे झाले आहे, याची चौकशी

...5....





श्री.विनोद तावडे.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

न करता सरसकट डोंबिवलीतील सर्व कंपन्या बंद करण्याचे आदेश संबंधित विभागाने दिले आहेत. ज्या कंपन्यांमुळे प्रदूषण झाले आहे, त्या दोन-पाच कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याऐवजी सरसकट सर्व कंपन्यांवर कारवाई का करण्यात आली आहे ? प्रदूषणासंदर्भातील सर्व मापदंडांचे पालन करुन जे आपले उद्योग चालवित आहेत, त्यांच्यावर कारवाई न करता ज्यांच्यामुळे प्रदूषण निर्माण झ ााले आहे, त्यांच्यविरुध्द कारवाई होणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.मारोती शिगम......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री.रोझेकर 10:40

श्री. विनोद तावडे ...

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 75 वरील बाब क्रमांक 61मध्ये अस्थिविकलांग व्यक्तींसाठी काम करणाऱ्या अशासकीय संस्थांसाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. शासनाकडे समाजकल्याण संस्थांना अनुदान देण्याकरिता कोटयवधी रुपये आहेत. परंतु मतिमंद मुलांसाठी कार्यरत असणाऱ्या सेवाभावी संस्थाना अनुदान देण्याच्या बाबतीत शासन सर्रास दुर्लक्ष करीत आहे. मी एक उदाहरण देतो. पेण, जिल्हा रायगड येथील सुहित जीवन ट्रस्ट नावाची संस्था गेल्या 10 वर्षापासून मतिमंद मुलांसाठी कार्य करीत आहे. या संस्थेमार्फत मतिमंद मुलांना सांभाळण्याचे, त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे काम ही संस्था करीत आहे. या संस्थेने अनुदान मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला असून हा प्रस्ताव शासनस्तरावर मागील 7 वर्षापासून प्रलंबित आहे. या बाबतीत सदर संस्थेने शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुन देखील त्या संस्थेला अद्याप अनुदान मिळालेले नाही. सुहित जीवन ट्रस्ट ही रायगड जिल्ह्यातील एकमेव संस्था आहे. समाजाचा एक अविभाज्य घटक असलेल्या या मतिमंद मुलांना जगण्याची नवी उमेद देणा-या अशा सेवाभावी संस्थांचा शासनाने खरे तर गौरव करण्याची आवश्यकता आहे. म्हणून या संस्थेला अनुदान देण्याच्या बाबतीत सरकारकडून विशेष अपेक्षा आहे.

माननीय तालिका सभापती महोदया, महिला व बालविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 119 वरील बाब क्रमांक 89 मध्ये राज्यातील मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी सुकन्या योजनेकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. ही योजना देखील मी मघाशी उल्लेख केलेल्या डीम्ड कन्व्हेयन्स सारखीच आहे. राज्यातील 12 कोटी लोकसंख्येपैकी 6 कोटी महिला असून त्यापैकी 2 कोटी महिला दारिद्र्य रेषेखालील आहेत. महाराष्ट्र शासनाने मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी सुकन्या योजनेसाठी 4.5 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक महिलेला 2 लाख रु.ची मदत मिळणार असल्याने केवळ 2250 महिलांनाच या योजनेचा फायदा होईल.

माननीय तालिका सभापती महोदया, महिला व बालविकास विभागाने बलात्कार झालेल्या महिलांच्या बाबतीत एक योजना आणलेली आहे. मागील अधिवेशनामध्ये महिला व बालविकास मंत्री महोदया प्रा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले की, शासनाने या योजनेअंतर्गत 5 महिलांना आर्थिक मदत केलेली आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, क्राईम रिपोर्ट प्रमाणे आतापर्यंत 900 महिलांवर बलात्कार झालेले आहेत. त्यामधील केवळ 5 महिलांना आर्थिक मदत मिळालेली आहे. अन्य

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

महिलांना ती मिळालेली नाही. तेव्हा शासनाने बलात्कार झालेल्या महिलांना आर्थिक मदत देण्याची जी योजना सुरु केलेली आहे त्या योजनेअंतर्गत किती महिलांना आर्थिक मदत करण्यात आली आणि किती महिलांना ती करण्यात येणार आहे याबाबतची माहिती मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणातून सदनाला मिळेल अशी अपेक्षा करुन मी माझे भाषण संपवितो.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री.रोझेकर 10:40

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : माननीय तालिका सभापती महोदया, सन 2013-2014च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बाब क्रमांक 56, पृष्ठ क्रमांक 74. राज्यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या ही राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 10.2 टक्के इतकी आहे. त्यानुसार राज्याच्या एकूण वार्षिक योजनेच्या 2.2 टक्के इतका नियतव्यय अनुसूचित जाती उपयोजनेकरिता उपलब्ध झालेला आहे. या अनुसूचित जाती उपयोजनेकरिता आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्यासाठी कायदा करावा व यासाठी केन्द्र शासनाकडे शिफारस करावी.

नगरविकास विभाग, बाब क्रमांक 20, पृष्ठ क्रमांक 26. झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत मुंबईसह प्रमुख शहरातील 2000 पर्यंतच्या झोपड्या अधिकृत करण्याचे आश्वासन कॉंग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात दिलेले होते. या आश्वासनाची त्वरित अंमलबजावणी करावी.

सामाजिक न्याय व विशेष्य सहाय्य विभाग, बाब क्रमांक 65, पृष्ठ क्रमांक 76. समाजकल्याण संस्थांची अनुदाने. वैश्यवाणी समाजासह 5 जातींचा इतर मागासवर्गामध्ये समावेश करण्याचा निर्णय राज्य शासनाने नुकताच घेतलेला आहे. वैश्यवाणी सोबत गावडा, सबलिगा, धोबी, परीट, मडवळ, नामदेव शिंपी यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्याचा क्रांतिकारक निर्णय शासनाने घेतलेला आहे. या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करावी अशी मी कळकळीची विनंती करतो.

नगरविकास विभाग, बाब क्रमांक 20, पृष्ठ क्रमांक 26. एमएमआरडीएचा जलवाहतूक प्रकल्प हा बरेच दिवस प्रलंबित राहिलेला आहे. मांडवा ते भाऊचा धक्का ते नेरुळ तसेच नरिमन पॉईण्ट ते बोरीवली दरम्यान जलवाहतूक सुरु करण्याचे विचाराधीन आहे. ही जलवाहतूक त्वरित सुरु करावी अशी माझी विनंती आहे. त्याच प्रमाणे मुंबई ते गोवा ही जलवाहतूक शासन केव्हा सुरु करणार आहे, या बाबतीत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे काय याची माहिती मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी.

माननीय तालिका सभापती महोदया, शेवटी मी पर्यटन विभागाच्या बाबीवर बोलत असताना असे निदर्शनास आणू इच्छितो की, देशातील एकमेव आणि सर्वश्रेष्ठ असा सीवर्ल्ड प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये होत आहे. हा प्रकल्प सात महासागराची प्रतिकृती असून या प्रकल्पाचे काम मंदगतीने

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुरु आहे. या कामाला शीघ्रगतीने सुरुवात करावी अशी शासनाला विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : माननीय तालिका सभापती महोदया, सन 2013-2014च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

माननीय तालिका सभापती महोदया, 26 जानेवारीचे संचलन प्रतिवर्षाप्रमाणे शिवाजी पार्क येथे न होता ते यावर्षी नरिमन पॉईण्ट येथे करण्यात आले. या संदर्भात सर्व पक्षांच्या नेत्यांबरोबर विचारविमर्श करण्यात आला होता. त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, या संचलनामध्ये तीनही दले सामील होतील. शिवाजी पार्क येथे आजूबाजूच्या परिसरामध्ये इमारती आहेत. अशा ठिकाणी विमानांच्या कवायती करणे योग्य नसल्यामुळे नरिमन पॉईण्ट येथे संचलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. दिमाखदार संचलन लोकांना पहावयास मिळेल यासाठी नरिमन पॉईण्ट येथील संचलनास आम्ही देखील सहमती दिली. त्या ठिकाणी एका गोष्टीचा मला खेद वाटला. ती गोष्ट मी ताबडतोबीने शासनाच्या निदर्शनास आणून दिली. आपल्या शासनाला नेमके काय झाले आहे तेच कळत नाही. या सदनातील माझी संपूर्ण टर्म शासनाला मराठी येते की नाही हे विचारण्यात गेली. कारण राजभाषेचा अवमान होतोय हे शासनाला कळत होते. या सदनामध्ये "आदर्श"चा इंग्रजी भाषेतील अहवाल ठेवण्यात आला होता आणि त्यावेळी देखील मी हरकत घेऊन सांगितले होते की, हा अहवाल मराठीमध्ये नाही. मी हे सांगत होतो की, नरिमन पॉईण्ट येथे संचलन करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आम्हाला त्या ठिकाणी विमानांच्या कवायती दिसल्या नाहीत. संचलनाच्या वेळी जो ड्रेसकोड होता त्याबाबत मला प्रश्न पडलेला आहे. त्या दिवशी सचिव दर्जाचे सर्व अधिकारी काळा कोट घालतात. त्या दिवशी राज्याचे माननीय मुख्यमंत्री महोदय आणि मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी हे देखील काळा कोट घालून आले होते. त्यामुळे अधिकारी कोण आणि मुख्यमंत्री कोण हे समजत नव्हते. त्या ठिकाणी काळा कोट घालून सर्वजण फिरत होते आणि ते दृश्य देखील विचित्र दिसत होते. मी त्या ड्रेसकोड बाबत माहिती घेतली असता मला समजले की, ब्रिटीशांच्या काळापासून आतापर्यंत हा ड्रेसकोड चालत आलेला आहे. जेव्हा हे अधिकारी संध्याकाळी चहापानाच्या वेळी राजभवनावर आले त्यावेळी काळा ड्रेस नव्हता. ते दुसरा कोट व टाय परिधान करुन आले होते. शिवतीर्थावरील संचलनाच्या वेळी मंत्री महोदय, आमदार, न्यायाधीश हे सर्व एका रांगेत बसत असत. यावेळी झालेल्या संचलनाच्या वेळी खास व्यासपीठ उभारण्यात आले होते. त्या व्यासपीठावरील आसन व्यवस्थेवर प्रत्येकाच्या नावाचे फलक लावण्यात आले होते. हे सर्व फलक

...6..



इंग्रजीमध्ये लावलेले होते. हे फलक इंग्रजीमध्ये का लावण्यात आले अशी मी त्यावेळी विचारणा केली होती ? या देशातील प्रत्येक नागरिकाला मराठी येत नसले तरी देवनागरी येते. प्रत्येकजण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हिंदीमध्ये आपले नाव वाचू शकतो. राज्य सरकारने ही जी इंग्रजीची लाचारी पत्करलेली आहे ती योग्य नाही. तेथील संचलन लाईव्ह टेलिकास्ट होत आहे हे माहीत असताना देखील त्या ठिकाणचे सर्व इंग्रजी नावाचे फलक मी फाडणार होतो. परंतु देशाच्या प्रजासत्ताक दिनाचा सोहळा होता म्हणून मी माझ्या मनाला आवर घातली आणि मी माझा निषेध नोंदविला. शासन अशा प्रकारच्या गोष्टी जाणूनबुजून करीत आहे का ? मी पुनश्च त्या गोष्टीचा निषेध करतो आणि वारंवार राजभाषेचा अवमान करणाऱ्या या शासनाला कधी तरी सुबुध्दी येईल का अशी विचारणा करतो. या विषयावर मी सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 5 च्या निमित्ताने माझे मत मांडलेले आहे.

तालिका सभापती महोदया, महाराष्ट्रामध्ये ज्या विषयासंदर्भात ज्वलंत प्रतिक्रिया उमटलेल्या आहेत असेच महत्वाचे विषय मी या ठिकाणी मांडणार आहे.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

सभापती महोदय, टोलचा विषय हा अतिशय गंभीर आहे. कोल्हापूर शहरातील टोल वसूल करण्याच्या प्रश्नावरुन तीन वर्षे संघर्ष सुरु आहे. कोल्हापूर शहर टोल मुक्त व्हावे म्हणून त्या शहरातील सर्व जनता रस्त्यावर उतरली. मी त्या विषयाचा मागोवा घेतला. आंदोलनकर्त्यांना विचारले की, टोलची वसुली वाहनधारकांकडून केली जात असताना टोल रद्द करा अशी तुम्ही मागणी का करीत आहात? या प्रश्नाचा शोध घेत असताना धक्कादायक बाब पुढे आली ती मी सभागृहासमोर मांडू इच्छितो. आज कोल्हापूर शहरातील टोल वसुली रद्द झाली आहे असे शासनाला जाहीर करावे लागेल.

सभापती महोदय, माझ्याकडे कोल्हापूर शहरातील रस्ते बांधणे आणि टोल वसूल करणे या संदर्भातील करारनाम्याची प्रत उपलब्ध आहे. हा करारनामा इंग्रजी भाषेत तयार केलेला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि आयआरबी कंपनी यांच्यामध्ये झालेला करारनामा आहे. महाराष्ट्रातील टोल वसुलीच्या बाबतीत सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांना गुन्हेगार ठरविले जात आहे. परंतु माननीय मंत्री श्री.जयदत्त क्षीरसागर हे साव आहेत का? महाराष्ट्रातील टोल वसुली करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा अधिक वाटा आहे. हे महामंडळ माननीय मंत्री श्री.जयदत्त क्षीरसागर यांच्या विभागाच्या अधिपत्याखाली आहे. असे असताना टोलच्या प्रश्नाबाबत जनतेचे समाधान करण्यासाठी ते कधी पुढे आल्याचे दिसत नाहीत. माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांची मान आवळून त्यांना मारण्याची भाषा केली जाते. त्याबद्दल कोणी निषेध केला नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि आयआरबी या दोन कंपन्यांमध्ये जो करार झाला त्या करारानुसार कोल्हापूर शहरामध्ये रस्ते बांधत असताना कोल्हापूर महानगरपालिकेला त्या क्षेत्रातील मान्यताप्राप्त घटक म्हणून सामावून घेतले आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आयआरबी कंपनीला रस्ते बांधण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिले आहे त्या रस्त्यांच्या भागामध्ये येणा-या झोपड्या हटविणे, इतर अडचणी सोडविणे, विजेचे खांब असल्यास ते हटविणे, जमीन उपलब्ध नसल्यास ती उपलब्ध करुन देणे याकरिता कोल्हापूर महानगरपालिकेला या करारामध्ये सामावून घेण्यात आले आहे. या करारामध्ये असे म्हटले आहे की, 'K.M.C. will provide 30,000 Sq.m.of land.' ही जबाबदारी कोल्हापूर महानगरपालिकेची आहे.

..2..

25-02-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) I.2

श्री.दिवाकर रावते......

कोल्हापूर शहरामध्ये जे रस्ते बांधण्यात येतील त्याकरिता कोल्हापूर महानगरपालिकेचा वाटा 10 टक्के, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा वाटा 40 टक्के आणि आरआरबी कंपनीचा वाटा 50 टक्के असणार आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ सभागृहात बसलेले आहेत. ते दूरदर्शनच्या माध्यमातून कोल्हापूर शहरातील जनतेला सांगत होते की, आम्ही पैसे देऊ, कोल्हापूर महानगरपालिका पैसे देईल आणि कोल्हापूर शहर टोलमुक्त करण्यात येईल. वास्तविक कोल्हापूर महानगरपालिकेचा टोल वसुलीच्या विषयाशी काही संबंध नाही. मंत्री महोदयांनी या प्रश्नाचा अभ्यास केला पाहिजे. महानगरपालिका पैसे देईल असे मंत्री महोदय जाहीरपणे सांगत होते. महानगरपालिकेची ही जबाबदारी नाही. महानगरपालिकेचा वाटा फक्त 10 टक्के होता. 30 हजार चौ.मी.जमीन महानगरपालिकेने आयआरबी कंपनीला दिली आहे. हा व्यवहार 400 ते 450 कोटीचा आहे असे सांगितले जात असले तरी मी त्याच्या तपशीलात जाऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ हे कोल्हापूरचे आहेत. कोल्हापूर शहरातील 30 हजार चौ.मी. जमीन या कंपनीला दिली गेली आहे. 30 हजार चौ.मी. जमिनीवर 3.25 लाख चौ.फूट बांधकाम करता येते. ही संपूर्ण जमीन 99 वर्षाच्या लिजने दिली गेली आहे. कायद्यात असे म्हटले आहे की, कोणालाही 30 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी जमीन भाडे तत्वावर देता येणार नाही. तरी देखील महानगरपालिकेने आयआरबी कंपनीला 99 वर्षाच्या भाडे तत्वावर जमीन दिली आहे. 99 वर्षानंतर ती जमीन परत घेतली जाईल. त्या अनुषंगाने करार झालेला आहे. आज त्या जमिनीची किंमत काय आहे? पंचताराकित हॉटेल बांधण्यासाठी ती जमीन देण्यात आली आहे. रस्ते बांधण्यासाठी जो खर्च आला त्यापोटी 400 ते 450 कोटी रुपये वसूल देखील झाले आहेत. महानगरपालिकेची जमीन आयआरबी कंपनीच्या नावावर हस्तांतर झाली आहे. 99 वर्षाच्या भाडे तत्वावर जमीन दिलेली असताना कोल्हापूर शहर टोलमुक्त का होत नाही? महानगरपालिकेने पैसे का द्यायचे? हा आर्थिक विषय स्थानिक पातळीवरील आहे.

सभापती महोदय, शिवशाही सरकारच्या काळात आम्ही मुंबई शहरामध्ये 56 उड्डाणपूल बांधले, त्यावेळी विरोधी पक्षाकडून असे सांगितले गेले की, फक्त मुंबई शहरात पैसे खर्च केले जात असतील तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागाने काय करायचे? मुंबई शहरातील उड्डाणपूल

...3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

वापरणा-यांकडून खर्च का वसूल केला जात नाही असा आक्षेप घेण्यात आला होता. शिवशाही सरकारने त्यावर उपाय शोधून काढला. मुंबई शहरामध्ये पेट्रोल आणि डिझेलवर प्रती लीटर 1 रुपया अधिभार लागू करण्यात आला. उड्डाणपुलाचा वापर ज्या वाहन धारकांकडून केला जातो त्यांच्यावर अधिभार लागू करण्यात आला. रस्त्याचा वापर करणाऱ्या सामान्य जनतेवर त्याचा बोजा लादण्यात आला नाही. आजही तो अधिभार वसूल केला जात आहे आणि शासनाच्या तिजोरीमध्ये रक्कम जमा होत आहे.

सभापती महोदय, आज कोल्हापूर शहरामध्ये 32 पेट्रोल पंप आहेत. प्रत्येक पेट्रोल पंपावर दररोज सरासरी 2000 लीटर पेट्रोल आणि डिझेलची विक्री होते. प्रत्येक पेट्रोल पंपाची दररोज उलाढाल आजच्या पेट्रोल आणि डिझेलच्या दरानुसार 99,340 रुपये इतकी आहे. शहरातील 32 पेट्रोल पंपांची दैनंदिन उलाढाल 95,78,880 रुपये इतकी असल्याची माहिती त्यांच्या असोसिएशनकडून देण्यात आली आहे. प्रत्येक पेट्रोल पंपाची मासिक उलाढाल 89,80,200 रुपये इतकी असून 32 पेट्रोल पंपांची मासिक उलाढाल 28,73,66,473 रुपये इतकी आहे. प्रत्येक पेट्रोल पंपाची वार्षिक उलाढाल 10.92 कोटी रुपये असून 32 पेट्रोल पंपांची वार्षिक उलाढाल 349 कोटी रुपये आहे. कोल्हापूर शहरामध्ये एका वर्षात 349 कोटी रुपयांचे पेट्रोल व डिझेल वापरले जाते.

सभापती महोदय, शिवशाही सरकारने मुंबई शहरातील वाहनधारकांवर अधिभार लावण्याचा जो निर्णय घेतला त्याच धर्तीवर कोल्हापूर शहरासाठी अधिभार लागू करण्याचा निर्णय आघाडी सरकार का घेत नाही? महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि आयआरबी कंपनीमध्ये जो करार झाला आहे त्यानुसार 40 टक्के वाटा महामंडळाचा आहे. 450 कोटी रुपयांची जमीन त्या कंपनीला दिली गेली आहे. कोल्हापूर शहरामध्ये टोल वसुलीवरुन रोज जो संघर्ष सुरु आहे त्यातून सर्वसामान्य जनतेवर गुन्हे दाखल केले गेले आहेत. जनता आजही संघर्ष करीत आहे. विषय सोपा असताना लोकांना आंदोलन करण्यासाठी रस्त्यावर उतरण्यास भाग पाडले जात आहे. माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ या ठिकाणी उपस्थित आहेत. लोकांना आंदोलन करण्यास भाग पाडणे कितपत योग्य वाटते? रस्त्यांचा वापर करणारे वाहनधारक पेट्रोल डिझेलवर अधिभार भरतील आणि सरकारच्या तिजोरीत पैसा जमा होईल. कोल्हापूर शहरामध्ये पेट्रोल डिझेलवर

...4...

25-02-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) I.4

SGB/ D/ KTG/ 10:50

श्री.दिवाकर रावते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिभार लागू करण्याचा निर्णय सरकार का घेत नाही? यामध्ये महानगरपालिकेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. आयआरबी कंपनीला लिजवर जमीन दिली गेली असेल तर तातडीने कोल्हापूर शहर टोलमुक्त झाले पाहिजे. टोल वसुलीच्या विरोधात ज्यांनी संघर्षात भाग घेतला त्यांच्यावर दाखल केलेले गुन्हे तातडीने मागे घेतले जातील असे शासनाने जाहीर करावे. टोल वसुलीच्या विरोधात लोकांचा इतका प्रक्षोभ का होता? सामान्य माणसे टोल नाक्यावरील कार्यालयाच्या काचा फोडू शकत नाहीत. ते कोणत्या राजकीय पक्षाचे कार्यकर्ते नव्हते. सर्वसामान्य जनतेचा टाहो तुम्हाला ऐकू येत नसेल तर ही बाब गंभीर आहे. या प्रश्नामध्ये महानगरपालिकेची कोणतीही जबाबदारी नाही. स्थानिक मंत्री म्हणून आपण दूरदर्शनवर जाहीरपणे सांगितले आहे की, महानगरपालिका पैसे भरेल. मी आकडेवारी सभागृहापुढे मांडली आहे. त्याप्रमाणे या प्रश्नामध्ये मार्ग काढण्यासाठी स्थानिक मंत्री या नात्याने आपण माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घ्यावी.

नंतर जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्यांना ते सांगावे. पुनर्मूल्यांकनाच्या थापा लोकांना मारू नयेत. आपण कमिट्या नेमून बनवाबनवी करत आहात. कोल्हापूर टोलमुक्ती करण्यासंबंधातील आकडेवारी मी आपल्याला दिलेली आहे. यात आयआरबी आणि सरकारचा फायदा आहे. त्यात आपण आणखी वाटेकरी न होता जनतेला वाटेकरी करून टोलमुक्त करावे अशी मी आपल्याला नम्रपूर्वक विनंती करतो.

मला अनेक विषय मांडावयाचे आहेत. पण माझ्या सहकाऱ्यांना बोलण्याची संधी मिळावी म्हणून मी कोल्हापूर टोलचा एकमेव विषय येथे मांडलेला आहे. यासंबंधी नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव दिलेला आहे. तेव्हा कोल्हापूरवासियांना टोलमुक्ती दिल्याचे समाधान आपण मिळवून द्यावे अशा प्रकारची आग्रही विनंती करतो.

माझ्यावर एक गुन्हा दाखल झालेला आहे. त्यात मला शिक्षा होणार हे नक्की आहे. मी मराठीसाठी झगडलो आहे. मला जज्जनी सांगितले आहे की, यामध्ये आपण ऑर्ग्युमेंट सुरू करावे. माझा गुन्हा हा शिक्षापात्र आहे. मराठी करिता अशा कितीही शिक्षा झाल्या तरी काही प्रश्न नाही. आपण सतत मराठी राजभाषेचा अवमान करत राहिला तर मात्र संघर्ष शिगेला जाईल. 26 जानेवारी हा गणतंत्र दिन म्हणून साजरा करतो. महाराष्ट्राच्या इभ्रतीचा प्रश्न होता. तो दिन आपण कौतुकाने साजरा करीत होता म्हणून मी माझ्या मनाला आवर घातला. या पुढे राजभाषेचा अवमान होत असताना आमच्याकडून अपेक्षा करू नका, अशा प्रकारची जाणीव मी या माध्यमातून सरकारला करून देत आहे. मी आपल्याला इशारा देत नाही. याचे कारण काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एवढे इशारे चालतात की, आपण दोघेही बोथट झालेले आहात. तरी देखील मी आपल्याला जाणीव देत आहेत. आम्ही काढलेला चिमटा एवढा भयानक असेल की, त्याचे कळवळणे आपल्याला थांबवता येणार नाही. जय हिंद जय महाराष्ट्र.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (डॉ.नीलम गोऱ्हे)** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी भाषणास सुरूवात करण्याच्या अगोदर सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील यांना कोल्हापूर टोल संबंधी उत्तर द्यायचे आहे असे वाटते. कोल्हापूरच्या टोलसंबंधी आपणास शेवटी देखील संधी देण्यात येणार आहे. आपण हात वर केला होता त्यामुळे आपणास थोडक्यात खुलासा करण्यासाठी संधी देण्यात येत आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, माझा उल्लेख झाल्यामुळे मी बोलण्यास अनुमती मिळावी म्हणून हात वर केला होता. दोन मंत्र्यांनी करार वाचला नाही असा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केला आहे. करारात कन्फर्मिंग म्हणून महानगरपालिका आहे. त्यामुळे महानगरपालिकेने जबाबदारी स्वीकारलेली आहे. महानगरपालिकेने ट्राय पार्टी ॲग्रीमेंट केले आहे. रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी खुलासा करीत आहे. महापालिकेने जबाबदारी घेतली असल्यामुळे दोन्ही मंत्र्यांनी निर्णय घेतला की, महानगरपालिका टोलसंबंधी निर्णय घेईल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पेट्रोलवर अधिभार लावावा व तो वाहन मालकांकडून वसूल करण्यात यावा अशा प्रकारचा प्रस्ताव दिला आहे. तो प्रस्ताव आम्ही लोकांसमोर ठेवू.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांची टोलमुक्तीच्या प्रश्नामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे अशी सूचना होती.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, माझ्याकडे नोंदणी झालेला करार आहे. या करारामध्ये महानगरपालिकेची जबाबदारी असल्याचे स्पष्ट आहे. या शासनाला आयआरबीचा एवढा कळवळा का आहे ? माननीय मंत्री हे महानगरपालिकेचे मालक आहेत काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी करार वाचलेला नाही. महानगरपालिकेने व शासनाने काही पैसे द्यावेत अशा प्रकारचा ठराव महापालिकेने केलेला आहे.

**तालिका सभापती** : आपण हात वर केला होता म्हणून आपणास बोलण्याची संधी दिली होती. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला प्रश्न येथे उपस्थित केला आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सन्माननीय मंत्री महोदयांचा खुलासा अत्यंत चुकीचा आहे. या करारामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, 50 टक्के आयआरबी, 40 टक्के एमएसआरडीसी आणि 10 टक्के महानगरपालिका देईल. येथे माननीय मंत्री जे काही सांगत आहेत ते चुकीचे आहे. माननीय मंत्र्यांनी पुन्हा पुन्हा कोल्हापूरच्या जनतेचा अवमान करू नये असे मी आवर्जून सांगत आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदया, महानगरपालिकेच्या ठरावामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, महापालिका, महाराष्ट्र शासन, एमएसआरडीसी संयुक्तिकपणे याची जबाबदारी घेईल. कोण किती पैसे देणार याचा निर्णय आम्ही घेतलेला नाही. संयुक्तरित्या हे पैसे भरले जातील असा निर्णय घेतलेला आहे.

**तालिका सभापती** : या प्रश्नासंबंधी माननीय मंत्र्यांकडून सभागृहाला उत्तर अपेक्षित आहे. सदर विषय हा गृह राज्यमंत्री यांच्या विभागाशी संबंधित नाही. त्यांनी या प्रश्नासंबंधी खुलासा करण्याचा प्रयत्न करू नये अशी माझी विनंती आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी भाषणास सुरूवात करावी.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी फक्त तीन मागण्यांवर बोलणार आहे. सुरूवातीला पान क्रमांक 3 वरील सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 1 वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

या राज्यातील निवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी काही नियम आहेत की नाही ? आज देशात आणि राज्यात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. निवृत्त झालेले अधिकारी राजकारणामध्ये अधिकृतरित्या यायला लागले आहेत. या विषयासंबंधी मी सभागृहात अनेक वेळा बोललो आहे. या देशातील अधिकाऱ्यांकडे एवढे पैसे येणार आहेत की, ते या लोकशाहीमध्ये आपला डमी आमदार आणि खासदार पाठवून देतील. एवढ्या पुरते हे मर्यादित नाही. आम्ही लहानपणी मार्क्सवादाचे धडे वाचत होतो. त्यावेळी आम्हाला शिकवले जायचे की, या देशातील भांडवलदार आपले डमी खासदार लोकप्रतिनिधी म्हणून पाठवत आहेत.

सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर पेन्शन घेतो. तो अधिकारी हा सरकारचा असतो. हा प्रश्न मर्यादित नाही. श्री.मेटे यांच्या सारखा अधिकारी रायगड येथे जिल्हाधिकारी असेल व त्यांना उद्या रायगड मधून लोकसभेची निवडणूक लढवायची असेल तर त्याला पूरक असे निर्णय घेऊ शकतात. ही बाब आपण हसण्यावारी घेऊ नका. ही गंभीर बाब आहे. तो पूरक असा निर्णय घेऊ शकतो. तो कोणालाही फेव्हर करू शकतो. जो गुंडगिरी करतो, ठेकेदार आहे त्याच्या बाजूने निर्णय घेऊन तो मतदारांसमोर जाऊ शकतो. घटनेमध्ये काय म्हटले आहे याचा मी अभ्यास केलेला नाही. त्याचा देखील मी अभ्यास करणार आहे. यासंबंधी मी कोर्टात देखील जाणार आहे. यासंबंधी कुठे तरी निर्णय झाला पाहिजे. अधिकारी आपल्या पदाचा राजीनामा एका दिवसामध्ये देतो आणि दुसऱ्या दिवशी राजकारणामध्ये येतो. मग तो सरकार कसे बरोबर नाही हे सांगतो. त्यांनेच घेतलेल्या निर्णयावर, त्याने केलेल्या सहीवर तो अधिकारी टिपणी करतो. आपले मतप्रदर्शन करतो. हे सर्व राज्यांमध्ये, देशामध्ये थांबले पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

ही अतिशय गंभीर बाब आहे. या सभागृहात भविष्यात कोण येणार आहेत यावर माझे विचार व्यक्त केले होते व आक्षेप देखील घेतला होता. त्याचा मी पुनरूच्चार करणार नाही. आज दिवसेंदिवस आपली प्रतिमा कमीकमी होत चालली आहे. आज काय चालले आहे. आज स्पर्धा सुरू आहे. काल असेलेले आयुक्त, काल असेलेले सचिव उघडउघडपणे राजकारणामध्ये येत आहेत. त्याला आमचा विरोध नाही.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील .....

परंतु यासंदर्भात नियमावली तयार करण्याची नितांत आवश्यकता आहे. निवृत्त झाल्यानंतर किती वर्षानंतर निवडणूक लढवता येऊ शकते यासंदर्भात नियमावली तयार करण्याची आवश्यकता आहे. निवृत्त झाल्यानंतर किती वर्षानंतर राजकारणात येता येऊ शकते, राजकारणात आल्यानंतर त्याचे पेन्शन कशा प्रकारे बंद केले जावे यासंदर्भात नियमावली तयार करण्याची आवश्यकता आहे. समजा एका ठिकाणी कलेक्टर म्हणून अधिकारी काम करीत असेल तर त्याला त्याच ठिकाणी निवडणूक लढविता येऊ नये यासंदर्भात नियमावली तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे असे मला वाटते. यासंदर्भात आपल्या राज्याने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आपले राज्य पुरोगामी राज्य आहे. आपल्या राज्याने संपूर्ण देशात बरेच निर्णय अगोदर घेतलेले आहेत. या ठिकाणी मी जे काही विचार मांडत आहे त्याला सभागृहातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांचा विरोध असेल असे मला वाटत नाही. आज यासंदर्भात आपण सर्व चोर आणि हे मात्र साव अशा प्रकारचे वक्तव्य केले जात आहे त्याचे मला दु:ख आहे. आज राजकारणाची नीतिमत्ता अतिशय खालच्या पातळीवर गेली आहे. अधिकाऱ्यांनी करोडो रुपये कमवायचे, त्याची मालमत्ता किती आहे याची माहिती द्यावयाची नाही. त्यांची मुले परदेशात शिक्षण घेत असून ती मुले येथे येऊन सांगणार की, हा हा निर्णय का घेतला गेला नाही ? आमदार म्हणून, मंत्री म्हणून आपल्याला शपथ घ्यावी लागते त्या प्रमाणे आयएएस अधिकाऱ्यांना शपथ घ्यावी लागते किंवा नाही याची मला माहिती नाही. परंतु आयएएस अधिकाऱ्यांना काही तरी बंधने आहेत अशी मला माहिती आहे. या विषयाच्या संदर्भात मी जास्त काही अभ्यास केलेला नाही. जेव्हा वर्तमानपत्रात किंवा मीडियामध्ये हा प्रकार बघतो तेव्हा माझ्या हृदयाला अतिशय वेदना होतात. त्यामुळे सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर अधिकाऱ्यांना केव्हा व कोठून निवडणुका लढवता येऊ शकतात यासंदर्भात नियमावली तयार करण्याची आवश्यकता आहे. सामान्य प्रशासन विभागाचे माननीय मंत्री महोदय, माझ्या मताशी सहमत असतील याची मला खात्री आहे. आज पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी वेळ अपुरा आहे, अर्थसंकल्पावर विचार मांडण्यासाठी सुध्दा वेळ अपुरा आहे परंतु पुढील अधिवेशनात या विषयावर मी माझे विचार अतिशय विस्तृतपणे मांडणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील .....

सभापती महोदय, आता मी सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. वाहनांनी क्षमतेपेक्षा जास्त लोड नेऊ नये असा नियम आहे. हा नियम आमच्या जिल्हयात पाळला जातो. क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेणाऱ्या ट्रकला आमच्या जिल्हयात रोखले जाते. क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करण्यात येऊ नये याचे बंधन सर्व ठिकाणी पाळण्याची आवश्यकता आहे. परंतु मुंबईमध्ये क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेण्याला कोणतेही बंधन नाही. मुंबईमध्ये जास्त क्षमतेने माल वाहून नेत असल्यामुळे मुंबई-गोवा किंवा मुंबई-पुणे या रस्त्यावर मोठया प्रमाणात अपघात होत आहेत. आज मुंबईमध्ये क्षमतेपेक्षा जास्त माल ट्रकमध्ये आणण्याची व माल उतरवण्याची स्पर्धा सुरु झालेली आहे. जेएनपीटी, कळंबोलीमध्ये जास्त लोड करण्यात आलेली वाहने अडवली जातात. परंतु मुंबई शहरामध्ये क्षमतेपेक्षा जास्त लोड नेणाऱ्या वाहनांना अडवले जात नाही. क्षमतेपेक्षा जास्त लोड वाहनांनी नेऊ नये यासंदर्भात संपूर्ण राज्यात एकच नियम असण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे इतर ठिकाणी जो नियम आहे तो नियम मुंबईत सुध्दा लागू करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 7, पृष्ठ क्रमांक 3 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर पनवेल ते खोपाली यादरम्यान रात्री 2.00 वाजता बसवर दरोडा टाकण्यात आला होता. या दरोडयामध्ये 1.5 कोटी रुपये लुटले गेले. पोलिसांच्या गाडीतून 25/30 पोलिसांनी येऊन हा दरोडा टाकला होता. या दरोडयामध्ये बसमध्ये असलेल्या एका व्यापाऱ्याची कॅश लुटली गेली. या दरोडयामध्ये एकंदर 1.5 कोटी रुपये लुटले गेले. यासंदर्भात पोलीस केस झाली, आरोपी पकडले गेले. कॅश असल्यामुळे ते दाखवता येत नसल्यामुळे त्या व्यापाऱ्याकडून 20 लाख रुपये घेतले गेले. या दरोडयातील 1.5 कोटी रुपये वसूल सुध्दा करण्यात आले आहेत. हे पैसे देण्यासाठी पोलिसांनी त्या व्यापाऱ्याकडून पुन्हा 10 लाख रुपये घेतले. दरोडे पडतात म्हणून या ठिकाणच्या पोलीस प्रमुखांनी रात्री 11.00 नंतर सर्व हॉटेल्स बंद करण्याचा निर्णय घेतला. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत हा विषय मी काढला असता माननीय पालक मंत्री श्री. सुनील तटकरे यांनी सांगितले की, माननीय श्री. जयंत पाटील म्हणतात ते बरोबर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

आहे, या विषयावर मी सुध्दा पोलीस प्रमुखांशी बोललो होतो. परंतु ते ऐकावयास तयार नाहीत. रात्री 12 वाजल्यानंतर हॉटेल चालवण्याचे लायसन्स नसल्यामुळे ही हॉटेल्स बंद करण्यात आली आहेत असे पोलीस प्रमुखांनी सांगितल्याचे त्यांनी सांगितले होते. पनवेल ते खोपोली या ठिकाणी जो नियम लावला जातो तो नियम पुण्यामध्ये लावला जात नाही. लोणावळयातील हॉटेलला हा नियम लावला जात नाही. पनवेल ते खोपोली या ठिकाणी जी हॉटेल्स टाकण्यात आलेली आहेत, त्या हॉटेलला महिन्याकाठी 3-3,4-4 लाख रुपये भाडे द्यावे लागते. या हॉटेल चालकांनी लोन घेऊन हॉटेल्स सुरु केलेली आहेत. या हॉटेल वाल्यांना बँकानी लोन दिलेले असल्यामुळे त्यांच्या अडचणी मला माहिती आहेत.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MMP/ KTG/ D/ D/ पूर्वी श्री.जुन्नरे... 11:20

श्री.जयंत प्र.पाटील...

त्यांची हॉटेल्स रात्री बंद करण्यात आली आहेत. हॉटेल्स बंद असल्यामुळे लोकांना टॉयलेटची सुविधा मिळत नाही. टॉयलेट नाही म्हणून श्री.राज ठाकरे बोंब मारत आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये रस्ते विकास महामंडळाचा काय संबंध ? दरोडे पडतात म्हणून हॉटेल्स बंद ठेवायची का ? आपणाला राज्याचे संरक्षण करता येत नाही काय ? रात्री जल वाहतुकीस बंदी आहे, परंतु रस्त्यांवरील वाहतूक सुरु असते. बंदोबस्त ठेवण्याची जबाबदारी गृह विभागाची आहे. अतिरेकी येतात म्हणून रात्री जल वाहतुकीवर बंदी आहे असे कारण पोलीस विभागाकडून सांगण्यात येते. अतिरेकी येतात म्हणून आपण रेल्वे सेवा बंद करणार काय, रस्त्यांवरील वाहतूक बंद करणार काय ? या सर्व ठिकाणी बंदोबस्त ठेवण्याची जबाबदारी गृह विभागाची आहे. तेव्हा या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची जबाबदारी माननीय गृह मंत्र्यांची आहे. या अधिवेशनात आपणास उत्तर देता आले नाही तर निदान पुढील अधिवेशनात आम्ही या संदर्भात निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केलेली आहे असे आपण आम्हाला सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, मी येथे एक गंभीर बाब सरकारच्या निदर्शनास आणत आहे. मी जमिनीच्या संदर्भात तक्रार घेऊन पोलीस स्टेशनमध्ये गेलो असता तेथील पोलीस इन्स्पेक्टर हे महसूल विभागाचे अधिकार स्वत: वापरत असल्याचे दिसून आले. माननीय मंत्री श्री.शशिकांत शिंदे साहेब आणि माझ्यात जमिनी संबंधी वाद आहे अशी तक्रार मी पोलीस स्टेशनमध्ये केल्यास तेथे माझ ी तक्रार नोंदवून घेतली पाहिजे. परंतु प्रत्यक्षात तसे झालेले नाही. पोलीस स्टेशनमध्ये सात-बारा आणि जमिनीचा नकाशा बरोबर आहे का अशी विचारणा करण्यात आली. जमिनीचा सात-बारा उतारा आणि जमिनीचा नकाशा पाहण्याचा अधिकार पोलीस स्टेशनला आहे काय ? या सर्व बाबी पाहण्यासाठी महसूल विभाग आहे. तेव्हा या बाबीकडे माननीय गृह मंत्री महोदयांनी लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आमच्या रायगड जिल्ह्यात एक एकर जमिनीचा भाव 20 कोटी रुपये आहे. आपण विमानतळासाठी जमीन संपादित करीत आहात त्यासाठी 22 कोटी रुपये देत आहात. आपण साडेबारा टक्के जमीन देत आहात त्या जमिनीची किंमत 18 ते 19 कोटी रुपये आहे. तेथील पोलीस विभाग महसूल विभागाचे अधिकार वापरुन लोकांवर दबाव आणण्याचे काम करीत आहे आणि या सर्व गोष्टी थांबविण्याची जबाबदारी गृह मंत्र्यांची आहे.

..2..

25-02-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, खारघर येथील इन्स्पेक्टर श्री.गरड यांची पत्नी निवडणुकीसाठी उभी होती. आमच्या पक्षाने तिचा 1600 मतांनी पराभव केला. तेथील 17 पैकी 16 जागा आमच्या पक्षाच्या निवडून आल्या. त्या इन्स्पेक्टरच्या पत्नीने स्वत:ची 200 कोटी रुपयांची मालमत्ता जाहीर केली. त्या शिवाय 17 गाड्या, 40 ट्रेलर इतकी मालमत्ता दाखविली. त्या इन्स्पेक्टरने सांगितले की, माझ्या पत्नीचा बिझनेस आहे. परंतु पत्नीच्या कंपनीकडे सुरुवातीला इतके पैसे कोठून आले ? श्री.दरड, इन्स्पेक्टर हे मागील 17 वर्षे नवी मुंबई आयुक्तालयात काम करीत आहेत. त्या इन्स्पेक्टरने पत्नीच्या प्रचारासाठी पोलीस वाहन वापरले. हे सर्व मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. तेव्हा या गोष्टीची गंभीरपणे दखल घेणे आवश्यक आहे. माझे कोणी वाकडे करु शकत नाही असे त्या इन्स्पेक्टरचे म्हणणे आहे. त्यांनी स्वत:ची पार्टी काढली होती. आता त्याची पत्नी काँग्रेस पक्षात गेली आहे. त्यांच्या मालमत्तेची चौकशी केली पाहिजे. त्यांनी निवडणुकीमध्ये एका मताला 25 हजार रुपये भाव दिला होता. तरी सुध्दा आम्ही त्यांचा 1400 मतांनी पराभव केला. या संदर्भात मी सी.बी.आय. आणि ॲन्टी करप्शन ब्युरो कमिशनरला स्वत: भेटलो होतो. आम्ही पैशाबरोबर लढाई करु शकत नाही. आम्ही गरीब माणसे पैसेवाल्यांबरोबर काय लढाई करणार ?

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आता येथे "आम्ही गरीब आहोत" असे जे विधान केले त्याची सखोल चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सभागृहाला सादर करावा.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, याची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ज्या भागात औद्योगिकीकरण चालू आहे त्या भागातील पोलीस स्टेशनवर जास्त नियंत्रण कसे राहील हे पाहिले पाहिजे. माझ्याकडे पोलीस इन्स्पेक्टरने सात-बारा उतारा मागून तो बरोबर नाही असे सांगितले. या संदर्भात माननीय गृह मंत्री महोदयांकडून आम्हाला समाधानकारक उत्तर मिळेल अशी माझी अपेक्षा आहे. तसेच संबंधितांवर कारवाई करु असे त्यांनी आश्वासन द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बाब क्रमांक 57, पृष्ठ क्रमांक 74 - मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात सामाजिक न्याय विभागाने एक सर्वे सुरु केला. शिक्षण, उच्च शिक्षण, अधिकारी, कर्मचारी इत्यादीं माहितीचा या सर्वेमध्ये समावेश होता. या ठिकाणी ज्येष्ठ मंत्री माननीय श्री.मधुकरराव पिचड साहेब उपस्थित आहेत. मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात माननीय श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे त्या समितीमध्ये ते देखील आहेत. मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात मोठा मोर्चा आला होता, परंतु सरकारने त्या मोर्चाला पाठ दाखवून त्यांचा अपमान केला. यापेक्षा वेगळा अपमान असू शकत नाही हा भाग वेगळा आहे. तो विषय मी येथे मुद्दाम बोलत नाही.

सभापती महोदय, आपण सर्वे सुरु केला, परंतु मेडिकल कॉलेज, इंजिनिअरींग कॉलेज वा अन्य टेक्निकल कॉलेजमधून सर्वे आलेला नाही. हा सर्वे केव्हा पूर्ण होणार असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 11:30

श्री.विनायक मेटे....

महोदय, कृषी विभागातील काही महाभागांनी असे कळविले की, कृषी विभागात मराठा समाजाचे 93 टक्के अधिकारी/कर्मचारी आहेत. परंतु त्यांना एवढे कळले नाही की, राज्यामध्ये प्रचलित आरक्षण 52 टक्के असताना कृषी विभागामध्ये मराठा समाजाचे 93 टक्के अधिकारी/कर्मचारी कसे असू शकतील. मुळात आपल्या विभागातील आकडेवारी देत असताना त्यांनी थोडे तरी संख्यात्मक तारतम्य बाळगावयास हवे होते. मी शासनाला विचारु इच्छितो की, आपण मराठा समाजाचा सर्व्हे कोणत्या पध्दतीने करीत आहोत, किंबहुना अशा प्रकारे चुकीची माहिती देणाऱ्यांना आपण पाठीशी घालणार आहात काय, हा खरा प्रश्न आहे.

महोदय, मराठा समाजाचा अर्धवट सर्व्हे करु नये या बाबत आम्ही अनेकदा पत्र व्यवहार केला. मराठा समाजात आय.ए.एस., आय.पी.एस. आणि वरिष्ठ तत्सम अधिकारी यांची संख्या दाखविली जात आहे. परंतु प्रत्यक्षात थेट आय.ए.एस., आय.पी.एस. किंवा वरिष्ठ तत्सम अधिकारी किती आहेत याचा सर्व्हे करण्यास शासन तयार नाही. कारण थेट येणाऱ्यांची संख्या शून्य आहे. मराठा समाजाच्या बाजूने निर्णय येण्याची अपेक्षा आहे त्या बाबी बाजूला ठेवून पक्षपातीपणे सर्व्हे करण्याचे काम सुरु आहे आणि ते बरोबर नाही. मराठा समाजाचा सर्व्हे करण्याचे काम 9 तारखेला सुरु करण्यात आले आणि 18 तारखेला संपविण्यात आले. आमची अनेक वर्षांची मागणी होती की, तामीळनाडू सरकारने जसा सर्व्हे केला होता तशा प्रकारचा सर्व्हे करण्याचे धोरण महाराष्ट्र सरकारने स्वीकारावे. आमची अनेक वर्षांची मागणी सरकारने मान्य केली. तामीळनाडू राज्याच्या धर्तीवर सर्व्हे सुरु करण्यात आला. परंतु केवळ 10 टक्के भागाचाच सर्व्हे सुरु केला. वास्तविक पाहता 100 टक्के सर्व्हे करावयास हवा होता. परंतु तसे झाले नाही. 100 टक्के सर्व्हे करावा अशी माझी आजही मागणी आहे. राज्यातील सर्व जिल्हे, सर्व तालुके, शहरे, गावे, प्रभाग, वॉर्ड यांची निवड करुन लॉटरी पध्दतीने सोडत काढण्यात आली. त्या सोडतीतील 500 गावे अशी आहेत की, त्या ठिकाणी एकही मराठा कुटुंब नाही. ज्या भागात मराठा समाज नाही त्या भागाचा सर्व्हे करुन काय साध्य करणार आहात ? ज्या ठिकाणी मराठा समाज नाही त्या भागातील सर्व्हे करुन त्या बाबतचा निर्णय आमच्यावर लादणार आहात काय ? महोदय, मुळात ज्या भागात मराठा समाज नाही त्या भागातील अहवाल हा मराठा समाजाच्या विरोधात येणार आहे. त्यानंतर सरकारकडून सांगण्यात येईल की, मराठा समाजाच्या संदर्भातील अहवाल विरोधात गेला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

अशा प्रकारे जो सर्व्हे केला जात आहे त्या बाबत मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि अन्य मंत्री महोदयांशी चर्चा केली आहे. या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मी पुन्हा सरकारला विनंती करतो की, मराठा समाजाच्या संदर्भात चुकीचा सर्व्हे थांबवून फेर सर्व्हे करण्याचे काम सुरु करावे आणि हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्या संदर्भातील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवावा. तसेच आचारसंहिता लागण्यापूर्वी राज्यातील गरीब ओ.बी.सी. समाजाच्या मुलांना शिक्षण, नोकरी, उद्योग, व्यवसाय या क्षेत्रात संधी दिली पाहिजे. या दृष्टिकोनातून सरकारने न्यायाची भूमिका घेतली तरच महाराष्ट्रातील जनता साथ देईल अन्यथा साथ देणार नाही हे लक्षात ठेवावे, एवढेच या निमित्ताने निदर्शनास आणून देतो व माझे भाषण थांबवितो.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना मी सरकारला काही प्रश्न विचारणार आहे. मागील अधिवेशनात पुरवणी मागण्यांवरील चर्चेला माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी अपेक्षा मी व्यक्त केली होती. परंतु त्या वेळी पूर्णपणे उत्तर आले नाही. त्यामुळे मी त्यातील काही मुद्दे पुन्हा उपस्थित करीत आहे.

महोदय, मी गेल्या वेळी असे म्हटले होते की, पुरवणी मागण्या करताना बजेट मॅन्युअल प्रीस्क्राईबनुसार करावयास पाहिजे. परंतु सरकार बजेट मॅन्युअल नुसार पुरवणी मागण्या करीत नाही, किंबहुना त्यात ते बसविण्याचा प्रयत्न करते. सरकार बजेट मॅन्युअलचा पूर्णपणे फॉलोअप किंवा त्याची परिपूर्तता करीत नाही. अशा प्रकारे पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आहेत. त्या बाबत सरकारने स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दिपकराव साळुंखे)**

महोदय, राज्याचा मूळ अर्थसंकल्प 2 लाख कोटी रुपयांचा आहे. जुलै-2013 च्या अधिवेशनात 8 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या होत्या. टक्केवारीत सांगायचे झाल्यास मूळ अर्थसंकल्पीय रकमेच्या 4 टक्के पुरवणी मागण्या जुलै-2013 च्या अधिवेशनात सादर करण्यात आल्या. डिसेंबर-2013 च्या अधिवेशनात ही टक्केवारी 6 टक्क्यांवर गेली. डिसेंबर-2013 ते फेब्रुवारी-2014 या कालावधीत, डिसेंबरच्या तुलनेत 1370 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. जवळजवळ 10 टक्के पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. 65 लाक्षणिक मागणीच्या माध्यमातून पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत. या संदर्भातील स्पष्टीकरण सरकारने लिखित स्वरुपात दिले असले तरी ते प्लॅन पध्दतीने का दिले नाही याचे स्पष्टीकरण सरकारने केले पाहिजे.

महोदय, कर्जावरील व्याजाच्या खर्चासाठी सरकारने 333 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केली आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, 333 कोटी रुपये कर्जाच्या व्याजापोटी द्यावयाचे होते तर सरकारने ते प्लॅनमध्ये का दाखविले नाही, ही रक्कम पुरवणी मागण्यांमध्ये मागण्याची कारणे काय आहेत ? आपल्यावर किती कर्ज आहे आणि त्यापोटी किती व्याज द्यावे लागणार आहे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

हे माहीत असताना ते प्लॅनमध्ये दाखविता आले असते. यासाठी पुरवणी मागण्यांची वाट का पहावी लागली याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

महोदय, पृष्ठ क्रमांक-6 च्या अनुषंगाने "Provision for Pay and allowances of the Officers and Staff of Director of Prosecution" यासाठी 1 हजार रुपयांची टोकन तरतूद केली आहे. यासाठी 5 कोटी 86 लाख रुपये खर्च येणार असल्याचे नमूद केले आहे. स्पेशल पब्लिक प्रॉसिक्युटरच्या प्रोटेक्शनवर सरकार किती खर्च करते आणि आतापर्यंत त्यांची नेमणूक करुन किती खर्च केला याबाबत सरकारने उत्तर देणे आवश्यक आहे.

आता मी बाब क्रमांक-7 च्या बाबतीत बोलत आहे. माझ्याकडे वर्तमानपत्रातील एक बातमी आहे. पोलिसांच्या घर दुरुस्तीसाठी 120 कोटी रुपये देणार असे त्यात नमूद आहे. त्यातील 54 कोटी रुपये मुंबईतील पोलीस वसाहतींच्या दुरुस्तीसाठी खर्च करण्यात येणार आहेत. मुंबईतील पोलीस वसाहतींची आणि राज्यातील पोलीस वसाहतींची स्थिती सर्वश्रुत आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, 120 कोटी रुपये खर्च झाले आहेत काय, होणार आहेत काय, खरोखरच 54 कोटी रुपयांची तरतूद केली आहे ? मुंबईतील पोलीस वसाहतींची अतिशय बिकट स्थिती आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, सरकारने या संदर्भातील स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

महोदय, आता मी बाब क्रमांक-8 वर बोलत आहे. माझ्याकडे माहितीच्या अधिकारांतर्गत मागविलेली माहिती आहे. सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.सतेज पाटील सभागृहात दिसत नाहीत. मुंबई शहराची अतिशय भयानक स्थिती आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, मुंबईत कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती काय आहे ? मुंबईत महिला फोटोग्राफरची काय स्थिती झाली हे सर्वांना माहीत आहे. त्या महिला फोटोग्राफरवर किती वेळा बलात्कार झाला त्याची माहिती मी सांगणार नाही. आज नाक्या नाक्यावर मंगळसूत्र चोरी होतात, नाक्या नाक्यावर चोऱ्या होतात. माहितीच्या अधिकाराखाली जी माहिती मिळाली त्यावरुन दिसून येते की, मुंबईची...

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार ....

भयंकर अशी परिस्थिती आहे. मुंबई शहरात 367 पोलीस चौक्या असून त्यातील 176 पोलीस चौक्या अधिकृत आहे तर 191 पोलीस चौक्या अनधिकृत आहेत. आपण मुंबईतील नागरिकांना संरक्षण देणार आहात का ? उद्या जर एखाद्याने तक्रार केली किंवा पीआयएल दाखल केली तर 376 पोलीस चौक्यांपैकी 191 पोलीस चौक्या शासनाला डिमॉलिश कराव्या लागतील. मग पुन्हा हा प्रश्न ऐरणीवर येईल. या संदर्भात एक आयोग स्थापन करावा लागेल. मुंबईतील नागरिकांचे, महिलांचे, दलितांचे, पुरूषांचे संरक्षण कशा पध्दतीने करणार आहात ? 191 अनधिकृत पोलीस चौक्या रेग्यूलराईज करण्यासाठी काही प्रोव्हिजन आहे का, नसेल तर, नवीन पोलीस चौक्या निर्माण करण्यासाठी काय करणार आहात ? आपण मुंबईतील नागरिकांना न्याय द्यावा. शासनाने या संदर्भात स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आता मी बाब क्रमांक 20 वर बोलणार आहे. पिंपरी-चिंचवड येथील पब्लिक ट्रान्सपोर्टच्या संदर्भातील पुरवणी मागणी आहे. राज्य सरकारच्या ऑफिशिअल स्टेट ट्रान्सपोर्टला दिनांक 31 मार्च, 2013 पर्यंत 1966 कोटी रूपये देणे बाकी आहे. विविध प्रवासी सवलतीसाठी 1525 कोटी रूपये, कामगार करारासाठी 352 कोटी रूपये, पोलीस, तुरूंग, कर्मचारी, कैदी यांच्या प्रवासासाठी 87 कोटी रूपये. कैदी प्रवासी संदर्भातील खर्च 87 कोटी रूपयांमध्येच आहे. मी संजय दत्तच्या संदर्भात काही बोलणार नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या संदर्भात विचार मांडले आहेत. एसटी महामंडळाला 1966 कोटी रूपये मिळाले नाहीत तर कठीण होईल. आताच राज्यातील एसटी चालविणे कठीत होत आहे. उद्या तर एसटीच बंद होईल की काय अशी स्थिती निर्माण होणार आहे. सरकारने या संदर्भात स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आता मी बाब क्रमांक 27 वर बोलणार आहे. अतिशय गंभीर गोष्ट आहे. मी बजेटच्या वेळी देखील बोललो होतो की, राज्याचे ट्रेझरी मॅनेजमेंट करण्याची गरज आहे. इंटरेस्ट रेट रेश्यो पाहण्याची गरज आहे. राज्यातील किती ठिकाणाहून कर्जे घेतली, किती व्याज दराने घेतली, रिपेमेंटची पॉलिसी काय आहे, हे पाहण्याची गरज आहे. राज्य सावळागोंधळाच्या दिशेने जाणे सुरू आहे. राज्याने एलआयसीकडून 1637 कोटी रूपये कर्ज घेतले, त्याचा व्याज दर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार ....

साडे सात ते तेरा टक्के आहे, नाबार्डकडून 2944 कोटी रूपये कर्ज घेतले, त्याचा व्याज दर साडे सहा ते साडे आठ टक्के आहे, जीआयसीचा व्याज दर साडे नऊ ते तेरा टक्के आहे. आपण व्याजापोटी 330 कोटी रूपये देणार आहात. आपण त्याचा प्राधान्यक्रम केला आहे का ? ज्या कर्जाचा व्याज दर जास्त आहे, ते कर्ज पहिल्यांदा फेडले पाहिजे आणि ज्या कर्जाचा व्याज दर कमी आहे, ते कर्ज उद्या दिले तरी चालेल, असे कोणतेही नियोजन शासनाने केलेले नाही. शासनाकडून त्याचेही स्पष्टीकरण मिळण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आता मी राज्याच्या स्थितीबाबत बाब क्रमांक 27 च्या माध्यमातून बोलणार आहे. आपले राज्य सर्वाधिक कर्जबाजारी राज्य आहे. आरबीआयने वित्त पुरवठ्याच्या बाबत पत्रिका जाहीर केली. त्यामध्ये महाराष्ट्रावर 2 लाख 53 हजार कोटी रूपयांचे, उत्तर प्रदेशवर 2 लाख 44 कोटी रूपयांचे, पश्चिम बंगालवर 2 लाख 11 कोटी रूपयांचे, आंध्र प्रदेशवर 1 लाख 54 कोटी रूपयांचे, कर्नाटकवर 1 लाख कोटी रूपयांचे कर्ज असल्याची माहिती दिली आहे. स्थिती अशी झाली आहे की, कर्नाटक, उत्तर प्रदेश, आंध्र पदेश, तामिळनाडू या राज्यांपेक्षा आपण जास्त कर्जबाजारी झालो आहोत. 18 हजार कोटी रूपये व्याजावर खर्च होतात. त्यामुळे व्याजाचा प्राधान्य क्रम कसा केला आहे, हे सदनाला जाणून घेण्याची इच्छा आहे. ट्रेझरीमधून मिळालेली माहिती आहे. आपण 1033 कोटी रूपयांच्या पुरवणी मागणीला मान्यता मागत आहात. फेब्रुवारीपर्यंत नेमका खर्च किती केला ? फेब्रवारीपर्यंत 77 टक्के रिलिज केले. उर्वरित 22.32 टक्के अजूनही बाकी आहेत. आपण आता 1370 कोटी रूपयांच्या मागण्यांना मान्यता मागत आहात. खर्च किती होणार हे माहीत नाही, कॅरि-फॉरवर्ड किती होणार याची कल्पना नाही. टोटल केली तर उरलेला निधी 22 टक्क्यांचा, त्यात ॲड केलेले 1370 कोटी रूपये तर उरलेल्या 31 मार्च पर्यंत प्रत्येक दिवसाला शासनाला 2500 कोटी रूपये खर्च करावे लागणार आहेत. ही चावी कोणती आहे ? उरलेल्या 31 दिवसांमध्ये प्रत्येक दिवसाला जवळजवळ दीड हजार कोटी रूपयांचा खर्च जनतेला सेवेसाठी देणार आहात. शासनाने त्याचे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता आहे.

..3



ॲड. आशिष शेलार ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, आता मी सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 56, 57 बाबत बोलणार आहे. बाब क्रमांक 57 मध्ये ॲडव्हर्टायझिंग व पब्लिशिंगचा उल्लेख केला आहे. आपण आजकाल बेस्टच्या बसेसवर जाहिराती पाहतो. निवडणुका जवळ येत आहेत. ॲडव्हर्टायझिंग व पब्लिसिटीसाठी सरकार काही खर्च करीत आहे. तो खर्च किती करीत आहे, याची माहिती देण्याची गरज आहे. बाब क्रमांक 29, प्रोव्हिजन फॉर म्युनिसिपल टॅक्सेस ऑन गव्हर्नमेंट बिल्डिंग. सदर बाबतीत साडे तीन कोटी रूपयांचा खर्च होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. माझी माहिती आहे की, केवळ मुंबई मनपाच्याच बिल्डिंगचे टॅक्सेशन हे 48 करोड रूपये आपण देणे बाकी आहे. आपण आताही पुरवणी मागण्यांमध्ये साडे तीन कोटी रूपये मागत आहात. मुंबई मनपाला पैसे देण्याचे काय धोरण आहे ? ती रक्कम सोडून 90 कोटी रूपयांचे वॉटर टॅक्सेशन बाकी आहे. मुंबई मनपाला पैसे देण्याचे धोरण काय आहे, या संदर्भात स्पष्टीकरण देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 46, "Subsidy to the Distribution, Transmission losses". इलेक्ट्रिक कंझुमर्सना देणारी सबसिडी. 0 ते 300 युनिटच्या रेसिडेन्शियल लोकांसाठी 600 कोटी रूपयांची सबसिडी द्यावी लागेल, असे शासनाने पुरवणी मागण्यांमध्ये म्हटले आहे. मुबई शहरात 0 ते 300 युनिट वापरणारे नेमके ग्राहक किती आहेत ? माझी माहिती चुकीची नसेल तर रिलायन्सचे 23 लाख तर टाटाचे 7-8 लाख ग्राहक आहेत. त्यामुळे मुंबई शहरातील उरलेल्या सर्व लोकांना लावण्यात येणारा दर हा टेलिस्कोपिक रेटप्रमाणे मोठा आहे आणि त्याचे ओझे 70 टक्के लोकांवर मोठ्या प्रमाणात येणार आहे. सरकारने सबसिडीच्या माध्यमातून किती लोकांना न्याय दिला, किती लोकांवर अन्याय केला, याचे स्पष्टीकरण देण्याची गरज आहे. मी नेहमी बजेट व पुरवणी मागण्यांच्या आधी माननीय वित्तमंत्र्यांना व्यक्तिगत भेटून निवेदन देतो. आपण मोठ्या प्रमाणात सबसिडी देता आणि ही देण्याची गरज आहे. आपण सबसिडी द्यायची असेल तर द्या. पण सर्व धर्मियांना द्या. आम्ही धर्माच्या आधारे मुद्दा न मांडता मागणी करीत आहोत. देशातील किंबहुना राज्यातील ख्रिश्चन समाजाची कित्येक वर्षांपासून मोठी मागणी प्रलंबित आहे. मुस्लीम, हिंदू किंवा अन्य समाजाला त्यांच्या धार्मिक स्थळाला जाण्यासाठी सबसिडी देता. त्याप्रमाणे होली प्लेसेस ऑफ ख्रिश्चन कम्युनिटीलाही एक करोड रूपयांची सबसिडी देण्याचे प्रावधान करा. शासनाने त्यांना





ॲड. आशिष शेलार ....

सुध्दा त्यांच्या धार्मिक स्थळांच्या ठिकाणी जाण्याच्या सुविधेमध्ये सबसिडी द्यावी, अशी मी मागणी केली होती. पुरवणी मागण्यांच्या बाब क्रमांक 27 च्या माध्यमातून शासनाने या संदर्भात उत्तर द्यावे, अशी मी मागणी करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद !

----

..5

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यावर विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मी आता जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 43, पृष्ठ क्रमांक 51 वर बोलणार आहे. मी माननीय राज्यमंत्र्यांचे आभार मानेन. मी माननीय मंत्र्यांच्या विरूध्द हक्कभंग प्रस्ताव दिला आहे. नातू नगर येथील कालव्याच्या दुरूस्तीचे पैसे देण्याचे दोघांनी सभागृहामध्ये कबूल केले होते. परंतु, आतापर्यंत, या क्षणापर्यंत ते दिलेले नाहीत. माननीय राज्यमंत्र्यांच्या कार्यालयामध्ये बैठक बोलाविली, माननीय मंत्र्यांच्या कार्यालयामध्ये बैठक बोलाविली.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.......

त्या बैठकीचे इतिवृत्त स्वाक्षरीनिशी माझ्याकडे पाठविण्यात आले, माझीही स्वाक्षरी त्यावर घेण्यात आली. त्या ठिकाणी 98 टक्के पाणी वाया जात असल्यामुळे दुरुस्तीसाठी पैसे मागून देखील, गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने या सभागृहात मागणी करुन देखील, सभागृहामध्ये आश्वासन देऊन देखील दुर्दैवाने या क्षणापर्यंत निधी मिळालेला नाही. शासनाने वर्क ऑर्डर दिलेली आहे, कामही सुरु केले आहे. परंतु, निधी दिलेला नाही. म्हणून माझी विनंती आहे की, हा निधी तातडीने वितरित करावा.

सभापती महोदय, कोकणातील कोंढाणा धरणाच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला जात आहे. मी मुद्दाम सांगू इच्छितो की, दिनांक 31/12/2010 रोजी अधीक्षक अभियंता यांनी मुख्य अभियंता, कोकण प्रदेश यांना पत्र दिले आणि कोंढाणा धरणासाठी 604 कोटी 77 लाख रुपयांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविला. खरे तर दिनांक 13/03/1984 रोजी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांनी त्याला मान्यता दिली होती. दिनांक 31/12/2010 रोजी दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे कोंढाणा धरणाची उंची 74 मी.होती. मंत्री महोदयांनी पाहिजे तर तपासून पहावे. एक उदाहरण मी आपल्याला सांगतो आहे. जलसंपदा विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर पैसे कसे झि ारपत आहेत, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. 15 दिवसानंतर दिनांक 14/1/2011 रोजी अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळाकडून मुख्य अभियंता, कोकण प्रदेश यांना पूर्ण प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविला गेला. या प्रस्तावामध्ये धरणाची उंची 43 मी. आणि लांबी 780 ऐवजी 760 मी. दाखविण्यात आली. माझ्याकडे सर्व कागदपत्रे आहेत, माहितीच्या अधिकारात ती मी मिळविली आहेत. या कामाची किंमत 75 कोटी रुपये दाखविण्यात आली. दिनांक 14/01/2011 च्या प्रस्तावातून 240 हेक्टर जमिनीचे सिंचन होईल, असे दाखविण्यात आले. या प्रस्तावाबाबत दिनांक 19/05/2011 रोजी सचिवांनी शासन निर्णय घेतला आणि तत्वत: प्रशासकीय मान्यता दिली. परंतु, 57 कोटी रुपयांची निविदा काढू नये, असेही म्हटले आहे. माझ्याकडे सर्व कागदपत्रे आहेत. त्यांनी असे म्हटले आहे की, 57 कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे, परंतु, निविदा काढू नये. त्यानंतरही नियमबाह्य पध्दतीने निविदा काढून काम देण्यात आले आहे. दिनांक 22 जुलै, 2011 रोजी 57 कोटी रुपयांचे काम देण्यात आले.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम........

त्यानंतर 22 दिवसांनी लगेच दिनांक 12 ऑगस्ट, 2011 रोजी वाढीव कामाचा प्रस्ताव देऊन 435 कोटी 47 लक्ष रुपये किमतीचे तेच काम एफ.अे.इंटरप्रायझेस या कंपनीला विनानिविदा देण्यात आले. हे पैसे कोणाचे आहेत ? एका बाजूला 97 टक्के पाणी वाया जाते म्हणून 10 कोटी, 15 कोटी रुपये द्यावेत, अशी मागणी आम्ही करीत आहोत, मंत्री महोदय देखील सभागृहात आश्वासन देत आहेत, पण प्रत्यक्षात निधी दिला जात नाही आणि या ठिकाणी 500 कोटी रुपये खात आहात, विनानिविदा काम देत आहात ? माझ्याकडे सर्व कागदपत्रे आहेत. मी या प्रकरणात न्यायालयात जाणार आहे. "जिसकी लाठी, उसकी भैस", अशा पध्दतीने तेथे काम सुरु आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 83 वरील बाब क्रमांक 67 च्या माध्यमातून मला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, राज्यमंत्री महोदया प्रा.फौजिया खान म्हणजे ताई आणि भाई आम्ही सभागृहात भांडतो आहोत आणि माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी सभागृहात येत नाहीत.

सभापती महोदय, कळंबणी येथे आयसीयु सुरु केले असले तरी साहित्य अद्याप पोहोचलेले नाही. त्या ठिकाणी ॲम्ब्युलन्स पोहोचलेली नाही. त्या ठिकाणी 45 कामगारांची कमतरता आहे. ते देखील दिलेले नाहीत. आता आपल्याशी भांडायचे नाही, असे मी ठरविले आहे. आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहात. मी माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांच्याविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना देणार आहे. कारण, नोव्हेंबरपर्यंत कळंबणी येथील हॉस्पिटलला सर्व स्टाफ देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी सभागृहात दिले होते. एका बाजूला आश्वासन द्यायचे, आपल्याच आश्वासनाला आपणच हरताळ फासायचा आणि मग सभागृहात यायचे नाही, तोफेच्या तोंडी तुम्हाला द्यायचे, हे सातत्याने पहावयास मिळत आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, या हॉस्पिटलबाबत आपण पुन्हा एकदा बैठक आयोजित करावी. राज्यात जेवढे अपघात होतात, त्यामध्ये सर्वात जास्त अपघात कशेडी घाटात होत असतात. त्यामुळे याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, वावे, तालुका खेड येथे महिलांसाठी 50 खाटांचे हॉस्पिटल मंजूर करण्याची घोषणा मंत्री महोदयांनी केली होती. तशा प्रकारचे वक्तव्य त्यांनी सभागृहात केले होते.

...3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम........

या संदर्भातील सद्य:स्थिती काय आहे, याची माहिती त्यांनी आपल्या भाषणात द्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाची पृष्ठ क्रमांक 94 वरील बाब क्रमांक 70 च्या माध्यमातून मी आदिवासी विकास मंत्री महोदयांचे लक्ष आदिवासी विभागात झालेल्या भ्रष्टाचाराकडे वेधू इच्छितो.

सभापती महोदय, या विभागामार्फत ब्लँकेट व अन्य सामुग्रीची खरेदी करण्यात आली होती. या संबंधीची सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत. या प्रकरणात चौकशी करण्याची घोषणा आदिवासी मंत्री महोदयांनी केली आहे व त्यासंदर्भात एक चौकशी समितीही नेमली आहे. या चौकशी समितीमध्ये कोणाचा समावेश करण्यात आला आहे, किती दिवसात अहवाल देण्यात येणार आहे, याची माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. हा आदिवासींचा पैसा आहे. ज्याप्रमाणे मेलेल्या माणसाच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्यांची अवलाद असते त्याप्रमाणेच खरेदीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करुन आदिवासी सर्वसामान्य, गरीब माणसांच्या पैशावर घाला घालण्यात आला आहे आणि दुसरीकडे आदिवासींची मुले कुपोषणाने मरत आहेत. ही माणसे नाही तर हैवान आहेत. या चौकशी समितीमध्ये ज्यांनी भ्रष्टाचार केला, त्यांचाच समावेश करण्यात आला आहे किंवा कसे, हे देखील स्पष्ट होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यांवर मला माझे विचार मांडावयाचे आहेत. परंतु, या विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. मागासर्गीयांच्या औद्योगिक संस्थांना अनुदान उपलब्ध करुन देण्याची शासनाची योजना आहे. नवीन मागासवर्गीय औद्योगिक संस्थांना पैसे उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडे निधी नाही. ज्या संस्थांना यापूर्वी निधी देण्यात आला आहे, त्यांच्याकडून अनुदान वसूल होत नाही. माझी तर अशी माहिती आहे की, मंत्री महोदयांनीच औद्योगिक संस्था काढल्या आणि पैसे खाल्ले आहेत. आता मंत्री महोदयांची चौकशी कोण करणार आहे ? राज्यमंत्री महोदयांनी अनियमितता केली तर कॅबिनेट दर्जाचे मंत्री चौकशी करतील. पण कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्यांनीच घोटाळा केला असेल तर काय करायचे ? त्यामुळे माझ ी मुख्यमंत्री महोदयांकडे अशी मागणी आहे की, त्यांनी या प्रकरणात सीआयडी चौकशी

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम........

लावावी. माझ्या माहितीप्रमाणे मंत्र्यांनी बोगस संस्था उभ्या केला आहेत आणि सर्व पैसे स्वत: खाल्ले आहेत. बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी आज सरकारकडे निधी शिल्लक नाही आणि मंत्री महोदय या योजनेतील पैसे खाऊन मोकळे झाले आहेत, असा माझा दावा आहे. म्हणून माझी मागणी आहे की, या प्रकरणी सीआयडी कडून चौकशी व्हावी. हा विषय मी सभागृहात यापूर्वी दोन वेळा उपस्थित केला होता. आज तिसऱ्यांदा हा विषय उपस्थित करीत आहे. मंत्र्यांची चौकशी मंत्रीच कसे करु शकतील ?

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या पुरवणी मागणीच्या अनुषंगाने मला एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. या चर्चेच्या वेळी मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित असते तर बरे झाले असते. मुंबईतील लिलावती हॉस्पिटल तोडून त्या ठिकाणी पंचतारांकित हॉटेल बांधण्याचा कट सुरु आहे. या हॉस्पिटलचा एक ट्रस्ट असून त्यामध्ये दोन गट पडले आहेत. एका गटाचे असे म्हणणे आहे की, हॉस्पिटल सुरु राहिले पाहिजे आणि दुसऱ्या गटाचे म्हणणे आहे की, हॉटेल बांधले पाहिजे. हा एक फॅमिली ट्रस्ट आहे. लिलावती हॉस्पिटलची मुंबई शहराला अतिशय गरज आहे. विधानसभेने या प्रकरणी एक समिती नेमली आहे. या ट्रस्टने काही बोगस ट्रस्टींचा समावेश करुन घेतला आहे. जेणेकरुन हॉस्पिटल ठेवण्यास अनुकूल असलेल्या ट्रस्टींची संख्या कमी होईल व त्यांना ट्रस्टमधून बाहेर काढता येईल. यासाठी विधानसभेने चौकशी समिती नेमली आहे. तशा प्रकारचा निर्णय झाला आहे. या समितीच्या आतापर्यंत किती बैठका पार पडल्या, या समितीने कोणती चौकशी केली आहे, काही निर्णय घेतला आहे का, निर्णय घेतला नसेल तर किती दिवसात घेण्यात येणार आहे, याबाबतची माहिती सभागृहाला मिळाली तर बरे होईल.

सभापती महोदय, वित्त विभागाच्या पृष्ठ क्रमांक 31 वरील बाब क्रमांक 26 वर मी बोलणार आहे. शासनाकडून पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आहेत. या माध्यमातून सत्तारुढ पक्षाच्या आमदारांना विकास कामांसाठी 10 कोटी रुपये देण्यात आले आहेत.

यानंतर श्री.मारोती शिगम.......

श्री. रामदास कदम...

या पुरवणी मागण्या या सभागृहामध्ये मांडण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे ? तालिका सभापती महोदय, मी ज्या तालुक्याचा आमदार म्हणून गेली 20 वर्षे काम केले त्या खेड तालुक्यातील 5 कोटी रुपयाची कामे मी सुचविली होती. त्या कामांची अंदाजपत्रके "रामदास कदम" या माझ्या नावाने तयार करण्यात आली. परंतु या कामांना मंजुरी देताना ती विधानपरिषदेतील दुसऱ्या एका पक्षाच्या आमदाराच्या नावाने देण्यात आाली. हा पैसा तुम्ही तुमच्या घरुन आणलेला आहे काय ? हा पैसा महाराष्ट्रातील जनतेचा आहे. राज्याच्या एका माजी विरोधी पक्षनेत्याने सुचविलेल्या कामांच्या बाबतीत ही अवस्था आहे. आता निवडणुका जवळ आल्या म्हणून असे प्रकार तुम्ही करीत आहात काय ? तालिका सभापती महोदय, कामाची अंदाजपत्रके माझ्या नावाने तयार करण्यात आली आणि ज्या आमदाराचा कोकणाशी, कोकणातील खेड तालुक्याशी काही संबंध नाही अशा विधानपरिषदेतील कॉंग्रेस पक्षाच्या आमदाराच्या नावाने ती कामे मंजूर करण्यात आली. ज्या आमदाराला तालुका माहीत नाही, गाव माहीत नाही, नाव माहीत नाही अशा आमदाराच्या नावे कामे कशी काय मंजूर करता ? वारे वा, तुमचे शासन ! तालिका सभापती महोदय, मी सुचविलेल्या कामांची अंदाजपत्रके मी आपणाकडे देत आहे. कृपया आपण ती पहावीत.

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या पृष्ठ क्रमांक 88 वरील बाब क्रमांक 68 मध्ये विद्यावेतनासाठीच्या प्रलंबित खर्चासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. या सदनामध्ये माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदय उपस्थित असते तर बरे झाले असते, कारण मी जो विषय येथे मांडणार आहे त्याची फाईल त्यांच्याकडे पडून आहे. योगिता डेण्टल कॉलेजचा मी चेअमन आहे. पोस्ट ग्रज्युएशनसाठी मी मागील एक वर्षापासून प्रस्ताव पाठविलेला आहे. हा विषय मी मागील अधिवेशनामध्ये देखील उपस्थित केला होता त्यावेळी "माझ्याकडे फाईल आली नाही" असे मंत्री महोदयांनी मला सांगितले होते. मी त्यांना आता फाईलचा क्रमांक सांगतो. फाईल क्रमांक 200/13/शिक्षण/2 असा आहे. श्री. पराग वाकडे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक 21.2.2014 रोजी ही फाईल मंत्री महोदयांकडे पाठविलेली आहे. या फाईलवर मंत्री महोदय डॉ.गावितसाहेब हे केव्हा सही करणार आहेत ? कोकणातील मुंबई पासून गोव्यापर्यंतच्या भागामध्ये हे एकमेव डेंटल कॉलेज होणार आहे. कोकणातील एखादा माणूस डेंटल कॉलेज उभारणार असेल तर त्यास आपण साधी मान्यता देखील देत नाही ? या डेण्टल कॉलेजला मान्यता देण्यामध्ये

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

तुम्हाला कोणती अडचण आहे ? मान्यता मिळण्यासाठी काही वेगळे वजन ठेवायला पाहिजे काय ? योगिता डेंटल कॉलेजला पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी केव्हा मान्यता देणार हे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे.

तालिका सभापती महोदय, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या मागण्यावर बोलत असताना मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मी खेड तालुक्यामध्ये 5 कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची कामे करण्यासंबंधीची मागणी केलेली असून याबाबत त्वरित कार्यवाही करावी असा शेरा माननीय मंत्री महोदयांनी लिहिलेला आहे. परंतु कोकणामध्ये हे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे नॉर्म्समध्ये बसत नाहीत. मागील 25 वर्षापासून या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या नॉर्म्समध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. हे आघाडीचे सरकार आल्यापासून म्हणजे 1999 पासून आतापर्यंत कोकणामध्ये किती कोल्हापूर पध्दतीचे बंधारे झाले आणि किती पाझर तलाव झाले याची माहिती मंत्री महोदय देऊ शकणार नाहीत. कारण कोकणामध्ये एकही कोल्हापूर पध्दतीचा बंधारा झालेला नाही. कोकणामध्ये कोल्हापूर पध्दतीचे बंधारे झाले तर कोकणातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होईल. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे होण्याच्या दृष्टीने नॉर्म्समध्ये योग्य ते बदल करावेत अशी मी शासनाला या निमित्ताने विनंती करीत आहे.

तालिका सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये दोन कॅबिनेट मंत्र्याव्यतिरिक्त केवळ राज्यमंत्रीच उपस्थित आहेत. महिला व बाल विकास विभागाच्या मंत्री महोदया प्रा. वर्षा गायकवाड हया देखील या सदनामध्ये उपस्थित नाहीत. या सदनाला कमी लेखू नये एवढेच मला शासनाला सांगावयाचे आहे. महिला व बाल विकास विभागाने 500 बालगृहांना मंजुरी दिली. रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील शिवतीर्थ मेडिकल ट्रस्टसाठी मी स्वत: अनुदानित बालगृहाची मागणी केली होती. हे बालगृह त्या ट्रस्टला दोन वर्षानंतर मंजूर करण्यात आले आणि दोन वर्षानंतर पत्र पाठवून अनुदान मिळणार नाही असे सांगण्यात आले. जी 5 बालगृहे बंद करण्यात आली होती त्यापैकी एक बालगृह विशेष बाब म्हणून शिवतीर्थ मेडिकल ट्रस्टला मंजूर करण्यात आले होते. या बालगृहाला वित्त विभागाने मान्यता दिलेली होती आणि त्यास अनुदान देखील मंजूर झालेले होते. मी अनुदान मिळण्यासंदर्भात माहिती घेतली. मला अशी माहिती प्राप्त झाली की, अनुदानित बालगृह मंजूर करुन घ्यायचे असेल तर आयुक्तांपासून सर्वांकडे वजन ठेवावे लागते.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

आपण वजन ठेवले तर बाहगृहास त्वरित मान्यता मिळते. माननीय मंत्री महोदयांनी या बाबतची माहिती घ्यावी. मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, जे कोणी झारीतील शुक्राचार्य असतील त्यांचा बंदोबस्त करुन शिवतीर्थ मेडकल ट्रस्टला अनुदानित बालगृह मंजूर करावे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : तालिका सभापती महोदय, सन 2013-2014च्या पूरक मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 51 वरील बाब क्रमांम 43 मध्ये उपग्रह छायाचित्रीकरण पध्दतीने वशिष्ठी नदीच्या खोऱ्यातील सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. बीड जिल्ह्यामध्ये स्थलांतरित मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. बीड जिल्हयातील शिरुर तालुक्यातील विशेषत: रायमो आणि रायमोच्या खालचे संपूर्ण क्षेत्र हे अवर्षण प्रवण क्षेत्र आहे. डोंगरप्रवण क्षेत्र आहे. डिसले वाडीच्या साठवणूक तलावाचे अंदाजपत्रक शासनस्तरावर अनेक वर्षे पडून आहे. त्यास अद्याप तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. हे निवडणुकीचे वर्ष आहे. बीड जिल्हयामध्ये दर दोन-तीन वर्षानी दुष्काळ पडतो.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.........

गेली 4 वर्षे बीड मतदारसंघातील डोंगरपट्ट्यामध्ये राहणाऱ्या लोकांची भयानक अवस्था झालेली आहे. त्यामुळे डिसलेवाडी साठवण तलावाचे काम पूर्ण होणे गरजेचे आहे. त्याकरिता महाराष्ट्र शासनाने मान्यता द्यावी अशी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, नगरविकास विभाग पृष्ठ क्रमांक 27, बाब क्रमांक 27. गेली 3 वर्षे बीड शहरामध्ये अपघातामध्ये मरणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. अपघातामधील मृत्यूची संख्या लक्षणीय आहे. बीड शहराला वळण रस्त्याची आवश्यकता आहे. बीड नगरपालिकेने महाराष्ट्र शासनाकडे विकास आराखडा सादर केला आहे, त्यात एका रिंग रोडचा समावेश केलेला आहे. हा रिंग रोड 100 फुटाचा आहे. महाराष्ट्र शासनाने बीड नगरपालिकेला सूचना दिल्या तरी नगरपालिकेने आजपर्यंत त्याचे काम सुरु केलेले नाही. म्हणून माझी राज्य शासनाला विनंती आहे की, बीड नगरपालिकेला आदेश देऊन रिंग रोडचे काम सुरु करण्यात यावे. हा रिंग रोड पूर्ण झाला तर बीड शहरातील अपघातांचे प्रमाण कमी होऊ शकेल.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभाग. पृष्ठ क्रमांक 19, बाब क्रमांक 88. महाराष्ट्रामध्ये बालकाश्रमाची संख्या मोठया प्रमाणात असून बीड जिल्हयामध्ये देखील अनेक बालकाश्रम सुरु झालेली आहेत. या बालकाश्रमामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची परिस्थिती दयनीय आहे. त्यांची आर्थिक स्थिती बिकट झालेली आहे. या आर्थिक परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाने बालकाश्रमामध्ये मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घ्यावे अशी आग्रहाची विनंती करतो. आम्ही पान वाळलेले, पाण्यात वाहणारे, उडताही येत नाही आणि बुडताही येत नाही अशी या कर्मचाऱ्यांची परिस्थिती झालेली आहे. बालकांवर संस्कार करणारा हा वर्ग आहे. अल्पशा मानधनावर ते काम करीत आहेत. अनेक संस्था त्यांना मानधनही देत नाहीत. त्यांना राज्य शासनाने आश्वासित केले होते की, भविष्यात शासन सेवेत सामावून घेण्यात येईल आणि शासनाकडून वेतन दिले जाईल. हे कर्मचारी त्यांच्या सध्याच्या परिस्थितीत लहान बालकांवर काय संस्कार करणार आहेत? नवी पिढी कशी निर्माण करणार आहेत? राज्य शासनाने या विषयाची दखल घेऊन अल्प मानधनावर बालकाश्रमामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी शासन सेवेत सामावून घ्यावे अशी मी विनंती करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले........

सभापती महोदय, कृषी व पशुसंवर्धन विभाग. पृष्ठ क्रमांक 17, बाब क्रमांक 13. राज्य शासनाने राज्य कृषी मूल्य आयोग घोषित केला आहे. महाराष्ट्रामध्ये जे शेतकरी स्वत:च्या शेतामध्ये कृषी उत्पादन घेतात, त्यांच्या पिकाच्या उत्पादनासाठी येणाऱ्या खर्चावर आधारित भाव त्यांना मिळाला पाहिजे म्हणून राज्य शासनाने राज्य कृषी मूल्य आयोगाची स्थापना केली आहे अशी माझी धारणा आहे. मी शासनाचे या निर्णयाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन करतो. राज्य कृषी मूल्य आयोगाचे संविधानिक स्वरुप आणि रचना व कार्य याबद्दल शासनाने सभागृहामध्ये स्पष्टीकरण करावे अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभाग. बाब क्रमांक 57, पृष्ठ क्रमांक 74. आपला भारतवर्ष अनेक जाती, धर्म आणि पंथांचा बनलेला आहे. प्रत्येक धर्माचा, जातीचा, भाषेचा आपण आदर करतो. पण या भारतवर्षामध्ये एखाद्या शब्दाचा अपभ्रंश झ ााल्याने संपूर्ण जमातीला हक्कापासून वंचित रहावे लागणे हे अतिशय आश्चर्यकारक आहे. भारत वर्षासाठी आणि या राज्यासाठी हे शोभादायक नाही.

सभापती महोदय, र आणि ड या अक्षराच्या उच्चारामुळे धनगर समाजाला फार मोठा अन्याय सहन करावा लागत आहे. इंग्रजी भाषेत 'आर' अक्षराचा उच्चार 'ड' असा होणे स्वाभाविक आहे. ते आपण मान्य करतो. उदाहरण द्यायचे झाले तर 'देवरा' या शब्दाचा उच्चार उत्तर भारतामध्ये 'देवड़ा' असा होतो. 'जाखर' शब्दाचा उच्चार 'जाखड़' असा होतो. '5 एकर शेती' या शब्दाचा उच्चार '5 एकड़ खेती' असा होतो. 'र' आणि 'ड' हा एकाच अक्षराचा उच्चार असल्याचे आपण मान्य करतो. प्रत्येक भाषेचा आपण आदर करतो. त्याच प्रकारे धनगर आणि धनगड़ हे शब्द एकच आहेत. आपल्या राज्यात 'धनगर' असा उल्लेख होतो तर उत्तर भारतात हाच शब्द 'धनगड़' असा उच्चारला जातो. परंतु आपण हे मान्य करीत नाही. र आणि ड ही दोन्ही अक्षरे वेगळी आहेत असे म्हटले जाते. निव्वळ एका अक्षराच्या अपभ्रंशामुळे स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत धनगर समाजावर अन्याय होत आहे. धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती निव्वळ एका अक्षराच्या अपभ्रंशामुळे नाकारल्या जात आहेत.

आजपर्यत या प्रश्नावरुन अनेकदा मोर्चे काढण्यात आले, आंदोलने केली गेली. मागील हिवाळी अधिवेशनात धनगर समाजाचा विधानभवनावर मोर्चा काढण्यात आला होता. काल देखील धनगर समाजाचा मुंबईमध्ये मोर्चा आला होता. स्वातंत्र्य मिळाल्यापासून धनगर समाज सातत्याने अन्याय सहन करीत आहे. रस्त्यावर घोडा फिरताना दिसला तर त्या घोड्यावर मेंढपाळाचे मूल दिसेल, कोंबडीचे पिल्लू दिसेल, कुत्र्याचे पिल्लू दिसेल. सातत्याने भटकंती करणारा समाज आहे. धनगर आणि धनगड़ हे एकच शब्द आहेत. परंतु धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती नाकारल्या जात आहेत. राज्य शासनाने केंद्र शासनाला एक पत्र पाठवायचे आहे. त्या पत्राची दखल घेऊन केंद्र सरकार मान्यता देण्यास तयार आहे. लोकसभेमध्ये तशा प्रकारचे उत्तर केंद्र सरकारने दिलेले आहे. राज्य सरकारकडून त्या दृष्टीने शिफारस पत्र आले तर आम्ही अंमलबजावणी सुरु करणार आहोत असे केंद्र सरकारने म्हटले आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.........

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभाग. बाब क्रमांक 86, पृष्ठ क्रमांक 114. भटक्या, विमुक्त जाती व जमातींबाबत राज्य शासनाने यापूर्वी जीआर काढून क्रिमी लेयरबाबत उत्पन्न मर्यादा निश्चित केलेली आहे. इतर समाजाबाबत उत्पन्नाची मर्यादा वाढविलेली नाही. व्हीजेएनटी, ओबीसी या समाजाला क्रिमी लेयरबाबत उत्पन्न मर्यादा 6 लाख रुपये केली आहे. शिक्षण संस्थांकडून 4.5 लाख रुपयांची मर्यादा असल्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी फी भरावी अन्यथा त्यांना शिक्षण संस्थेमधून काढून टाकण्यात येईल अशा प्रकारचे आदेश दिले जात आहेत. त्यादृष्टीने शासनाने नवीन 6 लाख रुपये उत्पन्न मर्यादा निश्चित करणारा जो जीआर काढला आहे त्या जीआरप्रमाणे शिक्षण फी आकारली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभाग. बाब क्रमांक 69, पृष्ठ क्रमांक 52. राज्यामध्ये अन्न सुरक्षा विधेयकाची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. त्याचे श्रेय घेतले जात आहे. राज्यातील 67 टक्के जनतेला अन्न सुरक्षा विधेयकाचा फायदा मिळणार आहे. नागपूरमध्ये माथाडी कामगारांची पदे भरली गेलेली नाहीत. मंत्री महोदयांनी सभागृहात मान्य केले होते आणि तसे आदेश दिले. परंतु जिल्हाधिकाऱ्यांकडून पद भरता केली जात नाही. नागपूरमधील माथाडी कामगारांची पदे त्वरित भरण्यात यावीत अशी मी विनंती करतो आणि वेळेअभावी माझे भाषण पूर्ण करतो.

---------

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, वित्त विभाग, पृष्ठ क्रमांक 26, बाब क्रमांक 21, 22 व 23 बाबत मी बोलणार आहे. तुळजापूर, पंढरपूर आणि पैठण-आपेगाव या तीन प्राधिकरणासाठी तरतूद करण्यात आली आहे. यावर्षी संत गजानन महाराजांचा जन्मशताब्दी महोत्सव साजरा झाला. शेगाव येथील तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी राज्य शासनाने 250 कोटी रुपयाच्या विकास आराखड्याला मान्यता दिली होती.

नंतर आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फंडकर...

सभापती महोदय, त्यामध्ये केंद्र सरकारचे 31.00 कोटी रूपये होते. शेगाव नगरपालिकेचे 13.90 कोटी रूपये होते. तसेच श्री गजानन महाराज संस्थानचे 65.50 कोटी रूपये होते. महाराष्ट्र शासनाच्या 250 कोटी रूपयांच्या सहभागापैकी दिनांक 26.12.2013 अखेर फक्त 233.00 कोटी रूपये प्राप्त झालेले आहेत. हा सर्व आराखडा रखडलेला आहे. या आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक शिखर समिती आणि पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय समिती गठित करण्यात आली होती. गेल्या तीन वर्षामध्ये शिखर समितीची श्री.अशोकराव चव्हाण मुख्यमंत्री असताना फक्त एकदाच बैठक होऊन चर्चा झालेली आहे. या आराखड्यासाठी आपण पैसे दिले आहेत. पण कामा अभावी तो आराखडा रखडलेला आहे. दोन-दोन वर्ष एस्टीमेट होत नाही. त्यामुळे कामे झालेली नाहीत. भूसंपादनाची कामे झालेली नाहीत, म्हाडाची कामे झालेली नाही. म्हाडाने दोन वर्षापासून एस्टीमेट तयार केलेले नाही. अनेक फाईल्स वित्त मंत्र्यांकडे आलेल्या आहेत. त्या फाईल्सना वित्तमंत्र्यांनी आदेश देऊन सुद्धा सचिव मान्यताच देत नाहीत. त्यामुळे हा आराखडा रखडला गेला असून 233.00 कोटी रूपयांपैकी फक्त 50.00 कोटी रूपयांची कामे झाली आहेत. उर्वरित पैसा उपलब्ध आहे. परंतु, मान्यते अभावी तो मिळत नाही. विभागीय आयुक्त पातळीवर, सचिव पातळीवर त्यास मान्यता नाही. अनेक भूमिगत गटारांची कामे रखडली आहेत. भूसंपादनाची कामे रखडली आहेत. म्हाडाची कामे रखडली आहेत. गावातील रस्ते खोदून ठेवल्यामुळे संपूर्ण गाव हैराण झाले आहे. त्यामुळे लोकांना जाण्या-येण्याचा त्रास होत आहे. या आराखड्याला दोन वर्षाची मुदत होती. पण गेल्या तीन साडेतीन वर्षात 20 टक्के देखील काम झालेले नाही. त्यामुळे शिखर समितीची बैठक ताबडतोब घेण्याची घोषणा माननीय मंत्री महोदयांनी करावी. आज शेगावला जनतेचे आंदोलन सुरू आहे. आज घंटी बजाव आंदोलन आहे, उद्या डफळे बजाव आंदोलन आहे आणि परवा आमरण उपोषणाला लोक बसणार आहेत. तेव्हा यासंबंधी शासनाने ताबडतोब घोषणा करून शिखर बैठकीमध्ये कालबद्ध कार्यक्रम आखून ती कामे पूर्ण करावीत अशा प्रकारची मागणी करतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, काल रात्री विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या भागात प्रचंड अतिवृष्टी झाली. या भागात 110मि.मी.पेक्षा जास्त पाऊस पडला. बाब क्रमांक 12 पीक विमा दाव्या पोटी देण्यात येणाऱ्या रकमे संबंधात आहे. मागच्या वर्षी देखील अशाच प्रकारची अतिवृष्टी झाली होती. त्यावेळी नागपूर अधिवेशनामध्ये आपण पॅकेज जाहीर केले. नागपूर अधिवेशनापासून आजतागायत शेतकऱ्यांपर्यंत ते पॅकेज पोहोचले नाही. काल भंडारा, वर्धा, बुलढाणा, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र येथे प्रचंड प्रमाणावर अतिवृष्टी झाली. त्यामुळे गहू, हरभरा, या पिकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झाले. कांद्याच्या पिकाचे प्रचंड नुकसान झालेले आहे. कालच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे ताबडतोब पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला हेक्टरी 25000 रूपयांची मदत करावी अशा प्रकारची मागणी मी येथे करतो आणि थांबतो.

........

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (वित्त मंत्री) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेत सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.सुभाष चव्हाण, दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील, विनायक मेटे, आशिष शेलार, रामदास कदम ....

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण आम्हाला बोलण्यास अनुमती देत नसल्यामुळे आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य सभात्याग करतात.)

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले होते की, उत्तरासह दीड वाजेपर्यंत पुरवणी मागण्यांवर चर्चा घेण्यात यावी.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, ही लोकशाहीची पायमल्ली आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, अजून 20.00 मिनिटे माननीय सदस्यांना बोलू द्यावे. त्यानंतर मग उत्तर देण्यात येईल. इतर विभागाच्या मंत्री महोदयांनी देखील उत्तर द्यायचे आहे. अंतरिम अर्थसंकल्प असल्यामुळे मंत्रिमंडळाची देखील आज दुपारी 1.00 वाजता बैठक होणार आहे.

**(सभापतीस्थानी उप सभापती)**

मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर सभागृहामध्ये अर्थसंकल्प सादर करावा लागतो.

**उप सभापती** : सभागृहामध्ये काय गोंधळ चालला आहे हे मला प्रथम कळू द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज सकाळी किती वेळ कामकाज घ्यायचे हे सदनामध्ये ठरले आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीचा सदनाशी काय संबंध आहे. अर्थसंकल्प सादर केल्यानंतर आपण मंत्रिमंडळाची बैठक ठेवायला पाहिजे होती. आपल्याला 4.00 नंतर भटकायला भरपूर वेळ आहे. भटकायला जाण्याऐवजी आपण मंत्रिमंडळाची बैठक ठेवावी. कॅबिनेटसाठी सभागृहाचे कामकाज थांबविणे योग्य होणार नाही. कॅबिनेटशी आमचा काहीही संबंध नाही. उत्तर देणे ही आपली जबाबदारी आहे. आपण सभागृहाला वेठीला धरता काय ? हे सभागृह सावभौम आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आजची मंत्रिमंडळाची बैठक ही नियमित बैठक नाही. अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी तो कॅबिनेट समोर ठेवला जातो व त्यामध्ये चर्चा होते. त्यानंतर अर्थसंकल्प सभागृहामध्ये वाचला जातो. त्या संदर्भातच कॅबिनेट आहे. एवढाच मी उल्लेख केला आहे.

**उप सभापती** : आता पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरू आहे. हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. सभागृहामध्ये प्रत्येक सन्माननीय सदस्याला त्याची इच्छा असेल तर बोलण्याचा अधिकार आहे. त्यामुळे विरोधी पक्षातर्फे करण्यात आलेली मागणी तशी रास्त आहे. त्याच्याशी मी सहमत आहे. आपण आजच 1.00 वाजता कॅबिनेट ठेवली आहे व आज दुपारी 2.00 वाजता अंतरिम अर्थसंकल्प आहे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, माझी अशी सूचना आहे की, माननीय वित्त राज्यमंत्री महोदयांना त्यांचे भाषण करू द्यावे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांना आपले मुद्दे मांडण्यास आपण अनुमती द्यावी.

**उप सभापती** : मी आता फक्त माननीय वित्त राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांना बोलण्यास अनुमती देत आहे. त्यानंतर पुढील चर्चा सुरू ठेवण्यात येईल.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन 2013-14 च्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आहेत. एकूण 1370.00 कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आहेत. यामध्ये 1356.00 कोटी रूपयांची योजनेतर रक्कम आहे. पुरवणी मागण्यांवरील योजनेचा खर्च रूपये 12.98 कोटीचा आहे. वीज अनुदानावर 650.00 कोटी रूपये, खुल्या बाजारातून कर्ज उभारणीसाठी 333.00 कोटी रूपये, राष्ट्रीय कृषी विमा योजनांचा हप्ता 95.00 कोटी रूपये, प्राथमिक आरोग्य केंद्र 73.00 कोटी रूपये अशा प्रकारे रूपये 1356.00 कोटी रूपयांच्या योजनेतर मागण्या होत्या.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ...

योजनेच्या मागण्यामध्ये सुकन्या योजनेसाठी 5 कोटी रुपये, मनोधैर्य योजनेसाठी 5 कोटी रुपये व सहकारी सूत गिरण्यांचे पुनर्वसनासाठी 2.5 कोटी रुपयांच्या मागण्या होत्या.

सभापती महोदय, सभागृहात पुरवणी मागण्यांच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चा करीत असतांना अनेक चांगल्या सूचना केलेल्या आहेत. यासंदर्भात मी आपल्या माध्यमातून सभागृहाला सांगू इच्छितो की, मागील आर्थिक वर्षामध्ये 1 लक्ष 36 हजार कोटी रुपयांचा लक्षांक निश्चित करण्यात आला होता. महसुली जमा 1 लक्ष 46 हजार कोटी रुपये झालेले आहेत. जवळपास 10 हजार कोटी रुपये जास्तीचा महसूल जमा झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी कर्ज किती घेतले, पैसे जमा किती झाले, खर्च किती झाले यासंदर्भात जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्या प्रश्नाच्या संदर्भातच मी या ठिकाणी उत्तरे देत आहे. या वर्षाचा लक्षांक 1 लक्ष 55 हजार कोटी रुपयांचा असून 90 हजार कोटी रुपये माहे ऑक्टोबर पर्यंत जमा झालेले आहेत. डिसेंबर महिन्यापर्यंत 1 लक्ष 10 हजार कोटी रुपयांचा लक्षांक आपण पूर्ण केलेला आहे. मी आपल्या वतीने संपूर्ण राज्याला तसेच या सभागृहाला सांगू इच्छितो की, 1 लक्ष 55 हजार कोटी रुपयांचा लक्षांक 31 मार्च पर्यंत पूर्ण करुच परंतु हा लक्षांक 1 लक्ष 60 हजार कोटी रुपयांच्याहीवर जाईल अशी आपल्या राज्याच्या महसुलाची स्थिती आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे तसेच सन्माननीय सदस्य श्री. आशिष शेलार यांनी कर्जाच्या संदर्भातील उल्लेख केलेला आहे. कर्जाच्या संदर्भात आपल्याला प्लॅनिंग कमिशनने मर्यादा घालून दिलेल्या आहेत. आपल्या टोटल जीडीपीच्या 20 टक्क्याच्यावर आपण कर्ज घेऊ शकत नाही. आपल्या राज्याने एकूण जीडीपीच्या 13.5 टक्क्याच्यावर कर्ज घेतलेले नाही. इतर राज्याच्या तुलनेने महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती संपूर्ण राज्यात पहिल्या क्रमांकाची आहे. कर्ज घेणे हे वाईट नाही. कोणत्याही व्यापारात माणूस स्वत:च्या खिशातील पूर्ण इक्वीटी लावून व्यापार करीत नसतो. व्यापारामध्ये 20 ते 25 टक्के इक्वीटी लावली जाते व उर्वरित रक्कम लावून व्यापार केला जातो. कर्ज घेत असतांना कर्जाची परतफेड वेळेवर करण्याची क्षमताही असली पाहिजे. कर्ज घेतल्यानंतर वेळेवर कर्जाचा चुकारा करणारे व कर्जाचे व्याज वेळेवर देणारे म्हणून आपले राज्य संपूर्ण देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक....

सभापती महोदय, आपल्या राज्याने क्षमतेपेक्षा जास्त कर्ज घेतलेले आहे अशी विरोधी पक्ष नेहमी टीका करीत असतात. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, उत्तर प्रदेश राज्याने जीएसडीपीच्या टक्केवारीमध्ये 37.2 टक्के, पश्चिम बंगाल राज्याने 36.3 टक्के, मध्यप्रदेश राज्याने 26.9 टक्के व गुजरात राज्याने 26 टक्के व आपल्या राज्याने जीडीपीच्या केवळ 21 टक्के कर्ज घेतलेले आहे. परंतु अशी परिस्थिती असतांनाही कर्जाच्या डोंगरावर राज्याला टाकले आहे अशी टीका विरोधी पक्ष नेहमी करीत असतो. आपले राज्य हे देशासाठी अनन्यसाधारण उदाहरण आहे. आपल्या राज्याचे नाव फायनांशिअल कॅपिटल म्हणून घेतले जाते. प्राप्त होणाऱ्या महसुली रक्कमेतून अनेक सेवाभावी योजना या राज्यात चालविल्या जातात. राजीव गांधी जीवनदायी योजना, अन्न सुरक्षा योजना अशा अनेक चांगल्या योजना राबविणारे राज्य म्हणून आपल्या राज्याकडे क्रमांक एकचे राज्य म्हणून पाहिले जाते. ज्यावेळेस तिजोरीमध्ये निधी असतो त्याच वेळेस राज्याची खर्च करण्याची क्षमता असते. सर्व जनतेला गर्व होईल अशी आपल्या राज्याची आर्थिक स्थिती आहे.

सभापती महोदय, दायित्वामध्ये सुध्दा आपले राज्य इतर राज्यांपेक्षा सरस आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी सन 2011-2012 व 2012-2013 या वर्षामध्ये खुल्या बाजारातील कर्जाच्या व्याजाच्या संदर्भात उल्लेख केला असून मी या संदर्भात सांगू इच्छितो की, खुल्या बाजारातून केंद्र शासनाच्या मान्यतेने कर्जरोखे उभारण्यात येतात. या कर्जावर सहामाही पध्दतीने व्याज आकारणी केली जात असते. प्रत्येक मालिकेचे व्याज त्या त्या परिस्थितीवर अवलंबून असते. व्याज दरामध्ये सातत्याने वाढ होत आहे त्यामुळे राज्याच्या प्रदानासाठी प्रास्ताविक पुरवणी मागणी केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी आपल्या विभागापुरतीच माहिती या ठिकाणी देणे आवश्यक आहे. सन्माननीय मंत्री महोदय, अर्थसंकल्प मांडत असल्यासारखी माहिती या ठिकाणी देत आहे. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भातच माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देणे अपेक्षित आहे. इतर सन्माननीय सदस्यांनी इतर विभागाच्या संदर्भात जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्या प्रश्नांना आता उत्तरे दिली जाणार

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

नाहीत असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे कृपा करुन आपण सुध्दा सरकारच्या पाठीमागे उभे राहू नये अशी विनंती आहे. सन्माननीय मंत्री महोदय, एकटेच बोलणार असेल तर इतर सन्माननीय सदस्यांनी बोलावयाचे नाही काय ? आपल्यात जर एवढी हिंमत होती तर बजेट मांडल्यानंतर चर्चा का करीत नाही ? आपण पळता कशाला ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय,कोणामध्ये किती हिंमत आहे ते रणांगणामध्ये दाखवून देऊ. अशा पध्दतीने सभागृहात शब्दाचा वापर केला जाऊ नये असे मला वाटते. मला माननीय सभापतींनी उत्तर देण्याचे आदेश दिल्यामुळेच सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना मी उत्तरे देत आहे.

**उप सभापती** : अशाच प्रकारे सभागृहाचे कामकाज चालणार असेल तर मी सभागृहाचे कामकाज स्थगित करीन. माननीय मंत्री महोदयांना कॅबिनेटला जावयाचे असल्यामुळे त्यांनी त्यांच्या विभागाच्या संदर्भात उत्तर देण्याची विनंती केल्यामुळे मी त्यांना परवानगी दिलेली आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी शेगाव विकास आराखडयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केले होते. त्यासंदर्भात मी स्वत: शेगावला जाऊन दोन बैठकाही घेतल्या होत्या. काही कामे तांत्रिक दृष्टया पूर्ण होत नव्हती. काही कामे अतिक्रमणाच्या विळख्यात होती. तो सर्व विषय मी निकाली काढलेला आहे. निधी उपलब्ध असतांना काही मान्यता आवश्यक आहेत असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. यासंदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता असतील त्यांना मान्यता देण्यात येईल. शिखर समितीची बैठक लावण्यात यावी असा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी केलेला आहे. मी सभागृहाच्या माध्यमातून विश्वास देतो की, अशा प्रकारची बैठक लावण्यामध्ये माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना निश्चितपणे विनंती केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:40

श्री.राजेंद्र मुळक...

सभापती महोदय, नातू नगरच्या संदर्भात काही अडचणी आल्या होत्या. त्या अडचणी आम्ही दूर केल्या असून त्या संदर्भातील निविदा काढलेली आहे. आता फक्त निधी देण्याचा प्रश्न आहे आणि तो निधी देण्यात येईल. आज दुपारी अंतरिम अर्थसंकल्प सभागृहाला सादर होणार आहे. तो सादर झाल्यानंतर त्यावर विभागनिहाय चर्चा होईल आणि अंतरिम अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर तो निधी मिळेल.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी समुद्र देशी बार स्थलांतर करण्याबाबत येथे उल्लेख केला. त्या ठिकाणी लॉ ॲन्ड ऑर्डरचा प्रश्न असल्यामुळे तो बार चालू ठेवणे योग्य होणार नाही अशा प्रकारचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून दिलेले आहेत. तत्पूर्वी त्यास स्टे दिलेला आहे.

सभापती महोदय, ऊर्जा विभागाच्या 650 कोटी 28 लक्ष रुपयांच्या पुरवणी मागण्या, जलसंपदा विभागाच्या 62 कोटी 83 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या आणि वित्त विभागाच्या 351 कोटी 441 लक्ष 73 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपल्या उपस्थितीत या सभागृहाची गळचेपी सुरु आहे. सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी येथे सांगितले होते की, आपण दुपारी दीड वाजेपर्यंत आणि जास्तीत जास्त पावणेदोन पर्यंत उत्तरासह चर्चा करु असा निर्णय झालेला असताना माननीय राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक हे पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु असताना मध्येच उत्तरासाठी उभे राहिले. त्यांनी अगोदर उत्तर दिल्यामुळे आम्ही ऊर्जा, वित्त आणि जलसंपदा विभागावर आमचे मत मांडल्यानंतर त्यास उत्तरे मिळणार नाहीत आणि असे होणार असेल तर आम्ही कशासाठी बोलायचे ? आम्ही सकाळी 9.30 वाजल्यापासून येथे उपस्थित आहोत. आम्ही येथे सकाळपासून कशासाठी बसायचे ?

**उप सभापती** : सभागृहामध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु आहे. या आसनावर बसणाऱ्यांची देखील पंचाईत होते. मंत्रिमंडळाची बैठक दुपारी 1.00 वाजता आहे. ती बैठक केव्हा ठेवावी हे आम्ही सांगू शकत नाही. परंतु सभागृहात सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर कोण देणार ? सभागृहाचे कामकाज देखील तितकेच महत्वाचे आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कॅबिनेटची बैठक आहे म्हणून सभागृहाचे कामकाज थांबवावे हे कोणत्या नियमामध्ये बसते ? एकदा ही प्रथा सुरु झाली की ती कायमची राहील. सभागृहापेक्षा कॅबिनेटची बैठक मोठी आहे का ? सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी माझ्या बुध्दीमत्तेत थोडी भर घालावी की, सभागृह सुरु असताना कॅबिनेटच्या बैठकीला जायचे आहे असे माननीय मंत्री महोदय सांगू शकतात काय आणि तसे नियमबाह्य कामकाज होऊ शकते काय ? आपण सकाळी 9.00 वाजता कॅबिनेटची बैठक घ्यावी, रात्री 9.00 वाजता, 10.00 वाजता कॅबिनेटची बैठक घ्यावी. परंतु सभागृहाचे कामकाज सुरु असताना कॅबिनेट आहे असे सांगून जाणे योग्य नाही. खरे म्हणजे श्री.राजेंद्र मुळक हे कॅबिनेट मंत्री देखील नाहीत.

**उप सभापती** : आपले सभागृह शिस्तीत आणि अत्यंत चांगल्या पध्दतीने चालते हे निश्चित आहे. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालण्याकरिता दोन्ही बाजूंकडून सहकार्य अपेक्षित असते. कधी कधी अशा गोष्टी घडतात. आजच त्यांची कॅबिनेटची बैठक दुपारी 1.00 वाजता आहे. सन्माननीय सदस्यांना पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी वेळ मिळावा यासाठी आपण सभागृहाची बैठक सकाळी 9.30 वाजता ठेवली होती.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या विषयावर कामकाज सल्लागार समितीमध्ये जवळपास दीड तास चर्चा केली. सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी वेळ मिळणार नाही यावर देखील आपण चर्चा केली. तेव्हा सकाळी 9.30 ते दुपारी 1.45 पर्यंत आपण चर्चा करु असे ठरले होते. त्यावेळी माननीय सभापती, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, संसदीय कार्य मंत्री आणि अन्य काही मंत्री उपस्थित होते. आपणही त्यावेळी उपस्थित होता. आपले अगोदर ठरलेले असताना त्यांनी कॅबिनेटची बैठक का लावावी ? कॅबिनेटची बैठक घ्यायची होती तर ती सभागृह सुरु होण्यापूर्वी घ्यायची होती. दुसरे म्हणजे श्री.राजेंद्र मुळक हे राज्यमंत्री आहेत. त्यांचा कॅबिनेटशी काय संबंध आहे ? राज्यमंत्री महोदयांना कॅबिनेटमध्ये मोठ्या मेहरबानीने बसायला दिलेले आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत आणि रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून सांगू इच्छितो की, आज दुपारी 1.00 वाजता कॅबिनेटची बैठक आहे, परंतु ती रेग्युलर कॅबिनेटची बैठक नाही.

..3..



AJIT/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक......

ती बैठक फक्त अर्थसंकल्पाच्या वाचनासंबंधी आहे आणि तशी बैठक दरवेळी होत असते, त्याचा मी उल्लेख केला. मी रेग्युलर कॅबिनेटचा उल्लेख केला नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याचा अर्थ असा होतो की, माननीय राज्यमंत्री महोदयांना ही कॅबिनेट होती हे माहीत नव्हते.

----------

..4..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे )**

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभाग, बाब क्रमांक 71, पृष्ठ क्रमांक 94 - या ठिकाणी माननीय मंत्री श्री.मधुकरराव पिचड उपस्थित आहेत. शासकीय आश्रमशाळांमध्ये आणि अनुदानित आश्रमशाळांमध्ये विविध पदे निर्माण करण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. आश्रमशाळांमध्ये शिक्षकांपासून सेवकापर्यंत आणि मुख्याध्यापकांपासून वॉर्डन पर्यंत अनेक पदे निर्माण करीत आहोत. परंतु हा सर्व संवर्ग शाळेत वेळेवर उपस्थित असतो का ?

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री श्री.मधुकरराव पिचड साहेब उपस्थित आहेत. राज्यातील 556 आश्रमशाळांमध्ये शिक्षक, मुख्याध्यापक, आणि अधीक्षक यांची 100 टक्के उपस्थिती असल्याचे त्यांनी मला दाखवून द्यावे. माझे त्यांना आव्हान आहे.

सभापती महोदय, आपण उपस्थिती संदर्भात बायो-मेट्रीक सिस्टीम बसविली तीच मुळात फॉल्टी आहे. आपण कोणत्याही आश्रमशाळेला भेट द्यावी तेथील बायो-मेट्रीक सिस्टीम बंद असल्याचे आपणास दिसून येईल. फक्त काही आश्रमशाळांमधील बायो-मेट्रीक सिस्टीम सुरु आहे. हा माझा दावा नाही तर ते माननीय मंत्री महोदयांना आव्हान आहे. आपण दोघांनी मिळून आश्रमशाळेला भेट देऊ. आश्रमशाळांतील बायो-मेट्रीक सिस्टीम चालू असल्याचे त्यांनी मला दाखवून द्यावे. एका बोगस कंपनीला बायो-मेट्रीक सिस्टीम बसविण्याचे कंत्राट देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उपस्थितीबाबत नोंद करण्यासाठी आपला अंगठा ठेवल्यास त्या यंत्रावर त्याच्या बोटाचे इम्प्रेशन येत नाही. आपणास विश्वास वाटत नसेल तर माझ्याकडे ते बायो-मेट्रीक यंत्र आहे. मी आपणास दालनात आणून दाखवितो. तेव्हा माझी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या बायो-मेट्रीक खरेदीची सी.आय.डी.चौकशी करण्यात यावी. माननीय मंत्री महोदयांकडून चौकशी करण्यात येईल अशी माननीय मंत्री महोदयांकडून घोषणा करण्यात येते, परंतु त्याचे पुढे काय होते हे आम्हाला समजत नाही.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गरम पाणी मिळावे म्हणून त्या ठिकाणी सोलर सिस्टीम बसविली आहे. एका टी.व्ही.चॅनेलवर आपण दोघेजण समोरासमोर असताना आपण सांगितले होते की, काही अपवाद सोडल्यास राज्यातील सर्व आश्रमशाळांतील सोलर सिस्टीम सुरु आहे आणि विद्यार्थ्यांला आंघोळीसाठी गरम पाणी मिळते. मी या ठिकाणी पुन्हा सांगू इच्छितो की, 556 अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी नदीवर आंघोळ करीत नसतील किंवा शाळेच्या न्हाणीघरात थंड पाण्याची आंघोळ करीत नसतील तर आज मी आपल्यासमोर माननीय सभापतींकडे राजीनामा देतो आणि मी जी बाब सांगत आहे ती सत्य असेल तर माननीय मंत्री महोदयांनी राजीनामा द्यावा हे माझे आपणास आव्हान आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:50

डॉ.दीपक सावंत....

माननीय मंत्री महोदय, आपण टी.व्ही. चॅनेल्सच्या माध्यमातून बरेच काही सांगितले होते. आपण सांगायला पाहिजे की, 556 पैकी किती आश्रमशाळांमध्ये विद्यार्थी गरम पाण्याने आंघोळ करतात. किती मुलींना शौचालय आणि स्नान घरे उपलब्ध आहेत.

महोदय, आश्रमशाळांमध्ये सोलार सिस्टीमचे केवळ पॅनल्स आहेत. सोलार सिस्टीम का चालत नाही याची अनेक कारणे सांगितली जातात. आश्रमशाळेतील अधीक्षक सांगतात की, सोलार सिस्टीमची बॅटरी आदिवासी लोक चोरुन आपल्या ट्रान्झिस्टरला लावतात. अशी कारणे देऊन आदिवासींची बदनामी केली जाते. जर आश्रमशाळेतील एखाद्या वस्तूची चोरी होत असेल तर आश्रमशाळेतील सुरक्षा रक्षक काय करतात ? महोदय, माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.मधुकरराव पिचड यांच्याकडून आम्हाला खूप अपेक्षा होत्या. परंतु गेल्या चार अधिवेशनात त्यांनी एकाही गोष्टीचे समर्पक उत्तर दिले नाही असा माझा दावा आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, आदिवासी विभागांतर्गत करण्यात आलेल्या साहित्य खरेदी घोटाळ्याची चौकशी झाली पाहिजे. या खरेदी घोटाळ्याची खरेदी करण्यासाठी विभागाने एक समिती नेमली आहे. त्या समितीने चार-सहा-बारा महिन्यात किंबहुना निश्चित केलेल्या कालमर्यादेत चौकशी अहवाल सादर केला पाहिजे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, त्या चौकशीत जे काही समोर येईल त्या संदर्भात सी.आय.डी. चौकशी करण्यात येईल काय ?

महोदय, आता मी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक-68, पृष्ठ क्र.88 वर बोलतो. आज वैद्यकीय शिक्षणाची परिस्थिती बघितली तर खाजगी वैद्यकीय महाविद्यालय आणि डीम्ड् युनिव्हर्सिटी या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांवर अतिक्रमण करु पाहत आहेत. विशेषत: शासकीय महाविद्यालयातील प्राध्यापक आपल्या पदाचा राजीनामा देऊन खाजगी महाविद्यालयाची नोकरी स्वीकारत आहेत. कारण त्या ठिकाणी पगार जास्त मिळतो. अशी अनेक कारणे आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील नोकरी स्वीकारत असतील तर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा दर्जा कसा सुधारेल. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, खाजगी महाविद्यालये निर्माण होण्यापूर्वी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जी पध्दत होती तीच पध्दत पुन्हा का सुरु करीत नाही ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

महोदय, आज नर्सिंग फेडरेशनचा संप सुरु आहे. वर्तमानपत्रात बातमी आली आहे की, नर्सिंग फेडरेशनचा संप सुरु असला तरी सर्व रुग्णालये व्यवस्थित सुरु आहेत. महोदय, ट्रेनी नर्सेस कडून हे काम करुन घेतले जात असल्यामुळेच रुग्णालये सुरु आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, प्रशिक्षित नर्सेसच्या ऐवजी ट्रेनी नर्सेसकडून अशा प्रकारे सेवा करुन घेणे योग्य आहे काय ? या निमित्ताने मी विनंती करतो की, सरकारने नर्सिंग फेडरेशनचा प्रश्न सोडविला पाहिजे.

महोदय, आता मी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक-67, पृष्ठ क्रमांक-83 वर बोलत आहे. महोदय, मागील अधिवेशनात मी उपस्थित केलेल्या एका लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी असे सांगितले होते की, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेवर 546 कोटी रुपये खर्च झालेला आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, 546 कोटी रुपयांमध्ये मुंबई व उपनगरात किती खर्च झाला आणि किती रुग्णांना या योजनेचा फायदा झाला हे सभागृहाला समजले पाहिजे. कारण मुंबईतील लोकाना या योजनेची मुळात कमी माहिती आहे. या योजनेच्या बाबतीत जेवढी जनजागृती व्हावयास हवी होती तेवढी झाली नाही. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ काही महत्त्वाच्या जिल्ह्यातील महत्त्वाचे पुढारीच घेतात असा माझा दावा आहे. या निमित्ताने मी सुचवू इच्छितो की, राजीव गांधी जीवनदायी योजनेत कोणत्या जिल्ह्यांमध्ये किती शस्त्रक्रिया झाल्या आणि त्या कोणाच्या शिफारशींमुळे झाल्या या बाबतचा अहवाल सभागृहात सादर केला तर सत्य परिस्थती समोर येईल.

महोदय, आता मी महिला व बालविकास विभागाच्या बाब क्रमांक- 88, पृष्ठ क्रमांक-119 वर बोलणार आहे. राज्य सरकारने एक नवीन फंडा काढल्याचे मी वर्तमानपत्रात वाचले. आता आरोग्य आणि शिक्षणाचे काम टाटा उद्योग समूहाला दिले जाणार आहे. यापूर्वी वर्तमानपत्रात अशी बातमी आली होती की, पालघरमध्ये जेट्टीचे कंत्राट जिंदाल कंपनीला दिले जाणार आहे. कारण कुपोषणाला आळा घालण्यासाठी जिंदाल डॉक्टर पुरविणार आहे. या विरोधात शिवसेना आणि अन्य पक्षाच्या लोकांनी जिंदाल कंपनीला जेट्टीचे काम देण्यासाठी विरोध केला होता. राज्य सरकार शिक्षणाला इंडस्ट्री म्हणून ट्रीट करणार आहे काय, आरोग्य विषयक कामे टाटा कंपनीला देऊन हॉस्पीटलला इंडस्ट्री म्हणून ट्रीट करणार आहे काय ? कुपोषणाला आळा घालण्यासाठी

..3..



SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:50

डॉ.दीपक सावंत....

राज्य सरकार एन.आर.एच.एम.च्या माध्यमातून करोडो रुपये खर्च करते. अशा वेळी आरोग्याचे काम जिंदाल कंपनीला देण्याची परिस्थिती का निर्माण झाली ? हे मी विशेषत: वाडा, मोखाडाच्या बाबतीत बोलत आहे. आरोग्य, शिक्षण विषयक कामे खाजगी कंपन्यांना देण्याची वेळ सरकारवर का आली हे सांगण्याची आवश्यकता आहे. कुपोषणाचा विषय जिंदाल कंपनीला देऊन सुटणार नाही. कारण जिंदाल कंपनीचे लोक जेट्टी पूर्ण होईपर्यंत या कामी मदत करतील आणि त्यानंतर पुन्हा कुपोषणाचा प्रश्न वाऱ्यावर सोडला जाईल.

महोदय, मी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मांडलेल्या प्रत्येक मुद्याचे माननीय मंत्री महोदयांनी समर्पक आणि विस्तृत उत्तर द्यावे अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

-----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे (नामनियुक्त) : महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक-56, पृष्ठ क्रमांक-74 वर मी बोलणार आहे. दलित वस्ती सुधार योजनेच्या बाबतीत केलेली तरतूद अतिशय कमी आहे. कारण राज्यातील सबंध दलित वस्त्यांचा विचार केला आणि केलेल्या तरतुदीचा विचार केला तर ती अपुरी आहे. या बाबतीत माननीय राज्यमंत्र्यांनी विचार करावा अशी मी विनंती करतो. तसेच अधिक दलित वस्त्यांमध्ये जास्तीत जास्त सुधारणा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा.

महोदय, घरकुल योजना ही अतिशय चांगली आहे. परंतु ती गोगलगाईच्या चालीनुसार सुरु आहे. या योजनेचा उपेक्षित वर्गाला जो फायदा व्हावयास पाहिजे त्या प्रमाणात होत नाही. शासनाने ही योजना राबविताना अशी पध्दत अवलंबली आहे की, एक घर झाल्यानंतर दुसऱ्या घराचे काम हाती घ्यावे. परंतु हे चुकीचे आहे. घरकुल योजनेंतर्गत एका गावात एकाच वेळी किमान 25 घरकुलांचे बांधकाम सुरु केले तर निश्चित कालावधीत घरकुल योजना पूर्ण होऊ शकेल. माननीय राज्यमंत्र्यांनी निश्चितपणे या दृष्टीने विचार करावा.

महोदय, सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्ष नेते बसलेले आहेत. त्यांनी आपल्या भाषणात उप अभियंता श्री.धोत्रे यांच्या नावाचा उल्लेख केला. श्री.धोत्रे हे दलित वर्गातील आहेत. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, श्री.धोत्रेंच्या कामात कोणकोण अडथळे आणतात आणि त्यांच्याकडे काय काय मागणी करतात याची निश्चितपणे चौकशी केली पाहिजे. कारण दलित अधिकाऱ्याच्या बाबतीत ताबडतोब तक्रार केली जाते. त्यामुळे आपण सखोल चौकशी करुन त्यानंतरच कारवाई करावी अशी विनंती करतो.

महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मागासवर्गीय औद्योगिक संस्थांचा उल्लेख केला. मागासवर्गीय औद्योगिक संस्थांमध्ये काय घोटाळे झाले याची निश्चितपणे चौकशी केली पाहिजे. परंतु ज्या तरुणांनी आपल्या हाताला काम मिळेल म्हणून आपले घर, जमीन विकून औद्योगिक संस्था स्थापन केल्या त्यांचाही विचार केला पाहिजे. परंतु आज दलित समाजातील तरुणांची अवस्था धोबी का कुत्ता न घर का, न घाट का, अशी झाली आहे. परंतु ज्यांनी भ्रष्टाचार केला असेल त्यांना तुरुंगात पाठवा. दलित समाजातील ज्या तरुणांनी औद्योगिक संस्था स्थापन

..5..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

केल्या त्यांना पत पुरवठा करण्याची हमी सरकारने घेतलेली आहे. त्यानुसार त्यांना तातडीने पत पुरवठा करावा, अशी मी विनंती करतो.

महोदय, इंदु मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्याबाबतचा ठराव लोकसभेत मांडला जाईल आणि स्मारकाचे काम सुरु होईल अशी अपेक्षा होती.

नंतर श्री.कांबळे........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे ....

परंतु, काही कारणांमुळे तो ठराव लोकसभेत आला नाही. मी आपल्या वतीने शासनाला या संदर्भात विनंती करतो. माननीय मुख्यमंत्र्यांचा माननीय पंतप्रधानांच्या समवेत दांडगा संपर्क आहे. ताबडतोबीने हा अध्यादेश काढण्यात यावा. इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी अध्यादेश काढण्यात यावा, अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानांना विनंती करावी, अशी मी त्यांना विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय भीम !

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मी आता नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 20, 25, पृष्ठ क्रमांक 26, 27 वर बोलणार आहे. मला ट्रान्सपोर्टच्या संदर्भात बोलायचे होते. परंतु, विभागाचे माननीय मंत्री, माननीय राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. पुणे व पिंपरी-चिंचवड मनपाच्या कायमस्वरूपी नागरी परिवहन प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद व या प्रकल्पाच्या कर्जासाठी आर्थिक तरतूद या पुरवणी मागणीद्वारे करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यात 7 मनपा आहेत. उल्हासनगर, भिवंडी या मनपांमध्ये परिवहन सेवा पूर्णपणे बंद झाली आहे. वसई-विरार मनपा, मिरा-भाईंदर मनपा येथे कंत्राटी पध्दतीने परिवहन सेवा सुरू आहे. ठाणे मनपामध्ये देखील काही प्रमाणात कंत्राटी पध्दतीने परिवहन सेवा सुरू आहे. वाशी व केडीएमसी या मनपांमध्ये देखील परिवहनच्या संदर्भात फारशी चांगली परिस्थिती आहे असे नाही. ठाणे परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. ठाणेकर जनता नोकरीच्या संदर्भाने मुंबईशी संलग्न आहे. त्यांच्यासाठी चांगली सुखकर सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून पुणे व पिंपरी-चिंचवड मनपांप्रमाणे कायमस्वरूपी नागरी परिवहन प्रकल्पासाठी जी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे त्याच धर्तीवर ठाणे मनपा व इतर मनपा यांचे एक संयुक्त परिवहन मंडळ केले आणि त्यांच्या माध्यमातून आर्थिक हातभार लावला तर या महानगरपालिकांनाही शासनाच्या माध्यमातून फार मोठ्या प्रमाणात दिलासा मिळेल. मुंबई शहरात नुकतेच मोनो व मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरू करण्यात आले. ठाणे शहर देखील या प्रकल्पांची आतुरतेने वाट पाहत आहे.

सभापती महोदय, आता मी विधी व न्याय विभागाच्या बाब क्रमांक 45, पृष्ठ क्रमांक 55 वर बोलणार आहे. दिवाणी व सत्र न्यायालयांच्या इमारतींसाठी आर्थिक तरतूद प्रस्तावित केली आहे. तथापि, भिवंडी, जिल्हा ठाणे येथील न्यायालयीन इमारतींचे बांधकाम अनेक वर्षांपासून अपूर्ण स्थितीत आहे. त्यामुळे तेथील न्यायालयांतील कामकाजांवर परिणाम होऊन जनतेला त्रास होत आहे. शासनाने या संदर्भातही निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आता मी महिला बालविकास विभागाच्या बाब क्रमांक 89, पृष्ठ क्रमांक 119 वर बोलणार आहे. शासनाने सुकन्या बालविकास योजना सुरू केली आहे. या योजनेनुसार

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे ....

नवीन जन्माला येणाऱ्या मुलींना जन्माच्या वेळेपासून प्रत्येक वर्षी 21,200 रूपये शासनाने भरणे असून वयाच्या दहाव्या वर्षी एकत्रित 1 लाख रूपये देण्यात येणार आहेत. तथापि, या शासकीय योजनेचा लाभ उठविण्यासाठी काही तल्लख मेंदू महाराष्ट्र राज्य शासनाच्या नोकरीचे आमिष दाखवित बेरोजगारांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करीत असल्याचे उघड झाले आहे. नियुक्ती कायम करण्यासाठी 13,500 रूपये आणि 21,500 रूपये खात्यावर भरणे बंधनकारक असल्याचे कळविण्यात आले आहे. हे पैसे ज्या अकाऊंटवर भरायचे आहेत त्या अकाऊंटचा नंबरही मध्य प्रदेशचा असल्याचे स्पष्ट झाले आहे. योजना महाराष्ट्र शासनाची, पत्र दिल्लीतून आणि अकाऊंट नंबर मध्यप्रदेशचा या प्रकाराने उमेदवारांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. शासनाने या संदर्भात लक्ष घालून बेरोजगारांची फसवणूक होऊ नये यासाठी तातडीने कार्यवाही करावी आणि खुलासा करावा, एवढी बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभागाने पुणे व पिंपरी- चिंचवड यासाठी तरतूद केली आहे. गेले 4 वर्षे हा विषय प्रलंबित होता. त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढत चालली आहे. आपण ही तरतूद केलेली असताना परत ही तरतूद तुटपुंजी राहील अशी परिस्थिती आहे. वाढीव किंमती लक्षात घेऊन त्यासाठी किती तरतूद करावी लागणार आहे हे पाहून पूर्ण अर्थसंकल्प मांडाल त्यावेळी विचार करणे गरजेचे आहे. माझा दुसरा मुद्दाही नगरविकास विभागाच्या संदर्भात आहे. नगरविकास विभागाकडून दृष्टीविषयक धोरण समोर आले पाहिजे ते येत नाही. पुणे मनपाला जोडून नवीन पुणे मनपा स्थापन करावी अशी मागणी आसपासच्या अनेक गावांतून येत आहे. हडपसर, हवेली, भोर या तालुक्यांतील गावांचा त्यामध्ये समावेश होऊ शकतो. त्यामुळे नवीन पुणे मनपासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मी मागणी करीत आहे. मला एक खंत व्यक्त करायची आहे. 15-20 दिवसांपूर्वी स्वस्त घरांच्या मागणीसाठी मंत्रालयासमोर हजारो लोक आले, त्यांना फॉर्म दिले गेले. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, आम्ही या संदर्भात चौकशी करू. नगरविकास विभागाचे माननीय राज्यमंत्री सभागृहात आहेत. हजारो लोकांची दिशाभूल झाली आहे. अनेक लोक या संदर्भात जबाबदार आहेत. ज्या योजनेच्या अपेक्षेमुळे शेकडो लोक आले, त्यांना पुन्हा घरासाठी अर्ज भरताना देखील भीती वाटू लागली आहे. आपली फसवणूक होईल की काय असे त्यांना वाटू लागले आहे. स्वस्त घरांच्या योजनांच्या संदर्भात वेबसाईटवर नीट माहिती टाकून लोकांसाठी मार्गदर्शन कक्ष स्थापन केला पाहिजे, जेणेकरून गरीब लोकांची आणि महिलांची फसवणूक होणार नाही.

महोदय, सामाजिक न्याय विभागाने बाब क्रमांक 58, 59, 60, 61 नुसार 7 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. अपंग, मतिमंद मुलांच्या संस्था आहेत. त्यामध्ये मुलींवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. विशाखा निकालपत्रानुसार समाजकल्याण विभागाने राज्यस्तरीय समिती गठीत करावी, जेणेकरून विशेष गरज असलेल्या निवासी संस्थांसाठी 7 कोटी रूपयांची तरतूद योग्यरीतीने लागू होईल. त्याचा गैरवापर होत आहे की काय





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

हे तपासून समाजिक न्याय विभागानेच वरच्या स्तरावर या संदर्भात कार्यवाही करावी. जसा राज्य महिला आयोग असतो त्या पध्दतीने सामाजिक न्याय विभागाने विशाखा निकालपत्राची अंमलबजावणी करण्यासाठी एखादी समिती गठीत करावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 65 नुसार समाजकल्याण विभागाच्या संस्थांतील लोकांच्या वेतनासाठी 36 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. ती योग्य आहे. अनेक वर्षे सामाजिक संस्थांतील प्राध्यापक, शिक्षक, इतर कर्मचारी वर्ग यांच्या मागण्या प्रलंबित होत्या. सदर मागण्यांच्या संदर्भात अंमलबजावणी करणे गरजचे आहे. अनेक तीर्थक्षेत्रांचा उल्लेख सातत्याने पुरवणी मागण्यांत येत आहे. त्यासाठी स्वतंत्र तीर्थक्षेत्र पर्यटन विभाग करणे गरजेचे आहे, मग तो नगरविकास विभागाशी संबंधित असो किंवा ग्रामविकास विभागाशी संबंधित असो. तीर्थक्षेत्रे पर्यटन एकमेकांना जोडले जाऊन त्याचे कामकाज होऊ शकेल. महिला बचत गटांतून काही वेळा सावकारी वाढत असल्याचे दिसत आहे, असे विधान मी वाचले. मला त्या संदर्भात सुचवावयाचे आहे. बचत गटांकडून पतपेढ्या आणि बँका असतात. केंद्र शासनाने निर्भया योजनेसाठी 1 हजार कोटी रूपयांची तरतूद केली. मग राज्याने यासाठी काय केले ? ते महिला बँकांपर्यंत, महिला बचत गटांपर्यत पोहचले तर सावकारीच्या संदर्भातील गैरवापराला योग्य कलाटणी देता येईल, याकडे मी लक्ष वेधते. धन्यवाद ! जय महाराष्ट्र !

----

..6

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मी आता शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 15 ते 19, पृष्ठ क्रमांक 21 वर बोलणार आहे. शासनाने फक्त क्रीडा विभागावरील पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत. 'कायम' शब्द काढलेल्या राज्यातील प्राथमिक, माध्यमिक शाळांकरिता तरतूद करणे याचा समावेश केला जावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे. राज्यातील कायम विनाअनुदान तत्वावरील 1150 उच्च माध्यमिक तुकड्यांचा 'कायम' शब्द काढला आहे. त्यांचाही तरतुदीमध्ये समावेश झालेला नाही, तो झाला पाहिजे होता. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक शाळांना 10 मानके पूर्ण करा, अशी नोटीस दिली आहे. त्या शाळांची मानके पूर्ण नाहीत म्हणून त्यांच्या मान्यता काढण्याच्या गंभीर नोटीसा दिल्या आहेत. परंतु, आरटीई अंतर्गत त्या शाळांना निधी पुरविण्याची शासनाची जबाबदारी आहे. त्या संदर्भातील तरतूद शासनाने यामध्ये केलेली नाही.

सभापती महोदय, आता मी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 84, पृष्ठ क्रमांक 114 वर बोलणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या संदर्भात 1 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. दिनांक 24 नोव्हेंबर, 2001 पूर्वी मान्यता दिलेल्या 78 महाविद्यालयांचा 'कायम' शब्द काढण्यास शासनाने अनुकूल भूमिका घेतली आहे. पण त्याचे पडसाद यामध्ये उमटलेले नाहीत. ते उमटण्याची गरज आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे.......

सभापती महोदय, कामगार व सेवायोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 114 वरील बाब क्रमांक 85 अन्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी कंत्राटी सेवांवरील खर्च भागविण्याकरिता सुमारे 12 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. परंतु, कंत्राटी पध्दतीवरील निदेशकांना नियमित करण्याबाबतचा उल्लेख कोठेही दिसत नाही. रिक्त पदे भरण्यासाठी तरतूद केलेली नाही. मेंटेनन्स ग्रँटची तरतूद केलेली नाही. कायम अनुदानित खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना निधी देण्याचा उल्लेखही नाही.

सभापती महोदय, अपंग कल्याण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 74 वरील बाब क्रमांक 58 अन्वये अपंग व्यक्तींसाठी विविध योजनांची सुविधा देण्याकरिता सहायक अनुदानासाठी तरतूद करण्यात आली आहे. एकात्म शिक्षण योजनेअंतर्गत राज्यात सुमारे 600 माध्यमिक शाळा आहेत व या शाळांमध्ये गेल्या 15 वर्षांपासून शिक्षक काम करीत आहेत. गेल्या 3 वर्षांपासून त्यांना वेतन मिळालेले नाही. त्यांना वेतन अदा करण्यासंबंधीची तरतूद कोठेही दिसत नाही.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 74 वरील बाब क्रमांक 56 अन्वये दलित वस्त्यांची सुधारणा करण्याकरिता अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. यापूर्वी केंद्रीय आश्रमशाळांना निधी देण्याचे शासनाने निर्धारित केले आहे. परंतु, त्यासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही.

सभापती महोदय, मी निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटींबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 21 वरील बाब क्रमांक 19 अन्वये तालुका क्रीडा संकुलांसाठी तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने एक गंभीर बाब मला आपल्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. तेजस्विनी मुळे ही आंतरराष्ट्रीय दर्जाची नेमबाज आहे, याची आपल्याला सर्वांना कल्पना आहे. ऑलिम्पिकमध्ये सहभागी होण्यासाठी ती मेहनत घेत आहे. राज्य सरकारने शिवछत्रपती पुरस्कार देऊन तिचा गौरव केला आहे. राज्याला आणि देशाला सन्मान मिळवून देणाऱ्या आणि भविष्यात आणखी सन्मान मिळवून देण्याची शक्यता असलेल्या खेळाडूला क्रीडा विभागाच्या अधिकाऱ्यांनी बालेवाडी क्रीडासंकुलातून हाकलून दिले आहे. यामुळे ऑलिम्पिकमध्ये सहभागी होण्याचे तिचे स्वप्न साकार होऊ शकणार नाही. प्रति दिवस 800 रुपये आणि वार्षिक 1 लाख रुपये भरण्याची सूचना तिला कळविण्यात आली होती. क्रीडा विभागाला ऑलिम्पिकसाठी खेळाडू पाठविण्याची इच्छा आहे किंवा नाही, असा प्रश्न या घटनेमुळे निर्माण झ ाला आहे. एका बाजूला राज्य शासनाने शिवछत्रपती पुरस्कार देऊन तिचा सन्मान केला आणि दुसरीकडे क्रीडा संचालकांनी तिला क्रीडा संकुलातून थेट हाकलून दिले. ती आता औरंगाबादला आली आहे. माझी या निमित्ताने अशी विनंती आहे की, जे कोणी संचालक आहेत, त्यांच्यावर कारवाई करावी आणि तिची बालेवाडीत नि:शुल्क व्यवस्था करावी.

सभापती महोदय, वेळ अतिशय कमी असल्यामुळे मी माझे भाषण येथे आटोपते घेतो.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 83 वरील बाब क्रमांक 67 अन्वये सन 2013-2014 साठीचा अधिक खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, मुंबईतील जेजे हॉस्पिटल, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आणि जीटी हॉस्पिटल मधील नर्सेस संपावर गेल्या आहेत. त्यांच्या मागण्यांसंदर्भात दिनांक 5-12-1996 रोजी सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. नर्सेसची 2536 पदे रिक्त असून नर्सेसची अवस्था अत्यंत वाईट आहे. त्यांना आवश्यक असणारी साधनसामुग्री उपलब्ध करुन दिली जात नाही. चतुर्थ श्रेणीतील कामगार भरले जात नाहीत. अशा परिस्थितीत गेली 10 वर्षे जे कामगार आपल्याला सहकार्य करीत आहेत त्यांना सेवेत कायम केले जात नाही. या व अन्य काही मागण्यांसाठी आज ते संपावर गेले आहेत. या रुग्णालयात अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत रुग्णांना आणणे, त्यांची स्वच्छता ठेवणे, त्यांना ॲडमिट करुन घेणे, त्यांची प्राथमिक तपासणी करणे, स्पंजिंग करणे, अशा प्रकारची कामे त्यांच्याकडून केली जातात. परंतु, जंतुनाशके, कॉटन, बँण्डेज, बेड, चादरी, कपडे अशा प्रकारचे साहित्य या रुग्णालयांमध्ये उपलब्ध नसते. रिक्त पदांवर नर्सेसची भरती केली जात नाही. शासकीय रुग्णालयांची एवढी भयंकर अवस्था आहे की, नर्सेसना संपावर जावे लागत आहे. यासाठी तातडीने निधी मंजूर करावा आणि त्यांच्या सर्व मागण्या, ज्या सर्वोच्च न्यायालयाने मान्य करण्यास सांगितल्या आहेत, त्यासाठी तातडीने तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या पृष्ठ 119 वरील बाब क्रमांक 88 अन्वये पिडीत महिला व बालक मनोधैर्य योजनेकरिता तरतूद केली आहे. राज्यातील बलात्कार, लैंगिक शोषण व ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना वित्तीय सहाय्य या योजनेव्दारे उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

सभापती महोदय, आज अशी परिस्थिती आहे की, अशा प्रकारच्या अनेक प्रकरणात निधी देण्यास प्रशासनाकडून विलंब होत आहे. हा विलंब टाळला गेला पाहिजे. शासनाने अतिशय चांगले उपक्रम राबविले आहेत. अंगणवाडी सेविकांना मानधन वाढवून दिले आहे, त्यांना पेन्शनही दिले आहे. त्याबद्दल मी शासनाचे आभार मानते.

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

सभापती महोदय, नगरविकास विभागासाठी पृष्ठ 26 वर बाब क्रमांक 20, 21, 22, 23 अन्वये विविध उपक्रम राबविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मी शासनाला एक सूचना करणार आहे. शहरांचा मोठ्या प्रमाणावर विकास होऊ घातला आहे. शहरांमध्ये मोठमोठे रस्ते, पूल होत आहेत. मोठमोठे टॉवर्स बांधले जात आहेत. परंतु, त्यासाठी श्रमदान करणारा जो श्रमिक वर्ग आहे, त्यांना नाईलाजास्तव झ ोपडपट्टयांमध्ये रहावे लागत आहे. हा केवळ एका शहराचा नाही तर प्रत्येक शहराचा प्रश्न आहे. मला असे वाटते की, या अधिवेशनापासून आपण एक विशेष तरतूद करण्याबाबतचा निर्णय घ्यावा आणि पुढील 10 वर्षासाठी दरवर्षी 5000 कोटी रुपये मंजूर केले तर झोपडपट्टयांचा प्रश्न सुध्दा निकाली लागू शकतो. आज आपण विविध स्मारके उभी करीत आहोत. शिवछत्रपतींचे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे, शाहू महाराजांचे स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याबद्दल निश्चितपणे मला आनंद आहे. पण या महापुरुषांनी विषमतेविरुध्द जो लढा दिला आहे, तो लढा पुढे नेण्यात आपण कुठे तरी कमी पडत आहोत, अशी परिस्थिती आहे. त्यासाठी सुध्दा आपण प्रयत्न केले पाहिजेत, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 75 वरील बाब क्रमांक 59, 60, 61, 62, 63 व 64 अन्वये अंध व्यक्तींसाठी, बहिऱ्या व मुक्या व्यक्तींसाठी, अस्थिविकलांग व्यक्तींसाठी, मनोविकलांग व्यक्तींसाठी, विकलांग, वृध्द, निराधार व्यक्तींसाठी तरतूद करण्यात आली आहे. ही अभिनंदनीय बाब आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 89 वरील बाब क्रमांक 69 अन्वये अन्न व औषध प्रशासनाची पुनर्रचना व अन्न व औषध चाचणीविषयक प्रयोगशाळांची स्थापना करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. ही देखील अभिनंदनीय बाब आहे.

सभापती महोदय, मला अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडायचे होते. परंतु, सभागृहामध्ये नेहमीच असे होते की, पहिल्या वक्त्यांना एक-एक तास दिला जातो आणि शेवटी आम्हाला संधीही दिली जात नाही. महिलांची संख्या अतिशय कमी असून देखील त्या महिलांना महत्त्वाच्या विषयांवर बोलण्याची संधी दिली जात नाही, याचा मी निषेध करते आणि थांबते.

--------------



SRR/ KTG/ D/ प्रथम श्री.मंगेश कांबळे........ 13:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 76 वरील बाब क्रमांक 63, 64 आणि 65 अन्वये श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि समाजकल्याण संस्थांसाठी तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकार स्वयंसेवी संस्थांना अनुदान देत असते. या अनुदानाचे प्रस्ताव 30 सप्टेंबर पर्यंत केंद्र सरकारकडे पोहोचले पाहिजेत, अशी अपेक्षा आहे. गेल्या 5 वर्षात सामाजिक न्याय विभागाने अनुदानाच्या संदर्भातील एक प्रस्ताव देखील पाठविलेला नाही. त्यामुळे या संस्थांवर अन्याय होत आहे.

सभापती महोदय, अस्वच्छ काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांना शैक्षणिक स्कॉलरशिप मिळाली पाहिजे, यासाठी केंद्र सरकारने तरतूद केली आहे. परंतु, सामाजिक न्याय विभागाने या कामगारांच्या मुलांना शैक्षणिक स्कॉलरशिप मिळावी, यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविलेच नाहीत. त्यामुळे लोकांमध्ये असंतोष आहे. याबाबतची सर्व माहिती मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 69 वरील बाब क्रमांक 52 अन्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अन्नधान्य खरेदीसाठी तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, राज्यात अन्न सुरक्षा अधिनियमाची अंमलबजावणी सुरु आहे. पहिल्या टप्प्यात असे लक्षात आले की, शेकडो लोकांची नावे या यादीत नाहीत. त्यामुळे ते हवालदिल झ ाले आहेत. यादी तयार करीत असताना त्याचे निकष लोकांना कळले पाहिजेत. रेशनिंग दुकानात किंवा ग्राम पंचायतीच्या कार्यालयात लोकांच्या नावाच्या याद्या प्रसिध्द केल्या पाहिजेत. याबाबत शासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 83 वरील बाब क्रमांक 67 अन्वये सन 2013-2014 साठीचा अधिक खर्च भागविण्यासाठी तरतूद केली आहे.

सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजनेची अंमलबजावणी संदर्भातील निकष, कार्यपध्दती देखील लोकांना कळली पाहिजे. त्यासाठी राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्राम

...6....



ॲड.जयदेव गायकवाड.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पंचायती आणि सावर्जनिक ठिकाणी या संदर्भातील माहिती प्रसिध्द केली जावी, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 76 वरील बाब क्रमांक 65 अन्वये समाजकल्याण संस्थांसाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, शासनाने मागासवर्गीय औद्योगिक संस्थांना दिले जाणारे अर्थसहाय्य थांबविले आहे. तसे पाहिले तर हे अर्थसहाय्य थांबविण्याचे काही कारण नाही. काही बोगस संस्थांनी भ्रष्टाचार केला म्हणून गेल्या 3 वर्षांपासून प्रस्तावच मागविले जात नाहीत. अनेक नवीन प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले असले तरी ते प्रलंबित ठेवले आहेत, त्यावर निर्णय घेतला जात नाही. मंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष घालून प्रस्ताव मान्य केले पाहिजेत, अशा प्रकारची मागणी मी करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

...7....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी फक्त दोन महत्त्वाचे मुद्दे मांडणार आहे. आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 94 वरील बाब क्रमांक 70 आणि 71 अन्वये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारवर्गाचा भविष्य निर्वाह निधी आणि शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळेसाठी विविध पदे निर्माण करण्यासाठी तरतूद केली आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागासाठी काही नवीन पदे शासनाने निर्माण केली आहेत. त्या नवीन पदांच्या निर्मितीसाठी ही तरतूद केलेली आहे. या संदर्भात आदिवासी विकास विभागाला मी पत्रही दिलेले आहे. शासकीय आश्रमशाळांमध्ये माध्यमिक, प्राथमिक व कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश आहे. या शासकीय आश्रमशाळांमध्ये काम करणारे अनेक उच्चशिक्षाविभूषित शासकीय कर्मचारी आहेत. ज्याप्रमाणे ग्राम विकास विभागात शिक्षकांना विस्तार अधिकारी पदावर पदोन्नती दिली जाते, त्याप्रमाणेच आदिवासी विकास विभागाने देखील बाब क्रमांक 70 आणि 71 अन्वये नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या पदांना, त्यामधील शासकीय आश्रमशाळातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या पृष्ठ 88 वरील बाब क्रमांक 68 अन्वये शिष्यवृत्त्या व विद्यावेतनासाठी तरतूद केली आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. दिनांक 24/10/2013 च्या परिपत्रकानुसार महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 30 ऑक्टोबरची मर्यादा 30 नोव्हेंबर अखेरपर्यंत वाढवून दिली होती. अनेक विद्यार्थ्यांनी त्या वाढीव मुदतीमध्ये प्रवेश घेतले आहेत. परंतु, आता आरोग्य विद्यापीठाकडून त्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसू दिले जात नाही. या संदर्भात मंत्री महोदयांना मी भेटलो आहे व निवेदनही दिलेले आहे. हे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये म्हणून त्यांना परीक्षेस बसण्याची संधी द्यावी, अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

यानंतर श्री.मारोती शिगम......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ D/ MMP/ पूर्वी श्री. रोझेकर 13:20

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : तालिका सभापती महोदय, सन 2013-2014च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 21 वरील बाब क्रमांक 19 मध्ये तालुका क्रीडा संकुलास सहायक अनुदाकरिता 30 कोटी 42 लाख रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. 5 वर्षापूर्वी कोल्हापूरला विभागीय क्रीडा संकुल करण्याचे ठरविले होते. या संकुलासाठी 8 कोटी रुपयाची तरतूद केलेली होती. परंतु प्लॅन्स चुकल्यामुळे ते पैसे पाण्यात गेले. आता नव्याने 26 ते 27 कोटी रुपयाचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून या पुरवणी मागण्यामध्ये या विभागीय संकुलासाठी एक रुपयाची देखील तरतूद करण्यात आलेली नाही. तसेच शालेय शिक्षण विभागासाठी या पुरवणी मागण्यामध्ये एकही योजना नाही. माननीय शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी 15 मार्चच्या आत वेतनेतर अनुदान देण्याची घोषणा केली होती. परंतु ते वेतनेतर अनुदान देण्यासाठी या पुरवणी मागण्यामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. विनाअनुदानित शाळांचा "कायम" शब्द काढण्यात आलेला असला तरी अद्यापपर्यंत एकाही शाळेला अनुदान दिलेले नाही हे मी या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास आणून देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

25-02-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) X-2

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : तालिका सभापती महोदय, सन 2013-2014च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

तालिका सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या मागण्यावर बोलत असताना मी माननीय शालेय शिक्षण मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो कारण शिक्षणाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी अनेक चांगले निर्णय घेतलेले आहेत. तरीही मी सांगू इच्छितो की, ज्या 58 विनाअनुदानित माध्यमिक शाळांचा "कायम" शब्द काढलेला आहे त्या शाळांच्या अनुदानाची तरतूद या पुरवणी मागण्यांमध्ये केलेली नाही याचा मला खेद होतो.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 21 वरील बाब क्रमांक 19 मध्ये तालुका क्रीडा संकुलासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आमच्या औरंगाबाद मधील आंतरराष्ट्रीय ख्यातीची नेमबाज तेजस्वीनी मुळे हिला ज्यांनी क्रीडा संकुलातून बाहेर काढले ते कोण अधिकारी आहेत ? त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 114 वरील बाब क्रमांक 84 मध्ये अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या नवीन शाखांसाठी अतिरिक्त तुकडया आणि विषयांकरिता वेतन अनुदानाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. जे आज कंत्राटी पध्दतीवर अधिव्याख्याता आणि निदेशक म्हणून काम करीत आहेत त्यांना प्रथम नियमित केले पाहिजे. तसेच 1999-2000 मधील नेटसेट प्राध्यापकांचा प्रश्न मार्गी लावावा, एमसीव्हीसीचा 'कायम' शब्द काढावा आणि केन्द्रीय शाळांना अनुदान द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री) : तालिका सभापती महोदय, सन 2013-2014च्या पुरवणी मागण्यावर अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये चर्चा झालेली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी पोलीस निरीक्षक श्री. लांजिले यांच्या संदर्भात मुद्दा मांडलेला होता. लांजिले यांच्या बाबतीत एसीबी मार्फत ओपन चौकशी सुरु केलेली आहे. त्या चौकशीमध्ये सर्व गोष्टी पुढे येतील.

बॅकडोअर एण्ट्रीच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. समांतर आरक्षणाच्या बाबतीत 8 दिवसात एक बैठक घेऊन शासन योग्य तो निर्णय घेईल.

अभिनेता संजय दत्तला नियमाच्या अधीन राहून पॅरोल दिलेला आहे. जवळ जवळ 1806 कैद्यांना पॅरोल दिलेला आहे.

सीसीटीव्हीच्या संदर्भात 24/2/2014 पर्यंत टेंडर भरण्याची मुदत होती. ही मुदत 8 दिवसांनी वाढविण्यात आलेली आहे.

सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी सांगितल्या प्रमाणे 191 अनधिकृत पोलीस चौक्यांपैकी 153 पोलीस चौक्या अधिकृत करण्याबाबतचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेकडे दिलेला आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांच्या माध्यमातून या प्रस्तावास लवकरात लवकर मान्यता मिळेल अशी अपेक्षा करतो.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी खोपोली-पनवेलच्या संदर्भात मुद्दा मांडला. त्यासंदर्भात चौकशी केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विशिष्ट तक्रार सांगितली तर त्याबाबतीत चौकशी करण्यात येईल.

पोलीस स्टेटससंबंधात रेव्हेन्यू आणि सिव्हिल मॅटर्सबाबत योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी नियमाचा उल्लेख केला. हायवे जर 24 तास खुले असतील तर त्या हायवेच्या आजूबाजूला असणाऱ्या आस्थापनांना देखील काही अटी व शर्ती घालून त्या 24 तास उघड्या ठेवण्याच्या संदर्भात धोरण आखावे लागेल. नियमाप्रमाणे 11.00 वाजेपर्यंत हॉटेल्स उघडी ठेवता येतात. याबाबतीत शासन धोरणात्मक निर्णय निश्चितपणे घेईल.

..4..



MSS/ KTG/ D/ D/ MMP/ पूर्वी श्री. रोझेकर 13:20

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील...

तालिका सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 6 ते 8, ग्रामविकास विभागाच्या बाब क्रमांक 47 व 48 आणि अन्न व औषध प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 29 सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयदत्त क्षीरसागर (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री : तालिका सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 14 पुरवणी मागण्या सभागृहासमोर ठेवलेल्या आहेत. लाक्षणिक खर्चाकरिता फक्त 16 हजार रुपयाची तरतूद करावयाची आहे. सभागृहाने या मागण्या मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदय, मी या ठिकाणी टोलच्या संदर्भातील महत्वाचा विषय मांडला. एमएसआरडीसी ही संस्था मंत्री महोदयांच्या अखत्यारीत आहे. कोल्हापूरचा टोल बंद करण्याची जबाबदारी मंत्री महोदयांची आहे. टोलच्या संदर्भात झालेला करारनामा मी आपणास दाखवला आहे. तरीही मंत्री महोदय या बाबतीत एक शब्द देखील बोलण्यास तयार नाहीत.

श्री. जयदत्त क्षीरसागर : सभागृहामध्ये नियमाने बोलावे असा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा नेहमी आग्रह असतो. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ज्या बाबी सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये तो कोणता विषय नाही.

श्री. दिवाकर रावते : बाब क्रमांक 8वर बोलत असताना नगरपालिकेमध्ये होणा-या बांधकामाच्या खर्चासंबंधीचा विषय मांडला होता.

श्री. जयदत्त क्षीरसागर : बाब क्रमांक 29 ते 42 ह्या सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडित आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी कोल्हापूर मधील टोलचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला. झालेल्या खर्चाचे मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन व्हावे याकरिता माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिलेले असून त्या आदेशानुसार एमएसआरडीसीने संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये त्रिसदस्यीय समितीची नियुक्ती केलेली आहे. त्याबाबतीत कार्यवाही चालू आहे.

बाब क्रमांक 29 ते 42 सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

----

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : तालिका सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी या ठिकाणी नागपूर येथील माथाडी कामगारांच्या भरतीचा मुद्दा मांडला. मी सांगू इच्छितो की, पुण्याला ज्या पध्दतीने माथाडी कामगारांची भरती करण्यात आली तशा पध्दतीने नागपूर येथे माथाडी कामगारांची भरती करण्याचे आदेश नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील.

अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना स्वस्त दराने अन्नधान्याचा पुरवठा केला जातो. महाराष्ट्राची लोकसंख्या जवळपास सव्वाअकरा कोटी आहे. त्यापैकी 7 कोटी जनतेला अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत लाभ मिळतो. संपूर्ण लोकसंख्येपैकी ग्रामीण भागातील 76 टक्के आणि शहरी भागातील 46 टक्के लोकांना या योजनेचा लाभ मिळतो. ही योजना अतिशय चांगल्या पध्दतीने राबविली जात आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : ज्यांना खऱ्या अर्थाने या योजनेचा लाभ मिळावयास पाहिजे असे लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेले आहेत. लाभार्थींच्या यादीमध्ये बोगस लोकांची नावे आहेत. या बोगस लोकांना काढून वंचित राहिलेल्या लोकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : सव्वाअकरा कोटी लोकसंख्येपैकी 7 कोटी लोकांना या योजनेचा लाभ मिळतो. ग्रामीण भागातील 76 टक्के आणि शहरी भागातील 46 टक्के लाभार्थींना या योजनेंतर्गत लाभ मिळतो. जे लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत आणि जे सधन कुटुंबातील लोक या योजनेअंतर्गत लाभ घेत आहेत त्यांच्या बाबतीत तहसीलदाराकडे तक्रार करण्यात आली तर 8 दिवसामध्ये त्याची तपासणी करुन सधन कुटुंबातील लोकांची नावे लाभार्थींच्या यादीतून वगळण्यात येतील आणि खऱ्या लाभार्थींना योजनेचा लाभ देण्यात येईल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख........

पुण्याच्या धर्तीवर नागपूर येथे सुध्दा एक महिन्यात माथाडी कामगारांची भरती प्रक्रिया पूर्ण करावी असे जिल्हाधिका-यांना आम्ही आदेश देऊ. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या माध्यमातून मांडण्यात आलेल्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नगरविकास आणि अन्य विभागाच्या पुरवणी मागण्यांवर माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, माननीय सदस्य श्री.रामदास कदम आणि अन्य ज्येष्ठ माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत, काही सूचना केल्या आहेत.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कल्याण-डोंबिवली रुग्णालयाच्या संदर्भात एक मागणी केली आहे. कुंभमेळ्याच्या संदर्भात आणि पंढरपूरच्या संदर्भात एक मुद्दा मांडण्यात आला आहे. कल्याण-डोंबिवली येथील रुग्णालय सार्वजनिक आरोग्य विभागाकडे देण्याचा महाराष्ट्र शासनाने तत्वत: निर्णय घेतला आहे. त्यामुळे तेथील पदे भरण्याबाबत प्रश्न निर्माण झाला असून पदे भरण्यासाठी अधिक कालावधी लागणार असेल आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सर्व खर्च करणार असेल तर तातडीने त्याकरिता मान्यता दिली जाईल.

सभापती महोदय, पंढरपूर येथील कामे निकृष्ट दर्जाची सुरु आहेत, ती पारदर्शकपणाने व्हावीत असा मुद्दा मांडला होता. मी स्वत: त्या मुद्याचे समर्थन करतो. याबाबत चौकशी करुन जर त्यात कोणी दोषी आढळले तर त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, कुंभमेळ्याच्या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती नेमली असून माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती नेमली आहे. निधीचा उल्लेख केला गेला. 2278 कोटी रुपयांचा आराखडा तयार केला असून त्या आराखड्याला देखील मान्यता देण्यात येईल.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी माझ्या जिल्हयातील घटनेचा उल्लेख केला आहे. फक्त माहिती म्हणून मी सभागृहाला सांगू इच्छितो की, तेथील शाखा अभियंता दलित समाजाचा आहे. दलित समाजाच्या शाखा अभियंत्याकडे एका राजकीय पुढाऱ्याने 15-20 दिवसांपूर्वी इमारतीच्या कामासाठी पैसे मागितले. त्यानंतर विरोधी पक्षनेत्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून चाप ओढण्याचा काही लोक प्रयत्न करीत आहेत एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.विनोद तावडे : माझे हात मजबूत आहेत. मी जे काही करायचे असेल तर माझ्या हाताने करणार आहे. खांद्याचा वापर करण्याचे काही कारण नाही. मात्र तुमच्या पक्षासाठी खांदा द्यायला तयार आहे. चाप ओढणारी कोण व्यक्ती आहे हे सभागृहाला कळले पाहिजे.

....3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, पालकमंत्री या नात्याने माझा जो उल्लेख झाला त्या बाबत मी स्पष्टीकरण दिले आहे. माझे आडनाव सामंत असून माझ्याकडे अंगुलीनिर्देश करुन माननीय विरोधी पक्षनेते बोलले होते म्हणून मला स्पष्टीकरण करावे लागले. त्यांच्या खांद्याचा वापर कोणी केला हे सांगण्याचे मला धारिष्ट्य नाही किंवा औचित्य नाही असे समजावे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी लिलावती हॉस्पिटल ट्रस्टच्या संदर्भातील विषय मांडला होता. लिलावती हॉस्पिटलकरिता महाराष्ट्र शासनाने भूखंड दिलेला आहे. त्यामुळे ट्रस्ट त्या जागेवर कमर्शियल बेसवर काही करण्याचा प्रयत्न करीत असेल तर शासन नक्की हस्तक्षेप करील.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, त्या ट्रस्टमध्ये फूट पडली आहे. तो कौटुंबिक ट्रस्ट असला तरी त्यात दोन तट पडले आहेत. त्या जागेवर हॉस्पिटलच असले पाहिजे अशी ज्यांची मागणी आहे त्यांना ट्रस्टमधून बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. वेगळी नावे ट्रस्टमध्ये अंतर्भूत करण्याचा प्रयत्न होत आहे. शासनाने चौकशी करण्यासाठी समिती नेमली होती, त्या समितीने चौकशी केली आहे काय, असल्यास त्या चौकशीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय, नसल्यास किती दिवसात अहवाल सादर होणार आहे?

श्री.उदय सामंत : या समितीचा जो अहवाल येईल तो सादर करु. माननीय सदस्य सर्वश्री सतीश चव्हाण व विक्रम काळे यांनी काही मुद्दे मांडले आहेत. तेजस्विनी नावाच्या मुलीला क्रीडा प्रबोधिनीमधून हाकलून लावण्यात आले असे सांगण्यात आले. फी भरण्याचे निर्देश संचालकांनी दिले होते. सभागृहाच्या भावना लक्षात घेता नि:शुल्क प्रशिक्षण दिले जाईल. भविष्यात तेजस्विनी नव्हे तर ऑलिम्पिकमध्ये भाग घेणाऱ्या प्रत्येक खेळाडूकडे राज्य शासनाकडून याच भावनेने पाहिले जाईल.

माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी हडपसर आणि परिवहनबाबत मुद्दा मांडला आहे. परिवहनच्या संदर्भात निधीची कमतरता पडू देणार नाही. तेथील लोकप्रतिनिधींची मागणी असेल तर महापालिका करण्याचा निर्णय देखील महाराष्ट्र शासन नक्की घेईल. मी सभागृहाला विनंती करतो की, नगरविकास विभागाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी.

-------

...4...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकरराव पिचड (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवर माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, माननीय सदस्य्य सर्वश्री रामदास कदम, रामनाथ मोते यांनी आपले विचार मांडले आहेत. आदिवासी विकास विभागाच्या 556 आश्रमशाळा आहेत. या आश्रमशाळांमध्ये भोजन आणि शिक्षण एकत्र दिले जाते. राज्यात आपण पहिल्यांदा निर्णय घेतला की, शिक्षण कक्ष वेगळा आणि भोजन कक्ष वेगळा असावा. त्याकरिता मंत्रिमंडळाने पहारेकरी ते शिक्षण सह संचालकापर्यंतची 1961 नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता दिली, त्याकरिता ही पुरवणी मागणी मांडण्यात आली आहे.

सभापती महोदय, नव्याने निर्माण केलेली पदे भरल्यानंतर दर्जेदार शिक्षण दिले जाईल. आश्रमशाळामधील शिक्षण कक्ष वेगळा आणि बोर्डिंग हाऊस किपिंग कक्ष वेगळा असेल असे नियोजन करीत आहोत. राज्यात पहिल्यांदा हा कार्यक्रम हाती घेतला असून मंत्रिमंडळाने त्याला मान्यता दिली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी महत्वाची सूचना केली आहे. शिक्षक हजर रहात नाहीत याकरिता जी बायोमेट्रिक यंत्रे बसविली आहेत ती सदोष आहेत. त्यांनी जी तक्रार केली ती खरी आहे. दुर्गम भागात काही ठिकाणी वीज उपलब्ध नाही, वीज खंडित होते. बायोमेट्रिक यंत्रे सदोष असणे ही त्यांची तक्रार रास्त आहे. याची चौकशी केली जाईल. शिक्षक हजर रहात नाहीत म्हणून राज्यातील सर्व शिक्षक संघटनांबरोबर आम्ही चर्चा केली. त्यांच्या मागण्या मान्य केल्या. शिक्षक थांबले पाहिजेत. ते जर थांबत नसतील तर त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याचे शासनाचे धोरण आहे. मी जाहीर आश्वासन देतो की, त्यांच्यावर कारवाई करु. त्यांना वेतन दिले जाते, भत्ते दिले जातात, अशा परिस्थितीत ते जर शाळेत रहात नसतील तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, कमी प्रतीची सोलर यंत्रे पुरविली गेली आहेत अशी तक्रार करण्यात आली आहे. जी काही खरेदी झाली आहे त्या संदर्भात दिनांक 19.11.2013 रोजी अतिरिक्त मुख्य सचिवांची एक सदस्य समिती नेमली आहे. त्या समितीला चौकशी करण्यासाठी तीन महिन्यांचा अवधी दिलेला आहे. सोलर यंत्रे, बायोमेट्रिक यंत्रे आणि इतर खरेदीबाबत या समितीने चौकशी सुरु केली आहे. या चौकशीमध्ये जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

...5....



श्री.मधुकरराव पिचड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सांगितले की, आश्रमशाळांमधील शिक्षकांचे प्रमोशन झाले पाहिजे. ही बाब तपासून पहावी लागेल. आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

....6...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांवर माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, रामनाथ मोते यांनी आपले विचार मांडले आहेत.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नर्सिंग ॲडमिशनच्या सीईटीबाबत भाष्य केले आहे. नर्सिंग कोर्सचे ॲडमिशन हे मेडिकल सीईटीमधूनच होतात. प्रोफेशन कॉलेजबाबत देखील त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. हा निर्णय वन टाईम म्हणून विचाराधीन आहे. नॉन सीईटी विद्यार्थ्यांकरिता एका वर्षाकरिता निर्णय घेण्यात यावा असे विभागातर्फे प्रस्तावित केले आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी योगिता डेंटल कॉलेजमध्ये पीजी कोर्स सुरु करण्यास मान्यता द्यावी अशी मागणी केली आहे. डोंगराळ भागात अशी सुविधा असली पाहिजे असे विभागाचे सुध्दा म्हणणे आहे. त्या अनुषंगाने आपला प्रस्ताव सकारात्मक आहे. लवकरात लवकर याबाबत निर्णय घेण्यात येईल.

नंतर झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत....

डॉ.दीपक सावंत यांनी नर्सेसच्या संपाचा विषय उपस्थित केलेला आहे. यासंबंधातील चर्चा सचिवांकडे सुरू आहे. याबाबत लवकरात लवकर तोडगा काढला जाईल.

**उप सभापती** : सन 2013-14 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.: सन्माननीय सदस्य श्री.संजय पाटील यांनी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याची केलेली घोषणा.**

श्री.संजय पाटील : सभापती महोदय, मी सभागृहामध्ये घोषणा करण्यासाठी उभा राहिलेलो आहे. मी आमदार या पदाचा राजीनामा आपल्याकडे थोड्याच वेळात घेऊन येत आहे. पक्षीय पातळीवर गेल्या अनेक वर्षापासून मला त्रास होत आहे. त्यासंबंधी मी अनेक वेळा प्रयत्न केले. पण त्यात मला यश आले नाही. मी राजीनामा देत असताना अनेक बाबी केल्या पाहिजे अशी स्थिती आहे. पक्षातील एक मंत्री सातत्याने त्रास देण्याची, राजकारणामधून मला संपविण्याची भूमिका घेत आहे. या संबंधातील जाहीर वक्तव्ये मी दोन-चार दिवसांपूर्वी केली. मी श्री.आर.आर.पाटील यांच्या विषयी सांगितले आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी जे नाव घेतले आहे ते मी कामकाजातून काढून टाकतो. त्यांनी मला एवढेच सांगितले की, ते राष्ट्रवादी पक्षाचे सदस्य असून ते पदाचा राजीनामा देणार आहेत. त्यासंबंधी त्यांनी मला पत्र दिले असते तर ते औचित्यपूर्ण झाले असते. पण अनवधानाने ते विसरून गेले आहेत. त्यांचा तो आशय काढून अन्य भाष्य रेकॉर्डवर राहील.

श्री.संजय पाटील : सभापती महोदय, मी आपणासह, माननीय उप सभापती महोदय, तालिका सभापती महोदय यांच्यासह या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानतो. टोल संबंधात मला मारहाण करण्यात आली होती तेव्हा या सदनातील सर्व आमदारांनी मिळून एकमुखी ठराव केला होता. पहिल्यांदा केलेले अर्ज आणि नंतर माझ्यावर घातलेले गुन्हे या संबंधातील प्रक्रिया सभागृहापुढे दिसून आल्या आहेत. यासंबंधी मी या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचे, सर्व माननीय पीठासीन अधिकाऱ्याचे आभार मानतो. या सदनामध्ये मला काम करण्याची

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय पाटील...

संधी मिळाल्याबद्दल पुन्हा एकदा ऋण व्यक्त करतो. माननीय सभापती महोदय मी अत्यंत उद्विग्न मनाने स्वहस्ताक्षरातील माझा राजीनामा आपल्याकडे घेऊन येत आहे. समाजातील प्रश्न, न झालेली कामे या संबंधातील सगळी भूमिका मांडून मी आपणाला राजीनामा सादर करीत आहे. जय हिंद जय महाराष्ट्र.

......

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय सदस्य यांच्या राजीनाम्या विषयी बोलत नाही. माझा वेगळा मुद्दा आहे. त्यांना जे काही बोलायचे होते ते अगदी स्पष्ट बोलले आहेत. ते जात्यात आहेत तर सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे आपण सुपात आहात. त्यावर आपण नंतर बोलू या. बीड जिल्हा बँकेच्या प्रकरणामध्ये या सदनातील दोन सदस्यांविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे अशा प्रकारची माहिती मला मध्यतंरी मिळाली होती. त्यांच्यावर गुन्हा असताना त्यांनी जामिनासाठी अर्ज केला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.पंडित हे मला देखील अर्ध्या-तासा पूर्वी येऊन भेटून गेले. असे असताना आपण जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे त्या मुद्याला एवढे काही गांभीर्य असेल असे मला वाटत नाही. परंतु, विरोधी पक्ष नेते या नात्याने आपल्याला जे काही विचार मांडावयाचे असतील ते मांडण्यास हरकत नाही. वस्तुस्थिती सांगणे गरजेची असल्यामुळे मी ती सांगितली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सदनातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांवर गुन्हा दाखल केला किंवा सन्माननीय सदस्यांना अटक झाली की, ती माहिती पटलावर ठेवण्यात येते. सन्माननीय सदस्यांवर गुन्हे दाखल झालेले असताना, त्यांना अटक झालेली असताना सदर महिती पटलावर का ठेवण्यात गेली नाही ?

**सभापती** : मी आपणा सर्वांना सांगू इच्छितो की, अद्याप पर्यंत या संबंधातील कोणतीही माहिती माझ्याकडे किंवा माझ्या कार्यालयाला प्राप्त झालेली नाही. आता माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्यांनी सदर बाब मांडल्या नंतर तत्संबंधातील योग्य ती माहिती मी मागवून घेईन व त्यानंतर सभागृहाला अवगत करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण म्हणाला ते खरे आहे. माझे देखील तेच म्हणणे आहे. सुप्रीम कोर्टाने जामीन फेटाळला असताना अजून पर्यंत यांना अटक झालेली नाही. ते सभागृहात येतात. आवारात फिरतात. आम्ही राजकीय कायकर्ते अशा लोकांमुळे बदनाम होतो. ते सभागृहामध्ये येतात. ते फरार आहेत. फरात असताना ते सभागृहात कसे काय येतात ?

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपण औचित्याचा मुद्दा स्थगित ठेवला आहे. तो त्याप्रमाणेच राहिला पाहिजे.

....(गोंधळ)....

**सभापती** : मी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांचा औचित्याचा मुद्दा स्वीकारलेला नाही. पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपलेली आहे. मी आता सभागृह तहकूब करीत आहे. सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.00 वाजता पुनः भरेल.

(दुपारी 1.48 ते 2.00 वाजेपर्यंत मध्यंतर)

.........

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2014-2015 चा अंतरिम अर्थसंकल्प सादर करणे.

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी सन 2014-2015 चा अंतरिम अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

( प्रेस :सोबत जोडलेले भाषण छापावे.)

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ D/

**सभापती** : सन 2014-2015 चा अंतरिम अर्थसंकल्प सभागृहास सादर करण्यात आला आहे.

अंतरिम अर्थसंकल्पीय प्रकाशने सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे तळमजल्यावरील वितरण केंद्रावर करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी वितरण केंद्रावरुन सदर प्रकाशने घ्यावीत.

सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्थगि□ होऊन उद्या बुधवार, दिनां□ 26 फेब्रुवारी, 2014 रोजी स□ळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभा□हाची बैठ□ दुपारी 2 वाजून 38 मिनिटांनी, बुधवार, दिनां□ 26 फेब्रुवारी, 2014 च्या स□ळी 11.00 वाजेपर्यंत स्थगि□ झाली. )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही